
# पश्चिमेकडील पूर्व

ह. कृ. कोपर्डेकर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

REFBK-0018131



म. ग्रं. संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १८७३९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# पश्चिमेकडील पूर्व

पोलंडच्या प्रवासातील
अनुभवांचे वेधक आणि रंजक चित्रण

REFBK 0018131
REFBK-0018131

*

हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर

*

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : तीन रुपये

प्रकाशक :

श्याम दयार्णव कोपर्डेकर

इंद्रायणी साहित्य,

१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०

० ० ०

महाशिवरात्र : शके १८९१

६ मार्च १९७०

० ० ०

मुद्रक :

मा. प. तळेकर,

श्रीदत्त मुद्रणालय,

३३५ शनिवार पेठ, पुणे ३०

० ० ०

इंद्रायणी साहित्य

पुणे

## पश्चिमेच्या पूर्वद्वारीं

विकसनशील देशातील नगर आणि प्रादेशिक नियोजनाच्या क्षेत्रातील तज्ज्ञांसाठी पोलंडमध्ये १९६६ सालापासून एक खास अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. पहिल्याच अभ्यासक्रमासाठी जाण्याची संधी मला मिळाली. पोलंडमध्ये शिकण्यासारखे आहे किंवा पाहण्यासारखे काय आहे, असे उद्‌गार बऱ्याच जणांनी काढले. मला स्वतःला तसे खूप आढळले. महायुद्धात जवळजवळ नष्टप्राय झाल्यानंतर राखेतून पुन्हा जन्म घेणाऱ्या फीनिक्स पक्ष्याप्रमाणे या देशाने प्रगतीची भरारी मारलेली आहे. स्वतःची नैसर्गिक संपत्तीही थोडीच. विकसनशील देशांना येणाऱ्या अडचणी सर्वत्र सारख्याच. जमीन आणि शेती ही प्रामुख्याने खाजगी मालकीचीच आहे. परंतु आपल्या देशाच्या प्रगतीसाठी पुरेपूर काम करणे ही भावना सर्वांजवळ दिसून आली. पोलंडसारख्या युरोपातल्या अगदी वेगळ्या तऱ्हेचे हवामान, समाजव्यवस्था व परकी भाषा असलेल्या ( फारच थोड्यांना इंग्रजी येत असल्याने ) देशात आलेले अनुभव, जाणवलेली आपुलकी— त्याचा हा छोटासा आलेख. तो सादर करताना ' अमृत 'च्या संपादकांनी दिलेले उत्तेजन आणि आयुष्यात सर्व प्रकारच्या धडपडीला संधी आणि सक्रिय पाठिंबा देणारे वडील, तसेच हे पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी प्रोत्साहन देणारी पत्नी आणि बंधू यांचे ऋण नोंदविणे हे माझे कर्तव्यच आहे.

महाशिवरात्र :<br>६ मार्च १९७०

हे. द. कोपर्डेकर

# अं त रं ग


१. पहिले उड्डाण

२. वॉर्सा ते स्टेचीन

३. फीनिक्सच्या वारसांची पहिली ओळख

४. पोलिश भाषेशी झटापट आणि इतर गोष्टी

५. स्टेचीनचा फेरफटका

६. श्विमोडइश्वे आणि इतर छोटी गावे

७. संगीत, नाट्य अन् चित्रपट

८. कोस्नो ओद्रास्कीतला ईस्टर

९. पूर्वजर्मनीतली अपूर्वाई

१०. आया है बसंत !

११. स्टेचीनचा निरोप

१२. पोलंडची धावती सफर

१३. वॉर्सा

१४. नियोजन आणि इतर क्षेत्रांतील प्रगती

१५. लंडनमार्गे परत

ग्रंथ संग्रहालय ठाणे

# १. पहिले उड्डाण

आणि एकदाची " पट्टे बांधा " ही पाटी झळकली. पाठोपाठ विमानातल्या आमच्या यजमानिणीच्या मंजुळ आवाजातली सूचनाही कानावर पडली. विमान आता नक्कीच सुटणार होते. गेल्या दहा दिवसांत केलेल्या धावपळीचे चीज होऊन आज विमानात बसण्याच्या वेळी मात्र 'विमान उशिरा सुटणार' या घोषणेने खट्टू झालेल्या मनाला त्या 'पट्टे बांधा'च्या घोषणेने एकदम ताजेतवानेपणा आणला. मध्यरात्र उलटून गेल्यानंतरच्या त्या सुखद अशा थंडीतल्या प्रहरी निरोप द्यायला आलेल्या मंडळींशी संभाषण करण्याचा प्रयत्न एकीकडे चालू असतानाच दुसरीकडे गेल्या दहा दिवसांत केलेल्या धावपळीतल्या अनेक गोष्टी आठवत होत्या.

संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करावी लागते, ही म्हण सर्वांत योग्य तऱ्हेने कोठे लागू पडत असेल तर प्रवासाच्या तयारीला, असे मला लहानपणापासून वाटत आले आहे. प्राथमिक शाळेतल्या गावातल्याच छोट्या सहली किंवा शाळा-कॉलेजातल्या लोणावळा-खंडाळ्याच्या सहली या प्रत्येक वेळी मी तीनचार दिवस तरी तयारी करीत असायचा. त्याशिवाय अगोदर दहा-पंधरा दिवस सहलीला जाण्याबद्दलची उत्सुकता व हुरहूर वेगळीच.

त्या लहानशा सहलीची ही कथा मग युरोपातल्या अगदी थंड हवेच्या प्रदेशात जायचे ठरले म्हणजे कितीतरी दिवस, तयारी करायला हवेत खरे म्हणजे! पुष्कळ दिवस हवेत खरे पण मिळाले मात्र दहाच! एवढ्यात पासपोर्ट, व्हिसा, विमानाचे तिकीट, कपडे, खरेदी इ. सर्व होणार नाही व 'तुम्ही काही जात नाही' असाच निष्कर्ष अनेकांनी काढला. कारण साध्या पुणे-दौंड अशा जवळच्या प्रवासाची तयारीही मी निदान चार दिवस तरी होल्डॉल व सूटकेस खोलीत मांडून ठेवून, केलेल्या यादीप्रमाणे त्यात वस्तू भरीत असायचा हे सर्वांना माहीत होते.

त्यातून एखादा माणूस परदेशी जाणार हे कळताच त्याला मार्ग-दर्शन (?) करायला येणाऱ्यांचाही तोटा नसतो. 'अहो, आमचा तो अमकातमका परवाच जाऊन आला. काही नाही, अगदी ठीक जमते सगळे काही!' असे, स्वतःच जाऊन आल्याच्या थाटात कोणी सांगतात. तर 'छे हो—परवाच तो गणपतरावांचा मधू. त्याचीच गोष्ट. गेली दोन वर्षे जाणार जाणार म्हणून गाजत होती, तर परवा त्याचं पासपोर्ट का कशा-वरून तरी फिस्कटलं बघा!' आणखी एक सद्‌भाऊ सांगायला येतात, 'बघा बरं' तुम्ही पोलंडला म्हणजे रशियाच्या त्या पोलादी का कसल्या पडद्यातल्या देशात जाताय. पुन्हा आयुष्यात तुम्हाला इंग्लंड, अमेरिका वगैरे पश्चिमेकडच्या देशात पाय नाही ठेवू द्यायचे!' एक अगदी आपुलकीने सांगत आले 'उगाच कपडेबिपडे इथे शिवत नका बसू, सारे काही तिकडे करून घ्या. स्वस्तही पडेल. अन् फॅशनही तिकडचीच मिळेल. नाही तर इथले सूट फुकट वाया जातील.'

मी विचार केला की, असे नानाविध सल्ले ऐकत बसण्यापेक्षा स्वतः सगळी माहिती मिळवावी हे बरे. तेव्हा पोलंड हा देश बरोबर आहे कुठे, तिथले हवामान, कपडेलत्ते, खाणेपिणे सगळे कसे आहे म्हणून पुस्तके शोधायला सुरुवात केली. आजूबाजूच्या कोणाच्या 'भूगोला'त

( सगळे, नवा आधुनिक, अभिनव, अर्वाचीन वगैरे भूगोल शोधून झाले. ) काही मिळेना, तसा तडक एका पुस्तकाच्या दुकानात शिरलो.

' युरोपातल्या देशांबद्दल सविस्तर माहिती देणारे एखादे भूगोलाचे पुस्तक आहे का हो ? '

' पाचवीचा अभिनव भूगोल, नाही तर सहावीचा नवा भूगोल घ्या. ' असे ऐकण्याची कानांना सवय असलेल्या त्या दुकानदाराने एकदम माझ्याकडे मान वर करून बघितले. मी त्यांना पुस्तक कशाकरिता हवे ते सांगितल्यावर त्यांनी एकदोन इंग्रजी पुस्तके काढून दिली. त्यातून पदरात पडली ती माहिती एवढीच की, पोलंड हा देश युरोपखंडाच्या मध्यभागी असून, नैसर्गिक हद्दी नसलेल्या देशाचे ते एक उत्तम उदाहरण आहे. तेथील हवामान थंड असून गव्हाऐवजी मुख्यत: ओट, बार्ली, बटाटे व दुधाचे पदार्थ हे तेथील मुख्य अन्न आहे. एकंदरीत हवी ती माहिती देणारी पुस्तके मिळणे कठीण. हे काम पुण्यामुंबईला गेल्यावर पाहू, म्हणून तूर्त स्थगित केले. तशी माहिती मिळविण्यासाठी व पोलंडला जाऊन आलेले कोणी आहे का म्हणून चौकशी करण्यासाठी घरी कळवून ठेवले.

आणि मग पासपोर्ट, व्हिसा, इंजेक्शने, तिकीट वगैरेच्या मागे लागलो. औरंगाबादला राहून हे काय जमणार म्हणून पुण्या-मुंबईच्या फेऱ्या सुरू झाल्या. ' दहा दिवसात तयारी करून तुम्ही काय जाताय ? ' असे म्हणणाऱ्यांना सांगायचे, अहो, सरकारी पासपोर्ट घ्यायचा आहे अन भारत सरकारनेच तर माझी निवड केली आहे, तेव्हा सर्व काही चुटकीसरशी होते की नाही ते पहा ! अर्थात ती शेवटची चुटकी वाजण्यापूर्वी अनेक भेटीगाठी, हेलपाटे व अनंत उपद्‌व्याप करावे लागले हा अनुभव निराळा.

सगळी खरेदी व सामान भरण्याचे काम शेवटच्या दिवसावर टाकले.

फक्त कापड घेऊन शिंप्याला शिवायला व वेळेवर द्यायला सांगायला मात्र विसरलो नाही. चांगला शिंपी कोणता आणि युरोपात सध्या कोणती फॅशन चालू आहे वगैरे चौकशी करायला वेळ नव्हताच. एवढया गडबडीत पोलंडला जाऊन आलेल्या श्री. भाटवडेकर या सद्गृहस्थांची भेट झाली. त्यांच्याकडून पूर्वतयारी, हवामान, तेथे मिळणारी वागणूक, भाषेच्या अडचणीतून थोडी सुटका करून घेण्याविषयी काही सूचना मिळाल्या आणि ह्यांचाच उपयोग झाला.

आणि एकदाचा तो जाण्याचा दिवस उजाडला. पंधरा फेब्रुवारीला रात्री एक वाजताचे विमान होते. सकाळच्या मेलने सर्वांनी मिळून पुणे सोडले, तेव्हा अर्थात राहिलेली खरेदी, मुंबईत करायची कामे आणि रात्री वेळेवर विमानतळावर पोहोचण्याची काळजी या सगळ्या विचारात प्रत्यक्ष निरोप घेण्याचा व दूर जात असल्याबद्दलचा विचार मनात यायला जागाच नव्हती.

मुंबईतील सगळी कामे आणि धावपळ संध्याकाळी सहा वाजता संपली अन् इतका शीण आला होता की उरलेले सहा-सात तास चांगली झोप काढावी असे वाटत होते. फोर्टमधून सांताक्रूजला पोहोचेपर्यंत सात वाजले. तिथे घरी बाकी सगळे वाटच पहात होते आणि मग सगळ्यांशी बोलणे चालू असतानाच, ‘ अहो, हे घ्यायचे राहिले ! ही पुरचुंडी त्या कोपऱ्यात ठेवली आहे. या सौभाग्यवतीच्या सूचनामध्येच वडीलधाऱ्यांच्या काही सूचना, छोट्या युवराजांच्या हसण्या व रडण्याच्या मिश्रणातील निरोपाच्या आठवणी मनात साठवून घेण्याची धडपड चालू होती. अशा सगळ्या गडबडीतून कसाबसा ११ वाजता सांताक्रूजच्या विमानतळावर पाय ठेवला.

विमानाची घोषणा झाल्यावर साडेअकरा वाजता सगळ्यांचे निरोप घेऊन एअर इंडियाच्या काऊंटरवर उपस्थित झालो. सर्व आवश्यक

त्या गोष्टी पूर्ण करीत कस्टममधून मुख्य हॉलमध्ये दाखल झालो. इथे तर सरळ रेल्वेस्टेशन वा एस. टी. स्टँडची सुधारलेली आवृत्तीच वाटत होती. सुधारलेली एवढ्यासाठी म्हणावयाचे की नीटनेटकेपणा होता व लोक झकपक कपडे घातलेले होते. बोलायला आपले कोणी नव्हते तिथे. नानाप्रकारच्या विचारांनी डोक्यात काहूर माजलेले होते. एकदम लांबचा व पहिलाच विमानप्रवास, अलीकडे झालेले मोठे विमान-अपघात, वेगळ्या तऱ्हेचे जीवन. सहजासहजी न मिळणारी अशी ही संधी--पण आप्त, प्रियजन व मायदेशापासून दूर काही महिने काढावयाचे, कसे जमेल अन् काय होईल, अशा नाना विचारांची गर्दी चालू होती डोक्यात. थोड्या वेळात भन्साळी नावाच्या एका चहाच्या एजंटाने माझी मनःस्थिती थोडी ओळखून माझ्याशी बोलायला सुरुवात केली. पण पोलंडच्या हवामानाबद्दल एकदम घाबरवूनच टाकले. मग बाहेरच जाऊन उभा राहिलो. अन् वर गॅलरीत निरोप द्यायला आलेल्यांशी चार शब्द बोलण्याचा प्रयत्न केला - लांबूनच.

आमच्या विमानाच्या उशिराबद्दलच्या घोषणा मधूनमधून होत होत्याच. एकदाचे दिल्लीहून येणार एक विमान आले. त्याच्यासाठीच आमचे खोळंबून राहिले होते. त्यातून पोलंडला जाणारे माझे आणखी दोन सहप्रवासी आल्याने मात्र एकदम बरे वाटले. विमानाची शिडी चढून एकदा शेवटचा हात हलवून निरोप घेतला व विमानात प्रवेश केला. मनातले सगळे विचार, गोंधळ सर्व बाहेर ठेवून एका अद्भुतरम्य स्वप्नमय वातावरणात प्रवेश केल्यासारखे वाटले. आतला राजेशाही थाट अन् खिडकीजवळची खुर्ची पाहून मन खूपच उल्हासित झाले. थोड्या वेळातच विमानाच्या प्रचंड घरघरीत बाहेरचे जग लुप्त झाले व मन नव्या जगातल्या नव्या विचारांच्या रोखाने उडू लागले-- धावू लागले.

मुखातली सुपारी, टॉफी वगैरे चघळून संपली तेव्हा उड्डाणाची

झेप संपून विमान जणू अवकाशात कोठे स्थिर झाले आहे असे वाटू लागले होते. पट्टा सोडतो तोच संत्र्याचा रस, सँडविचेस, कॉफी हे पदार्थ आले. ते खातपीत असतानाच डुलकी लागू लागली. बाहेर मिट्ट अंधार होता. काही म्हणता काही दिसत नव्हते. ढगही असावेत नाही तर खाली थोडे तरी दिसले असते.

पहाटे दोन वाजता कैरो आले. पण बाहेर उतरावयाचे नव्हते व थंडीही फार होती. स्फिंक्स–पिरॅमिड काहीच दिसले नाहीत. ब्लँकेट गुंडाळून पुन्हा झोपी गेलो. साडेसात वाजता रोम आले तेव्हा उजाडून गेलेले होते. पण वातावरण चांगलेच थंड होते. सगळीकडे बर्फ पसरलेले दिसत होते. विमानतळाची वक्राकृती इमारत त्या बर्फाच्या पार्श्वभूमीवर फारच सुंदर दिसली. त्यावेळेला एअर इंडियाच्या वतीने मिळालेली तेथील गरमगरम कॉफी फारच उत्साहकारक वाटली. काचेच्या पलीकडे विमानांची जा ये चालू होती. इकडच्या बाजूला वेगवेगळ्या स्टॉल्स व कचेऱ्यांतील जा ये अद्याप चालू व्हायची होती. पोस्ट ऑफिसचा शोध लागेपर्यंत विमानाच्या पुनरुड्डाणाची घोषणाही झाली होती. विमान सुटल्यावर विमानातली पुस्तके वाचायला घेतली. या विमानातल्या प्रवासाचा हा शेवटचा टप्पा होता. 'गौरीशंकर'मधले ते अद्भुत वातावरण, ( महा ) राजेशाही थाट आणि सारखे चवदार प्रदार्थ खायला आणून देणाऱ्या विमानयजमानिणी सगळेच कसे प्रवासात आहे, असे वाटूच देत नव्हते. एखाद्या पर्वतराजीतल्या थंड हवेच्या ठिकाणात आलिशान हॉटेलातल्या खोलीसारखे !

फ्रँकफूर्टला दहा वाजता पोहोचलो. 'ट्रॅन्झिट पॅसेंजर' अशी पाटी दाखवलेल्या दारातून शिरल्यावर एका चक्रव्यूहातूनच जावे लागले. तिकिटे दाखविणे, पुढच्या प्रवासाचे बुकिंग वगैरे उरकून हॉलमध्ये येऊन बसलो. १०–४० ला यायच्या पोलिश विमानाचा पत्ताच नव्हता. मग पोस्ट-ऑफिस शोधून काढून पत्रे टाकली. तेवढ्यात विमान

११-३० ला येणार अशी घोषणा झाली अन् थोड्याच वेळात १२-३० अशी दुरुस्तीही जाहीर झाली. मग मात्र वेळ घालवण्यासाठी करमुक्त वस्तु विकणाऱ्या विविध दालनांमधून हिंडू लागलो. उगाचच वस्तूंच्या गुणावगुणांची आणि किंमतीची चर्चा करू लागलो. पोटाने भूक लागल्याचा संदेश पाठवला. विमानाचा अजून पत्ताच नव्हता. तेव्हा पोलिश विमान कंपनीच्या प्रतिनिधीचा शोध सुरू केला अन् एकदाची कूपन्स मिळवून शाकाहारी (अंड्याचे) जेवण केले.

दोन वाजून दहा मिनिटांनी पोलंडच्या लॉट कंपनीचे विमान एकदाचे आले. वॉर्सा येथील खराब हवेमुळे विमानाला उशीर झाला होता. या विमानात चढताच परक्या वातावरणाची, दुसऱ्या देशाची खरी जाणीव झाली. एअर इंडियाइतके अद्ययावत व सुंदर नसले तरी विमान बरे होते, पण गर्दी मात्र फारच झाली होती. कानावर युरोपातल्या नाना भाषांचे उच्चार आदळत होते. आणि मुख्य म्हणजे आता उपाध्याय कंपनीची सुपारी व पॅरी कंपनीची टॉफी संपली होती. पण तसलीच कसलीतरी टॉफी मिळाली.

थोडया वेळाने या नव्या विमानाच्या यजमानिणींने ताटे (?) भरून जेवण आणले. भूक नाही, नको म्हटले तरी हा पदार्थ छान आहे, तो तर आमचे खास वैशिष्ट्य आहे, खाऊन तर पहा, वगैरे आग्रह तिने सुरू केला. एकंदरीत विमानकंपन्यांची समजूत अशी असावी की, विमानाने प्रवास करणारे सगळे लोक खादाड असावेत. दिवसाची कुठलीही वेळ असो चविष्ट, दबदबीत पदार्थांनी भरलेल्या बशा व अधूनमधून हलकीफुलकी खाद्य पेये सतत पुढे येत असतात. विमान-यजमानिणींचे हे एक मुख्य कामच ! नाइलाजास्तव त्यावेळी मला चहा व केक एवढे तरी घ्यावे लागले. साडेचार वाजता वॉर्सा आले.

भयंकर थंडी होती. प्रवासातही ढग किंवा क्वचित बर्फाने भरलेली शेते याखेरीज काही दिसले नव्हते. वॉर्साचा विमानतळ अगदीच

साधा होता. साध्या पत्र्याच्या व लाकडी पार्टिशनच्या खोल्या, अरुंद मार्गांमधल्या रांगा, छताची उंचीही अगदीच कमी. आमची फक्त टोचल्याची सर्टिफिकिटे व व्हिसा तपासला. कस्टम्सवाले इतरांच्या सामानाची उलगडून कसून तपासणी करीत होते. आम्ही सामान उघडू का म्हणून विचारले तर नको म्हणून फक्त परकीय चलनाबद्दलचा एक फॉर्म भरायला दिला. तितक्यात बाहेर आमचे स्वागत करायला कोणी आले आहे, तेव्हा तिकडे चला असा निरोप आला आणि तिघेही बाहेर आलो.

बाहेर येताच श्रीमती हलीना ओर्लीन्स्का यांनी आमचे स्वागत केले. आपली ओळख करून दिली. प्रवासाचीही चौकशी केली. त्या बाहेरच्या दालनात माणसे खूप भरली होती. सगळीच गरम, ऊबदार कपड्यांनी गुबगुबीत दिसणारी. सगळे बसची वाट पाहात होते. बाहेर बर्फ व नंतर पाऊस पडून सगळे चिकचिकीत झाले होते. अंधारही पडला होता. उतरल्यावर काय? हा आमचा मुख्य प्रश्न सुटला होता. आमच्याजवळ तेथे उपयोगी पडणारे पैसेही नव्हते व भाषाही येत नव्हती. त्यासाठी २४ रुपये खर्च करून मुंबईहून आमच्या वकिलातीला विमानतळावर मदतीची व्यवस्था करा म्हणून पाठविलेली तार फुकट गेली असली तरी आम्ही जेथे उतरायचे होतो त्या विद्यापीठाने सर्व व्यवस्था चांगली करून ठेवली होती.

इंग्लिश कानावर पडतच नव्हते—इश—वेश—इन्स्क—विच असे स्लाव्ह भाषांचे वैशिष्ट्यपूर्ण स्वर कानावर पडत होते. श्रीमती हलीनांनी जबाबदारी घेतल्याने पुढचे काम सोपे झाले. बसमधून विमानकंपनीच्या कचेरीत जाऊन दुसऱ्या दिवशीच्या पुढच्या प्रवासाची सोय लावली आणि टॅक्सीने हॉटेलकडे निघालो. इतक्या तासांच्या ऐकलेल्या विमानाच्या गडगडाटी घरघरीनंतर बर्फ व चिखलमिश्रित रस्त्यावरून

वाहणाऱ्या वाहनांच्या चाकांचा निसरडा आवाज कानाला मजेदार वाटत होता.

पाच सव्वापाचलाच अंधार पडला होता. त्यामुळे एव्हाना आपल्याकडे रात्री ९–१० वाजता वाटते तसे वाटत होते. मात्र वाहनांची वर्दळ बरीच होती. दुकाने बंद होऊन गेली असली तरी शोरूम्स व जाहिरातींचे आणि रस्त्यावरचे दिवे वातावरणात एक वेगळाच सौम्य प्रकाश व जिवंतपणा भरीत होते. थंडीचे कपडे अंगावर नसतानाही आम्ही काकडून गेलो नव्हतो व थंडीबद्दल तक्रारही करीत नव्हतो याचे ओर्लीन्स्कांना मात्र आश्चर्य वाटत होते.

हॉटेल 'ऑर्बिस' या सगळ्यात मुख्य हॉटेलमध्ये जागाच नव्हती. शेवटी सामान क्लोकरूममध्ये ठेवून व आम्हाला पाचव्या मजल्यावरच्या त्यांच्या खोलीत बसवून त्या दुसरीकडे खटपट करायला गेल्या. जरा तोंड वगैरे धुऊन, हातपाय सैल सोडून बसल्यावर ताजेतवानेपणा आला. तेवढ्यात ओर्लीन्स्कांनी कुठे तरी कळ फिरवली. आमच्याकरिता त्याच हॉटेलात पहिल्या मजल्यावर सोय झाल्याची बातमी सांगत त्या आल्या. चहाही पाठविला होता त्यांनी. बिनसाखरेचा व बिनदुधाचा असा तो पहिलाच चहा अन् तोही ग्लासमधून. पण त्या वेळेला तोही छान लागला.

आमच्या खोलीत पाय टाकताच मन कसे प्रसन्न झाले. समोरच्या रस्त्याच्या बाजूला भिंत नव्हती, नुसतीच काच. त्यातून पळणारी वाहने व रस्त्यावरचे सर्व दिसत होते. फक्त आवाज येत नव्हता. परकीय चित्रपटातली अशी दृश्ये आवाज बंद पडलेला असताना पहातो तसे वाटले. पण हा चित्रपट नव्हता. येथे प्रत्यक्षात पाहात होतो. खोलीत अद्ययावत फर्निचर, पडदे, रेडिओ, टेलिव्हिजन, फोन सारेच होते. फोनवरून ओर्लीन्स्कांनी जेवणाकरिता बोलाविले. भोजनाच्या दालनातून खाण्याची वेळ संपत आल्याचे दृश्य दिसत होते. नृत्य व वाद्यवृंदाची तयारी चालू होती. आता आरामात काही पदार्थ खात व नृत्य पहात

वा नाचत वेळ घालवण्यासाठी आलेलेच रेंगाळत होते. आम्ही सारे अगदी कंटाळून गेलेलो असल्याने कसेबसे जेवण उरकून परतलो. जेवताना मुख्य जाणवला तो पाण्याचा अभाव. पाणी न पिता जेवण्याची कल्पना कशी तरी वाटली. तरी यापुढचे काही दिवस तसेच काढावयाचे होते. संत्र्याचा रस, चहा, कॉफी वा इतर कोणतीही पेये पाण्याची जागा भरून काढतील ही कल्पनाच मनाला पटायला तयार नव्हती.

भराभर भोजन उरकून एकदाचे खोलीकडे वळलो. बाहेरची थंडी व पलंगावरच्या मऊ ऊबदार दुलया यामुळे झोप आवरणे अशक्य होते. शिवाय गेल्या दहा–अकरा दिवसांचा शिणवठा संपला होता. पाच फेब्रुवारीला पोलंडला जाण्यासाठी तयार राहा ही तार मिळाल्यापासून उसंतच नव्हती. ती आज वॉर्सात पोहोचल्यावर मिळत होती. अगदी गाढ झोप निमिषार्धात लागून गेली.

० ० ०

## २. वॉर्सा ते स्टेचीन

सकाळी जाग आली तेव्हा सारे कसे शान्त होते. प्रथम कोठे आहोत हेच लक्षात येईना. नेहमीच्या खोलीच्या जागी प्रशस्त दालन, उत्तम गालिचे, सुसज्ज फर्निचर व रस्त्याकडेच्या काचेतून बाहेरचे बर्फाळ धूसर वातावरण दिसत होते. आवाज कसलाच येत नव्हता. नेहमी सकाळ, प्रभात, केसरी किंवा पाऽवऽबऽटऽर अशा ललकाऱ्या ऐकू येणाऱ्या कानांचा व आजूबाजूला दिसणाऱ्या देखाव्यांमुळे डोळ्यांचा, ‘ विश्वास ’ न बसून अजून स्वप्नातच तर नाही ना आपण, असे वाटले क्षणभर. मग एकदम कालचा विमानाचा प्रवास आठवला अन् लक्षात आले की, लवकर तयारी करायची आहे. आताही आपल्याला पोलंड-

मधल्या विमानाने प्रवास करायचा आहे. एका वेगळ्याच उत्साहानें मग तयारी करायला सुरुवात केली.

साधारण सकाळी आठ सव्वाआठच्या दरम्यान आम्ही टॅक्सीसाठी हॉटेलच्या बाहेर आलो. एव्हानाच रस्त्यावर खूप रहदारी सुरू झालेली होती. रस्ते झाडणे म्हणजे बर्फ दूर करणे हा कार्यक्रम चालू होता. पण अधूनमधून बर्फांची एकेक सर आल्यासारखी होई. त्यावेळी अगदी अलगदपणे पसरल्यासारखा एक पांढरा थर रस्ते, इमारती, माणसे, किंवा माणसे म्हणण्यापेक्षा त्यांच्या अंगावरच्या जाड कपड्यांवर पसरल्यासारखा दिसे व थोड्याच वेळात तो दाट होऊन सर्व वस्तू व आपले कपडे, पांढऱ्याशुभ्र केसाळ कातडीने पांघरल्यासारखे दिसत. रस्त्याच्या कडेचे भाग मात्र बर्फ साठून व अधिकच घट्ट होऊन गेल्याने पांढऱ्या दगडाची किनार लावल्यासारखे दिसत होते.

चांगलेच थंडगार होते बाहेर. काल जाणवले नव्हते. पण आज मात्र आपल्याजवळ थंडीचे कपडे नसल्याचे जाणवत होते.

एकदाचे आम्ही टॅक्सीत शिरलो. टॅक्सीच काय पण साऱ्याच वाहनांची दारे घट्ट बंद केली जात. घरातून बाहेर पडणारा माणूसही दार नीट बंद करून आपल्या अंगावरचे गुबगुबीत कपडे अधिकच लपेटून घेऊन मगच पुढे जाई. टॅक्सीची, बसमधली, घरादारामधली ऊब बाहेर निसटू न देण्याचा हा प्रयत्न मोठा मजेशीर वाटतो, आपल्यासारख्या उष्ण कटीबंधातल्या माणसांना.

विमानतळावर आलो तेव्हा प्रथम तिकिटे दाखविणे, सामान ताब्यात घेणे, वगैरे उपचार झाल्यानंतर घड्याळाकडे पाहिले. भरपूर वेळ होता अजून! मग पोस्टकार्डे आणून त्यावर सुखरूप पोहोचल्याचे कळविणे हा कार्यक्रम हाती घेतला. त्याबरोबरच श्रीमती ओर्लीन्स्काकडून पोलिश नाणी, पोस्टाची तिकिटे यांची माहिती मिळविणे चालू केले. 'आय्

शिंक ( आय् थिंक ) ' अशी सुरुवात करून पोलिश उच्चारांच्या इंग्लिशमध्ये त्या मनापासून माहिती देत होत्या. त्याच वेळी त्यांना आपली नाणी, तिकिटे वगैरेची माहिती हवी होती. नाण्यावरील नेहरूवरून, नेहरूंच्या गोष्टी निघाल्या आणि त्याचबरोबर इंदिरा गांधींसह नेहरूंनी वॉर्साला भेट दिल्याची हकीकत त्या आम्हांला सांगू लागल्या. तितक्यात विमानाच्या उड्डाणाची घोषणा झाली. ओर्लीन्स्का आमच्या बरोबर येणार नव्हत्या. आमच्यानंतर इतर देशांतून येणाऱ्यांचे असेच स्वागत त्यांना करावयाचे होते, म्हणून तिघेच विमानाकडे निघालो.

विमानतळ कालचाच असला तरी आता अंतर्गत वाहतुकीच्या दालनाच्या बाजूने आम्ही आत शिरलो होतो. सगळे शान्तच होते. दूरवर एखादे विमान बर्फाच्या पट्ट्यावर उभे दिसत होते. चावऱ्या थंडीतून बर्फ तुडवत जायला मजा वाटत असली तरी ओव्हरकोटाशिवाय हिंडणे धोक्याचे होते. तेव्हा आम्हांला घाईगडबडीने विमानात नेऊन बसवण्यात आले. आता बोईंगचा प्रवास संपलेला होता. पुढचा पंखा वर व मागचे शेपूट खाली करून असलेले पंचवीस तीस बैठकांचे हे छोटेसे विमान होते. लहानपणी माना मोडून मोडून बघायचे असले हे विमान. आता आकाशातले जेट बघायचे म्हणजे एक ठिपका किंवा त्याच्या धुराचा पट्टा एवढेच बघायला मिळते.

विमान निघाले. उतारू फारसे नव्हतेच. फारशा उंचीवरून उडत नसल्याने खालची बर्फाळ शेते, मधून जाणारे लहान रस्ते व त्यावरील मधूनमधून धावणाऱ्या मोटारी, एखादा रेल्वेफाटा, काळपट झाडांची छोटीमोठी जंगले मधूनच पुंजक्यासारखी दिसत होती. क्वचित् एखादे छोटेसे गावही दिसायचे. काही वेळा खाली आल्यावर इमारतींचे मजलेही स्पष्ट दिसायचे.

दोन तासांनी पोझनात आले. पोलिश भाषेतून आम्हांला काहीतरी सांगण्यात आले. त्याचा अर्थ बहुधा विमानातून उतरा असा असावा

असे समजून आम्ही बाहेर पडलो व अधिकच चावऱ्या झालेल्या थंडीतून धावतपळत इमारतीत जाऊन थांबलो. आता पूर्वीच्या प्रवासासारखा चहाफराळ व कॉफी वगैरे काही नव्हते. चहा मिळाला तर हवा होता. पण विचारायचे कुणाला व सांगायचे तरी कसे म्हणून गप्पच बसावे लागले. भाषेची अडचण जाणवली अन् त्यामुळेच आसपास दिसणाऱ्या पोलिश लोकांशी इच्छा असूनही आम्ही बोलू शकलो नाही.

विमानाच्या प्रवासाचा पुढचा टप्पा लहानच होता. आता स्टेचीन येणार होते. येथेच आमचा बराचसा काळ जाणार होता. गाव कसे असेल याची मनात कल्पना करीत होतो. पण बर्फाळ शेते व झाडे याखेरीज काहीच दिसत नव्हते. बर्फाच्या थरावर एकदाचे ते टेकले अन् गडगड करीत एका छोट्याशा इमारतीसमोर येऊन स्थिरावले.

बाहेर उतरू लागताच जाणवले की, चांगले ऊन पडलेले आहे अन् त्या थंडीतही थोडी ऊब जाणवत आहे. दुपारचे साडेबारा वाजलेले होते. पण सकाळी सात-आठ वाजता आपल्याकडच्या थंडीत जशी हवा असते, तसे वाटत होते. प्रा. वोझाचिन्स्कि व आणखी दोघांनी पुढे येऊन आमचे स्वागत केले. ओळखी झाल्या. इमारतीत नेऊन प्रथम त्यांनी आमच्या शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता हातावर ठेवला व आमची मुख्य आर्थिक अडचण दूर केली. दुसरी मुख्य अडचण भाषेची. ती मात्र अशा एका फटक्याने दूर होणे अशक्य होते.

मोटारीतून गावाकडे निघालो. अगदी मोकळ्या मनाने प्रा. वोझाचिन्स्कींनी गप्पा मारायला सुरुवात केली. आमचा अभ्यासक्रम, राहण्याची सोय, तेथील हवामान वगैरेची त्यांनी माहिती बोलताबोलताच दिली. तपमान शून्याखाली १० ते १२ अंशापर्यंत होते. मध्येच त्यांनी सांगितले की, 'आज कित्येक दिवसानंतर ऊन पडले आहे.' बऱ्याच हिमवृष्टीनंतर असे ऊन म्हणजे पर्वणीच त्या लोकांना. मी म्हटले, आम्ही

आज पूर्वेकडून सूर्य बरोबर घेऊनच आलो आहोत. बर्फ मात्र घट्टच होते. "आजच्या सूर्यदर्शणामुळे सारे लोक आनंदी दिसताहेत वाटते," असे मी प्राध्यापकांना म्हटल्यावर ते उत्तरले, "तसे असेलही. पण खरे म्हणजे माणसाला पुरेसे अन्न, वस्त्र व चांगला निवारा असल्यावर ते आनंदी असणारच." समाजवादी विचारसरणी या लोकांच्या मनात किती दृढमूल झालेली आहे, याचा प्रत्ययच या उद्गारातून येत होता.

आम्हांला मोटारीने थेट कपड्यांच्या एका मोठ्या दुकानात नेण्यात आले व 'येथील थंडी अत्यंत धोक्याची आहे, तुमच्याच अभ्यासक्रमासाठी आलेल्या एकाला थंडीमुळे इस्पितळामध्ये न्यावे लागले आहे,' हे सांगून प्रथम ऊबदार कपड्यांची खरेदी करण्याचे ठरविले असल्याचे सांगितले.

प्रथम ओव्हरकोट पाहात होतो. किंमत १४०० झ्लोटीहूनही पुढे दिसत होत्या. म्हणजे आमच्या हातातल्या अर्ध्या महिन्याच्या शिष्यवृत्तीच्या रकमेहून जास्त (अवमूल्यनापूर्वीचा दर म्हणजे एक रुपयाबरोबर ५ झ्लोटी व नंतरचा साधारण ३½ झ्लोटी.) ओव्हरकोटा· पाठोपाठ इतरही गरम कपडे दाखवणे चालले होते. तुम्हांला आवडेल ते पसंत करा असे सांगण्यात आले होते खरे पण शेवटी न राहवून मी प्राध्यापकांना म्हटलेच, "अहो, आमच्या खिशात इतके पैसे कुठे आहेत?" तेव्हा हसतहसत ते म्हणाले, "अहो, काळजी करू नका. तुमच्याजवळ थंडीचे कपडे नाहीत असा ट्रंकाल काल रात्री आम्हांला आला होता व सकाळीच गडबड करून काही खास रक्कम तुमच्यासाठी मंजूर करण्यात आली आहे. मात्र घेण्यात तुम्ही कमीपणा मानू नये. येथील हवामानाची ती गरज आहे," असे सांगायला ते विसरले नाहीत.

ती खरेदी होऊन अंगावर कपडे चढल्यावर एकदम वेगळेच वाटू लागले. जरासे सैल व मोजके कपडे वापरणाऱ्या आपल्या शरीराला हे इतके कपडे घालून रोज मिरवावे लागणार, ही कल्पना मोठी मजेशीर वाटली.

आमच्या खरेदीच्या वेळी आजूबाजूच्या काऊंटरवरचे लोक व विक्रेत्या आपले काम थांबवून आमच्याकडे प्राणिसंग्रहातल्या प्राण्याकडे पहावे तसे टकमक पाहात होत्या. आफ्रिकेतले कुळकुळीत काळे व त्यांच्या-सारखे लालसर गोरे अशा दोन रंगांचा सुवर्णमध्य साधलेले हे आशियातले लोक त्यांना नवीनच होते. नंतर केव्हा तरी समजले की पोलंडमध्ये गेल्या तीनचार वर्षांतच परदेशी लोकांची जाये सुरू झाली आहे. त्यामुळे अजून परके लोक म्हणजे सर्वांना एक नावीन्यच असते.

सर्व खरेदी उरकून मग राहण्याच्या जागेकडे निघालो. मोटारी थांबल्या त्या एका भव्य तीन मजली दगडी प्रासादापुढेच. आत शिरल्यावर पाहिले तो खूप माणसांची वर्दळ चालू होती. उंच टाचेच्या बुटांची चुटचुट आणि विविध बुटांचे खाडखाड आवाज ऐकू येत होते. जाणाऱ्यायेणाऱ्यात एकमेकाला शुभेच्छा, गप्पाविनोद सगळे चालू होते. दोन पुरुष उंचीच्या अतिशय भारी अशा दोन दरवाजामधून आत गेल्यावर डाव्या बाजूच्या एका लांबच्या लांब मार्गावरून आम्ही आत शिरलो व एका मोठ्या दालनात आलो. खाद्यपदार्थ घ्यायला एका कोपऱ्यात एक मोठी रांग लागली होती. तर बाकी सर्व भागातील खुर्च्या-टेबले स्त्रीपुरुषांनी भरून गेली होती. एकंदरीत सध्या लंच-टाईम झाला होता.

स्टेचीन प्रांताच्या त्या सचिवालयाच्या इमारतीतील वरच्या मजल्यावर असलेल्या अभ्यागत गृहात आमच्या राहण्याची सोय झाली होती. या ठिकाणी ख्रुश्चेव्हसारखे बडे पाहुणे उतरतात अशीही माहिती देण्यात आली. अर्थात खोल्यामधला थाट अगदी शाही पद्धतीचाच होता. हे सचिवालय ओद्रा नदीच्या अगदी काठावरच आहे. समोर सारे बंदराचेच दृश्य दिसते. आजूबाजूला म्यूझियम, क्लब्स व काही राहती घरे व एक मोठे मैदान असा परिसर आहे.

वरच्या मजल्यावरच्या आमच्या खोल्या नदीकडे तोंड करून नसल्या

तरी मागच्या मैदानाकडे उघडत होत्या. शिवाय चांगले ऊन येण्याचीही सोय होती. ‘उन्हाचे ते काय मोठेसे’ असे मी म्हणताच मला सांगितले गेले, ‘अहो एकदोन दिवसांतच तुम्हांला उन्हाचे महत्त्व पटेल. तुमच्या देशात ऊन तुम्हाला नकोसे होत असेल. पण आम्ही इथं त्याच्यासाठी धडपडतो !’

सर्व काही स्थिरस्थावर झाल्यावर पोटाची पूजा करणे हे पहिले काम होते. खाली येऊन कॅन्टीनमध्ये जागा मिळवल्या. आता प्राध्यापक वोझाचिन्स्की आणखी कशाची तरी व्यवस्था करायला गेले होते. आमच्याबरोबर असलेल्या पिओत्रोविचला फारच थोडे इंग्रजी येत असावे. कारण बोलत असलेल्या वाक्यावर तो मान डोलवायचा किंवा मख्ख बसून राहायचा. आमच्यापैकी प्रत्येकाने काही ना काही सांगण्याचा प्रयत्न केला. कोणी पाव, कोणी आम्लेट, कोणी मासे असे सांगत होते. पण त्याला काहीच समजेना. त्याने हाताला धरून काऊंटरवर नेले. प्रथम तेथली रांग पाहून उत्साह खलास झाला. बरे, तेथे ठेवलेल्या बशांमधले पदार्थ तरी काय आहेत, हे त्याला सांगता येईना व आम्हांलाही कळेना. शेवटी पाव व लोणी आणि चहाकडे बोटे दाखवून आम्ही ती वेळ कशी तरी भागवून घेतली व थोडीशी विश्रान्ती घेऊन जरा हिंडावे म्हणून बाहेर पडलो.

एव्हाना अंधार पडायच्या बेतात आला होता. पाच वाजण्याचा सुमार असेल, जास्त नाही. पण अगदी सात–साडेसात वाजल्यासारखे वाटत होते. रस्त्यावर रहदारी कमी दिसली. पण जेव्हा गावाच्या मध्यभागात आलो तेव्हा मात्र खूप गर्दी दिसत होती.

पूर्व युरोपातल्या गावात हिवाळ्यातल्या एका संध्याकाळी धूसर वातावरणातल्या बर्फाळ रस्त्यावरून आम्ही फिरत होतो. सारेच नवीन भासत होते. त्यावर धुक्याचा विरळ पडदा अन् आजूबाजूला अगदी वेगळ्या पेहरावाचे, रंगाचे आणि वेगळी भाषा बोलणारे लोक हिंडत

होते. एकंदरीत साऱ्या इमारतीचे वास्तुशिल्पही आपल्या कोणत्याही तशा मध्यम गावापेक्षा वेगळे. अशा त्या वातावरणामुळे एकदम एका अद्‌भुतरम्य वातावरणात येऊन पडल्यासारखे वाटत होते.

बर्फ तुडवीत आम्ही गावाच्या मध्यभागात पोहोचलो. ट्रामऐवजी चालणेच पसंत केले होते. एक तर नव्या ऊबदार कपड्यात त्या थंडीतून चालायला हवेसे वाटत होते व आपण तीनचार महिने काढणार आहोत त्या गावाचा चेहरामोहरा आणि लोक पाहण्याची, जाणण्याची उत्सुकता होती. उगाचच एका 'विविध वस्तू भांडार' मधून फेरी टाकून आलो. नंतर फिरत फिरत विद्यापीठाकडे जाण्याचा बूट निघाला. वास्तविक आता अंधार पडला होता. पण तरीही ती कल्पना सगळ्यांनी उचलून धरली. एका आडबाजूच्या मधल्या वाटेने आम्ही गेल्यामुळे पुन्हा शान्त शान्त भासत होते.

विद्यापीठाच्या तांत्रिक शाखेच्या इमारतीजवळ पोहोचलो तेव्हा ती तीन मजली इमारत तिच्या लांबीमुळेच मनावर ठसली. विद्यापीठाची ही इमारत नवीन असल्याने पूर्वीच्या इतर इमारतीसारखी दगडी नाही. झटपट बांधण्याच्या खास पोलिश तंत्रानुसार सिमेंट व विटांचे निरनिराळे भाग वापरून बांधलेली आहे. बाहेर अंधुक प्रकाश असला तरी आत झगझगाट होता. संध्याकाळीही कोणते ना कोणते वर्ग चालूच असतात. आल्यासारखे आम्ही अभ्यासक्रमासाठी मिळणारे साहित्यही ताब्यात घेऊन टाकले व परत निघायचे ठरवलं. अभ्यागतगृहात पोहोचण्यापूर्वी जेवणही उरकायला हवे होते. पिओत्रोविचने आम्हाला एका बड्या हॉटेलात नेले. वॉर्सातल्या हॉटेलसारखी तेथे 'सायंनृत्य भोजना'ची तयारी चालू झाली होती. पुन्हा दुपारचाच प्रसंग टाळण्यासाठी आम्ही एकमताने ऑम्लेटचीच ऑर्डर देऊन टाकली व त्याच्यासाठी लठ्ठ बिल देऊन बाहेर पडलो.

चालण्याची आता पायांची तयारी नव्हती म्हणून टॅक्सी करायचे ठरले. आणि एकदाचे खोलीवर परतलो. खूप थकूनही गेलो होतो तेव्हा सामान लावण्याच्या व पहिल्याच दिवसाच्या अनुभवावर एक गप्पाष्टक भरवण्याच्या कल्पनेस विराम देऊन ऊबदार दुलईत शिरलो. अद्भुतरम्य वातावरणातून स्वप्नमय वातावरणात शिरण्यासाठीच जणू!

० ० ०

# ३. फिनिक्सच्या वारसांची पहिली ओळख

दुसऱ्या दिवशी सकाळी तांत्रिक विद्यापीठाच्या आवारात पाऊल टाकले तेव्हा पोलिश विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ते अगदी फुलून गेले होते. आम्हा नवीन पाहुण्यांकडे ते मोठ्या कुतूहलाने पाहात आपआपल्या वर्गाकडे जात. आमच्याबरोबरचा पिओत्रोविच जाणाऱ्यायेणाऱ्या त्याच्या ओळखीच्या प्रत्येकाशी सहास्य वदनाने काही तरी पुटपुटत होता. बहुधा 'गुड मॉर्निंग' च्या स्वरूपाचेच ते असावे; पण आम्हाला काहीच माहिती नसल्याने कुणाशी ओळखदर्शक शुभेच्छा व्यक्त करताना व हस्तांदोलन करताना त्याने 'इंडी', 'इंडी' असे सांगितल्यावर आम्ही केवळ हास्य व हस्तांदोलन फार तर 'कोपर्डेकर फ्रॉम इंडिया' असे पुटपुटत पुढे जात असू.

तिसऱ्या मजल्यावरील प्रा. झारैंबा यांच्या खोलीत नेऊन आम्हा सर्वांची ओळख करून देण्यात आली. आपल्या अगदी आपुलकीच्या माणसाचे स्वागत करावे इतक्या उत्साहाने त्यांनी उठून आमचे स्वागत केले. त्यांच्या हस्तांदोलनातली आपुलकीच इतकी बोलकी होती की पंढरीचे वारकरी एकमेकांना भेटताना अनेकदा कडकडून मिठी मारल्यावर एकमेकांचे कुशल विचारतात तेवढा सगळा भेटीचा कार्यक्रम त्यांच्या

त्या हस्तस्पर्शातच झाल्यासारखे वाटले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राध्यापक व नगररचनाकार आपल्याशी इतक्या मोकळेपणाने भेटले, बोलले ह्या गोष्टीमुळे आम्हालाही धन्य वाटले. त्या स्वागतात औपचारिकपणा अजीबात नव्हता.

त्या उंच्यापुर्‍या व्यक्तिमत्त्वाच्या लालसर गोर्‍या व गोलसर चेहर्‍याला शोभणार्‍या चष्म्यातून त्यांनी पाहिले म्हणजे तोंडाऐवजी डोळेच प्रथम आपल्याशी बोलत आहेत असे वाटे. बोलण्यात युरोपियन पद्धतीचे उपचार ( पावलोपावली, आभारी आहे, कृपा करून – वगैरे ) असले तरी औपचारिकपणा नव्हता. आमच्या नावानिशी ओळखी झाल्यावर प्रथम त्यांनी कोणताही मोठेपणा न दाखवता व मोजक्याच शब्दांत स्वतःची ओळख करून दिली. पोलंडमधील व बाहेरच्या त्यांच्या कामांची माहिती दिली. तदनंतर भारताबद्दल स्वतःला व सर्वच पोलिश लोकांना किती आस्था वाटते तेही सांगितले. नेहरू, गांधींच्या शान्तता प्रयत्नांचा, आपल्या पाच हजार वर्षांच्या संस्कृतीचा थोडक्यात गौरव व्यक्त केलाच. त्याबरोबर आपला देश एक हजार वर्षांचा असला व युद्धात सर्वनाशाप्रत जाऊन पोहोचलेला असतानाही नंतर केवढी प्रगती केली ती तुम्ही प्रत्यक्ष पाहालच, अशी पुरवणीही जोडली. सगळ्या बोलण्यात, विचारात, औपचारिकपणा, आत्मगौरव वा विनाकारण परगौरव नसून उलट वस्तुनिष्ठ दृष्टिकोनच व्यक्त होत होता.

भारतीयांबद्दलच्या सहानुभूतीची कारणे एक प्राचीन संस्कृती असलेला देश, शान्तताप्रियता, साम्राज्यवादाशी लढा हीच असावीत. तसेच युद्धकाळात व स्वातंत्र्य चळवळीतील परस्पर सहानुभूतीही असावी. काश्मीरबाबत व भारत-पाक संघर्षाबाबत भारताविषयीची त्या लोकांची सहानुभूती ही बव्हंशी उत्स्फूर्त स्वरूपाची होती, असे त्यांनी सांगितले. भारताबद्दल अधिक बरेच काही आम्हाला जाणून घ्यावयाचे आहे, त्या दृष्टीने निरनिराळ्या मंडळांमध्ये तुमच्याबरोबर चर्चा, व्याख्याने वगैरे

ठरविण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले. मुख्य अभ्यासक्रमाची थोडक्यात कल्पना दिली व नंतर स्वतःच चालू असलेल्या वर्गात घेऊन गेले व हे भारतीय प्रतिनिधी, अशी ओळख करून देऊन आपल्या कामास निघून गेले.

विकसनशील देशातील नगररचना तज्ज्ञांकरता आयोजिलेल्या या अभ्यासक्रमाकरिता एकंदर सोळा प्रतिनिधी आले होते. पैकी आठ भारतीय, एक मेक्सिकोतील दांपत्य, सीरीयातले तीन व इराण, घाना, नायजेरिया यातून प्रत्येकी एक असे प्रतिनिधी होते.

पहिल्याच दिवशी अभ्यासाला सुरुवात करायची नसते, ही बालवर्गापासून चालत असलेली परंपरा मोडायला माझी तयारी नव्हती आणि इतर सर्व देशातूनही अशीच परंपरा आहे, हे कळून आल्यावर आंतरराष्ट्रीय एकात्मतेचा साक्षात्कार झाला एकदम सगळ्यांना ! तेव्हा केवळ परस्परपरिचय, विद्यापीठाच्या आवाराची पाहणी, जमल्यास गावातून एखादी चक्कर मारायची, असा ठराव एकमताने पसार झाला.

मी, पिओत्रोविच व आणखी एकदोघे विद्यापीठात इकडेतिकडे हिंडून ऑफिस, कॅन्टीन ( सगळ्यात हे महत्त्वाचे एक तर इतक्या थंडीत चहाची तलफ जास्तच येणार व शिवाय व्याख्यानाचे तास नसले किंवा व्याख्यानाला जायचे नसले तर वेळ घालवायची जागा माहीत हवी ) या दृष्टीने पाहणी करून सरळ गावात भटकायला बाहेर पडलो.

फेब्रुवारीच्या या तिसऱ्या आठवड्यातही स्टेचीन गाव बर्फमयच असते. ओद्रा नदीतील बर्फच साठलेले असते. कित्येक वेळा वरच्या गावांना असणारा पुराचा धोका कमी करण्यासाठी हे बर्फ बॉम्ब वगैरे टाकून फोडावे लागते. तसा कार्यक्रम नुकताच पार पडला होता. ओद्रा ही नदी पूर्व जर्मनी व पोलंड याच्या सरहद्दीवरच्या प्रदेशातून वाहत असल्याने या बॉम्बहल्ल्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य करावे लागते.

आणि या हल्ल्यानंतर बर्फाच्या तुकड्यांना घेऊन हे नदीचे पाणी इतक्या वेगाने समुद्राकडे वहात सुटते की, त्या पांढऱ्या तुकड्यांना पळताना पहातच बसावे, मोठीच मजा वाटते !

स्टेचीन हे कलकत्त्यासारखे अंतर्भागात वसलेले बंदर आहे. समुद्रापासून पासष्ट किलोमीटर आत असून बऱ्याचशा मोठमोठ्या बोटी येथपर्यंत येतात. बोटी बांधण्याचा एक कारखानाही आहे इथे.

गावातून हिंडतांना पिओत्रोविच आम्हाला रस्त्यांची व चौकांची नावे सांगत होता, पण ती ऐकल्यावर पाठ व्हायला कित्येक दिवस लागतील, अशी अधिकाधिक खात्री पटत होती. तरीही लहान मुलांना रामरक्षा शिकवताना एकेक शब्द फोडून सांगून पाठ करण्याचा प्रयत्न आपण करायला लावतो तसे हा निपोदलेगवोश्चि, हा अल पियास्तूफ, हा वायरोब्रेगो वगैरे तो सांगत होता व आम्ही मुखोद्गत करण्याचा प्रयत्न करीत होतो. मुळात त्याचे इंग्रजीही मोडकेतोडकेच होते. तरीही आमचे स्वच्छ इंग्रजी उच्चार आवडल्याचे त्याने सांगितले. साहेबाचे अस्सल इंग्रजी त्यांनाही अवघडच जाते. चला. आपले इंग्रजी युरोपियन माणसाला आवडले हाच आम्हांला आनंद होता.

प्रथम एक शब्दकोश व ' हाऊ टु से इट इन पोलिश ' असे एक पुस्तक घेऊनच तो आमच्याबरोबर फिरायचा. नंतर ही दोन पुस्तके त्याचे प्राणच झाली होती म्हाणाना ! कोठेही जाताना तो ती दोन्ही बरोबर ठेवायचाच. आम्हाला काय पाहिजे ते सांगायला त्याच्या शब्दकोशाच्या इंग्लिश-पोलिश भागाचा उपयोग व्हायचा किंवा त्यालाही आमच्याशी बोलताना पोलिश-इंग्लिश भाग बघायला लागायचा. पिओत्रोविच बरोबर नसला तर आमचीही व्यवहार करताना त्रेधातिरपिट उडायची. टूथपेस्ट पाहिजे असली तर दुकानात चक्क दातावर बोट फिरविण्याची कृती करून दाखवायची व ब्रशच पुढे आला

तर त्याच्या टयूबमधून पेस्ट उतरवण्याची क्रिया करून दाखवावी तेव्हा ती पेस्ट मिळायची. तसेच डोक्याला लावायच्या तेलाचे किंवा ब्लेडचे. पुष्कळ वेळा वस्तूकडे बोट दाखवूनही एखादी वस्तू मागता येई. मात्र लहान, मोठे, चांगले वाईट वा दर-दाम याबद्दल चौकशी करता येत नसे. एक मोठीशी नोट पुढे करायची व मिळेल ती मोड परत खिशात टाकायची. सर्व वस्तूंवर किंमतीचे लेबल असायचे. पुढेपुढे दुकानेही ठराविक होऊन गेली. तोपर्यन्त मात्र खाणाखुणा व शब्दकोश किंवा चित्रे काढून दाखविले अशा युक्त्यांच्या साहाय्याने व्यवहार करताना खूपच धांदल होत असे. अंगावर थंडीच्या प्रचंड कपड्याचे ओझे, हातात टोपी वा इतर काही साहित्य सांभाळत, चष्म्यावरील व अंगावरील बर्फ झटकीत रांगेतून उभे राहून खाणाखुणांनी व शब्दकोशाच्या साहाय्याने व्यवहार करीत असतानाचे ते स्वतःचे चित्र मनापुढे उभे राहिले म्हणजे मला नेहमी मोठी गंमत वाटते.

सगळ्याच दुकानांमध्ये, ऑफिसातून, कॅन्टीनमधून, फार काय ट्राम चालवायला व पत्रे वाटायलाही सगळीकडे स्त्रियाच छत्तीस पडत. सगळे पुरुष कोठे कामाला जातात हा प्रश्न शेवटपर्यन्त अनुत्तरीतच राहिला. सकाळी उठले म्हणजे रस्त्यावरून जाणाऱ्या स्त्रियांच्या उंच टाचेच्या बुटांची कट्-कट् जी ऐकू यायला सुरुवात व्हायची ती दुपारपर्यन्त. संध्याकाळी मात्र जणू कुठे तरी गुप्त झालेले सगळे पुरुष परत येत असावेत. कारण कचेऱ्या सुटल्या की, हिंडायला फिरायला बरोबर जाण्याचा या लोकांना मोठाच षौक आहे.

जेवणे बहुतेक सगळी तयार पदार्थापासून किंवा फ्रीजमधल्या पदार्थांपासून, नाही तर बारमध्येच. त्यामुळे हिंडणेफिरणे, सहली व अशा इतर गोष्टींसाठी त्या लोकांना भरपूर वेळ मिळतो. आमच्याकडच्या बायकांचा साराच वेळ लोणची, पापड, चटण्या, कोशिंबिरी या

पेशवाई जेवणाच्या थाटात जातो. मिल्कबार, एवस्ट्रॉबार व टुरिस्ट बार अशा विविध चवींच्या व निवडींच्या पदार्थांचे स्वयंसेवा असलेले बार येथे खूप. अर्थात काही उच्चभ्रू व परदेशी पाहुणे अशांसाठी खास हॉटेलेही आहेत. पण जास्ती करून अशा बारची व तयार पदार्थांची विक्री करणाऱ्या डेलीकाटेसी अशा दुकानांची संख्या फारच मोठी.

दुकाने अगदी टापटिपीने मांडलेली, नीटनेटकी व स्वच्छ आहेत आणि मोठ्या प्रमाणावरील दुकानांची संख्याच जास्त, छोटीछोटी क्वचितच. दुकानातले सगळे व्यवहार रांगेने व शिस्तीने चालतात. त्याची प्रथमप्रथम नवलाई वाटली तरी नंतर त्या रेखीव शिस्तीचा कंटाळाच येतो. वस्तू निवडून घ्यायची, काऊंटरवर पैसे द्यायचे, यात हे नाही काहो तुमच्याकडे ? त्याची किंमत काय, जरा दर कमी करा की हो ! यात जी काय एक मजा असते ती या लोकांना मिळत नाही. शिवाय दुकानात गांधी, नेहरूंपासून तमाम नटनटी व तेहतीस कोटी देवांपैकी कित्येकांचे फोटो मालावर व कॅलेंडरावर किंवा जाहिरातीमध्ये झळकत असतात आपल्याकडे ! तेही नाही यांच्या दुकानात. दुकाने सगळी फक्त मालानेच ठेचून भरलेली. काही भाग मोकळा असलाच तर एखादे पेन्टिंग वा फुलझाडे वगैरे ठेवून आपली सौंदर्यदृष्टी व्यक्त केलेली. ना पुढाऱ्यांचे फोटो ना आराम हराम हैं किंवा अशीच काही बोध वा संतवचने. कदाचित तत्त्वे टांगून ठेवण्यापेक्षा आचरणात आणण्यावर त्या लोकांचा अधिक विश्वास असावा.

जाता जाता गावाच्या मध्यभागात असलेले पिओत्रोविचचे घरही पाहिले. अगदी मध्यवस्तीत, मुख्य बाजाराच्या जवळ, नवीन बांधणीचे व सर्व आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असे तीन खोल्यांचे घर होते ते. घरभाडे विचारण्याचा मोह अनावरच होता. किती असेल. कल्पना करा. फक्त २५ ते ३० रुपये भाडे देऊन अशी जागा मिळणे तेवढे सोपे

नसले तरी आपल्यासारखे अवघड खासच नाही. नोकरीबरोबर थोड्याच काळात सरकार, नोकरीस ठेवणारी संस्था अथवा सहकारी संस्था यांच्यातर्फे घराची सोय होऊ शकते. घराची बांधणी व रचना मात्र अती काटकसरीची व जेवढ्यास तेवढी " फंक्शनल आर्किटेक्चर " या तत्त्वाचा अगदी पराकोटीचा उपयोग.

मात्र घरात पुस्तकांचे व तबकड्यांचे एक प्रचंड कपाट, सुरेखशीच व निवडक चित्रे, कोपऱ्यात फुलझाडे, पडदे, फोटो व कलापूर्ण व्यवस्था. टेबलावर वा कपाटावर एखादा फोटो व काही छोट्यामोठ्या स्मरणिकांची कलात्मक रचना व रस्त्याच्या बाजूला सबंध काचेतून रस्त्याचे दृश्य ! पहायचे नसेल तेव्हा त्यावर ओढायचा रंगीबेरंगी व पांढरा असे दोन पडदे. हे साधारणतः फ्लॅटच्या धर्तीच्यां प्रत्येक घरातले दृश्य !

एकंदरीत त्या दिवशीच्या फेरफटक्यातून पोलीश लोकांचे अगत्य, रंग व शिस्तप्रियता, कलात्मक वृत्ती आणि आचारविचारांचे एक ओझरते दर्शनच आम्हाला घडले !

० ० ०

# ४. पोलिश भाषेशी झटापट आणि इतर गोष्टी

पोलंड हा देश तसा फार मोठा नाही. महाराष्ट्र राज्याशी त्याची बऱ्याच बाबतींत तुलना होऊ शकेल. पोलंडची १९६३ सालची लोकसंख्या आहे ३०,९४,००० आणि क्षेत्रफळ आहे ३,१२,५०० चौरस किलोमीटर्स. ५ हजार वा त्याहून अधिक लोकवस्तींची गावे पोलंडमध्ये ५०९ तर महाराष्ट्रात २६६ व एक लाखाहून अधिक वस्तीची अनुक्रमे २२ व १२. पोलंडच्या समुद्रकिनाऱ्याची लांबी

५२४ कि. मी. आहे. तर महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्याची लांबी ७०० कि. मी. आहे. मात्र दोन्हींच्या भौगोलिक रचनेत व हवामानात बराच फरक आहे. तात्रा पर्वताची रांग तेथे दक्षिण सीमेवर आहे व समुद्र उत्तर सीमेला. आमचा सह्याद्री समुद्रालगतच्या पश्चिम प्रदेशातच आहे. मात्र पोलंडच्या मुख्य नद्या ओद्रा व व्हिस्तुला तशा आमच्या कृष्णा–गोदावरी म्हणता येतील.

पोलंडचा अलीकडचा इतिहास सुमारे हजार वर्षांचा आहे. ९६६ सालचे इब्राहिम इबन जेकब या अरब व्यापाऱ्याचे पोलंडबद्दलचे वर्णन हा पोलिश राज्याबद्दलचा पहिला उल्लेख मानण्यात येतो. ९६६ सालातच म्येश्को या पहिल्या राजाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला. आणि म्हणूनच १९६६ हे साल पोलिश देशाचे हजारावे वर्ष म्हणून साजरे करण्यात आले आहे. या संदर्भात एक गमतीदार गोष्ट ऐकायला मिळाली.

पोलिश लोक हे तसे फार धार्मिक नसले तरी चर्च व बिशप यांना बरेच मानतात. अन् याच कारणास्तव राजसत्तेला त्यांच्याविरुद्ध जाता येत नाही. एखादा संघर्ष निर्माण झालाच तर सत्तेपेक्षा धर्मगुरूंचा आदेश लोक उचलून धरतील, अशी भीती कदाचित वाटत असावी. याचे कारण चर्चचा कल पाश्चिमात्यांकडे आहे म्हणण्यापेक्षा जर्मनांच्या अधिक वर्चस्वाखाली आहे. पोपना पोलंडमध्ये येऊ न देण्यात लोकांवरचा धार्मिक पगडा अधिक वाढू नये हाच हेतू असण्याची शक्यता आहे. मात्र एक गोष्ट खरी की, पोलंडमधील एकंदर विरोध पाश्चिमात्यांच्या विरुद्ध नसून ( उलट जवळीकच वाटते ) जर्मनांच्या विरोधी आहे. ही गोष्ट त्यांच्या लिखाणात, बोलण्याचालण्यात नेहमी स्पष्ट होत असते. युद्ध व विनाश यांतून नाझीवादामुळे पोळून निघालेल्या त्यांच्या मनाची ही एक साहजिक अशी प्रतिक्रिया असावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांग
अनुक्रम ७५२७६ दि. २१५ ७।८५

या देशाचा इतिहास तसा फार मोठा नसला तरी लढाया व जाज्वल्य देशाभिमान यामुळे त्यांची प्रगती अधिक वेगाने होत आहे, असे म्हणायला हरकत नाही.

राज्यशासन व समाजव्यवस्था ही कम्युनिस्ट धर्तीची असली तरी पूर्णपणे रशियाच्या पद्धतीची नाहीत. त्यांचा ओढा याही बाबतीत पश्चिमेकडे अधिक आहे. अमूक शासनपद्धती चांगली असे आपल्याला आज तरी म्हणता येत नाही. अमेरिकेतील पूर्ण स्वातंत्र्य किंवा साम्यवाद्यांचे पूर्ण नियंत्रण यांच्या प्रत्येक पायरीत फायदेतोटे आहेत. परंतु त्यांच्या मधला एखादा मार्गक्रम बरा असे मानण्यात ( निदान प्रगतीपथावरील देशांना तरी ) येते. पोलंड व काही आजूबाजूच्या देशांची त्याच दिशेने वाट चाल सुरू आहे असे वाटते.

पोलंडमध्ये नियंत्रणे बरीच असली तरी हळूहळू ती सैल होत आहेत. असे शेती, कारखानदारी, शिक्षण वगैरे सर्वच बाबतीत म्हणता येईल.

विद्यार्थ्यांना पोलिश भाषेबरोबर काही निवडक परभाषा शिकाव्याच लागतात. या भाषा शिकवण्यावर युद्धकाळातला एक विनोद सांगतात.

‘ कोणती भाषा शिकतो आहेस ? ’ या प्रश्नाला उत्तर ‘ रशियन ’ असे आले तर म्हणायचे, तू निराशावादी दिसतोस ! ‘ इंग्लिश ’ असे आले तर फारच आशावादी दिसतोस म्हणत तर ‘ फ्रेंच ’ असे आले तर ‘ मूर्ख ’ आहेस म्हणत, कारण फ्रेंचांचा प्रभाव जवळजवळ संपत आला होता.

एके काळी फ्रान्समधूनच बरेचसे लोक उच्च शिक्षण घेऊन येत. नंतर रशिया व आता इंग्लंड–अमेरिकेत जाऊन शिकून येणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

रशियन व अमेरिकन राहणीमानाबद्दलही एक विनोद सांगितला जातो की, रुझवेल्ट व स्टालिन भेटले असताना पुढील प्रश्नोत्तरे झाली:

स्टालिन——अमेरिकेतील सर्वसामान्य माणसाचे उत्पन्न किती आणि त्याचा खर्च किती ?

रुझवेल्ट—— ३०० डॉलर उत्पन्न व १५० डॉलर खर्च.

स्टालिन——मग उरलेल्या डॉलर्सचे तो काय करतो ?

रुझवेल्ट——मला त्या चौकशीची काय जरूर ! पण काय हो, रशियात काय परिस्थिती आहे ?

स्टालिन——उत्पन्न असेल ८०० रुबल्स व खर्च साधारण १०५० रुबल्स !

रुझवेल्ट——मग वरच्या २५० रुबल्सचे काय ? कोठून आणतो तो ?

स्टालिन——मला त्या चौकशीची काय जरूर ?

यातला विनोद सोडून दिला तरी राहणीमानातल्या व उत्पन्नातल्या तफावतीतील फरक राहतोच. मिळकत व खर्च यातली तफावत भरून काढून योग्य असे राहणीमान राखण्यासाठी पोलंडमध्येही सर्वसामान्य माणसास अधिक काम करावे लागते.

साधारणत : शिक्षण संपल्यानंतर सरकारने देऊ केलेल्या तीनचार नोकऱ्यांपैकी ( सगळे व्यवसाय जवळजवळ सरकारीच असल्याने ) एक निवडावी लागते. शिक्षणक्रमाची निवड सरकारी सवलतीमुळे पालकांच्या आर्थिक स्थितीवर फारशी अवलंबून नसते. उच्च शिक्षण अर्थात थोडेच घेतात. कारण 'मॅगिस्टर' या एका ठराविक पातळीपर्यंतचे शिक्षण, एकदा विद्यापीठात प्रवेश केला की सर्वांचेच पुरे होते. बी. ए. व नंतर एम. ए. अशा दोन पाळ्या नाहीत. शिक्षणक्रमानुसार ४ ते ५ वर्षे विद्यापीठात 'मॅगिस्टर' या पदवीसाठी काढावी लागतात. नंतरचे

आणखी शिक्षण म्हणजे दुसऱ्या एखाद्या विषयाचे 'मॅगिस्टर' होणे किंवा डॉक्टरेट. इंजिनिअरिंग व मेडिकल यांकडे ओढा अर्थात बऱ्याच जणांचा असतो. याशिवाय डिप्लोमासारखे इतर अभ्यासक्रम आहेतच.

इंजिनियरिंग वा आर्किटेक्चरमधील मॅगिस्टरपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर सुरुवातीला साधारणतः सरासरीचे उत्पन्न महिन्यास २००० झोटी ( सध्याच्या हिशोबाने ६६६ रुपये ) पडते. अर्थात एक ठराविक वरच्या दर्जाचे राहणीमान राखायचे असेल तर आणखी ८०० ते १००० झोटी तरी मिळावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते व त्या दृष्टीने प्रत्येकाला आणखी एकदोन अर्धवेळ कामे पत्करता येतात व राहणीमान उंचावत येते. अशा काम करण्याचा त्या व्यक्तीला तर फायदा असतोच, पण शिवाय एकूण राष्ट्राच्या उत्पादनवाढीसही उपयोग होतो. याशिवाय स्त्रियांतही नोकरी करण्याची प्रवृत्ती जास्त असल्याने एकंदर काम करू शकणाऱ्या वयोमर्यादेतील जास्त व्यक्ती प्रत्यक्ष कामे करीत असतात व या सगळ्यांमुळेच केवळ अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाणही कमी व एकंदर सरासरी दर माणशी राष्ट्रीय उत्पन्नही जास्त होते.

अगदी वेगळ्या वातावरणात व वेगळ्या भाषेच्या लोकांशी व्यवहार करताना किती व कशा अडचणी येतील हे कधीच सांगता येणार नाही हे खरे, पण कित्येक वेळा खाणाखुणा करून अथवा चित्र काढून दाखवून किंवा अशाच काही मार्गाने त्या सोडविता येतील, पण डॉक्टरकडे गेल्यावर काय करायचे हा प्रश्न पुष्कळदा मनात डोकवायचा आणि एक दिवस तीवेळ खरोखरीच आली. खरे म्हणजे माझे डोके दुखले त्याची गोष्ट अशी एक सुरस व चमत्कारिक कथाच त्यावर लिहिता येऊ शकेल.

त्या दिवशी डोके फारच दुखत होते. बरे, त्याला बेटयाला भाषेची

अडचण सांगून उपयोग नव्हता. औषधच पाहिजे होते. पिओत्रोविच या आमच्या दोस्ताकडे जाऊन शब्दकोशाच्या साहाय्याने डोके दुखत आहे असे समजावून दिले. खाणाखुणा व चित्र काढून ही गोष्ट समजाविणे म्हणजे अशक्यच. त्यातून डोके आहे की नाही असला अर्थ उत्पन्न व्हायचा आणि अॅस्प्रो, सारीडॉन, अॅनासिन वगैरे नावाची येथील रूपे माहिती नव्हती. पिओत्रोविचने स्वतःजवळची एक 'ओद बोले ग्वोही' नावाची गोळी तात्पुरती औषध म्हणून दिली व दुपारी विद्यापीठाच्या डॉक्टरांकडे घेऊन गेला. तेथे गर्दी बरीच होती. पिओत्रोविचने नर्सला काहीतरी समजावून सांगितले. तिने मला थर्मामीटर लावायला दिला. 'न्ये न्ये' ( नाही नाही ) म्हणून तिला पटेना, थर्मामीटर पाहिल्यावरच ताप नाही अशी तिची खात्री पटली.

प्रत्यक्ष डॉक्टरांनाही 'येस, नो' एवढेच इंग्रजी येत होते. पिओत्रोविचने त्यांना काय सांगितले कोणास ठाऊक; त्यांनी ब्लडप्रेशर, नाक, घसा, डोळे, दाढा सगळे तपासून पाहिले. मला फक्त डोकेदुखीवर औषध पाहिजे आहे ही गोष्ट त्यांना नीट सांगता येईना. त्यांनीही काहीतरी समजावून सांगण्याचा प्रयत्न करून सोडून दिला व शेवटी पोलिश भाषेतच पिओत्रोविचला काहीतरी सांगितले. त्याचा मतितार्थ एका इंग्रजी जाणणाऱ्याच्या साहाय्याने कळला. तो म्हणजे 'सायनस' तपासण्यासाठी एक्सरे काढायचा आहे. मी त्यांना म्हटले की, अहो, साधी 'डोकेदुखी' आहे. हवामानाच्या बदलामुळे असेल पण त्यांचा सल्ला की, डॉक्टर म्हणतील त्याप्रमाणे वागावे. घ्या ना काढून, काय बिघडले ? तात्पुरते औषध म्हणून लिहून दिलेल्या गोळ्या आणण्यासाठी आप्तेका ( औषधाचे दुकान ) त शिरलो.

तेथे एका प्रचंड रांगेत उभे रहावे लागले. विविध चित्रे वा जाहिराती अभावानेच तळपत होत्या. कोपऱ्यात फुलझाडांच्या कुंड्या होत्या

व समोर लांबचलांब काऊंटर होता. पाठीमागे एप्रन लावलेल्या दोनतीन बायका होत्या. त्यांच्यामागच्या शेल्फात फारच थोड्या बाटल्या दिसत होत्या. एवढ्या रांगेला या औषधे कोठून पुरवितात असा मला प्रश्न होता पण तो समजावून सांगून विचारणे कठीण होते. आत एखादे कोठार असेल बहुधा, असे माझे मीच उत्तर देऊन घेतले. एकंदरीत दुकान शान्त व साधे होते.

त्या प्रचंड रांगेतून प्रथम बिल ध्यायचे व पैसे भरायला पुन्हा दुसऱ्या रांगेत उभे रहायचे. हिशोबाचे यंत्र बंद पडलेले दिसले. कॅशियर बाई गोट्यांच्या मोठ्या पाटीवर हिशेब करीत होत्या. पैसे भरून पावती घेतल्यावर औषध घेण्यासाठी पुन्हा तिसरी रांग.

या लोकांच्या रांगबाजीचा काही वेळा फार राग येतो. या लोकांना हिंदुस्थानात पाठवून बिनरांगेने व्यवहार कसे पार पाडावेत हे शिकवायला हवे, असे वाटू लागते. दिल्लीच्या बसमध्ये मारामारी करून चढायला लावावे आणि मुंबईच्या लोकलमधून धक्काबुक्की करून उतरायला सांगावे. त्यामुळे जी वीरश्री वाढते जे धैर्य येते ते त्याशिवाय नाही समजायचे यांना.

एक्सरे काढायला गेलो तेथे गर्दी बरीच होती. स्त्रियांचे प्रमाण येथेही जास्त होते. 'आजारी पडण्याचे काम' स्त्रियाच करतात की काय, अशी एक शंका मनात येऊन गेली. त्या मोठ्या दालनात एक गुबगुबीत मांजर फिरत होते. तेही एक्सरे काढायला आले होते की काय ! सहज मनात विचार आला, 'मोहिनी'साठी फडणीसांनी या मांजराचे चित्र काढले तर– तर एक्सरेच्या प्लेटवर पोटातले उंदीर चावचाव करीत आहेत असे पाहून डॉक्टर चकित झालेले दाखवतील. मनातल्या मनात हे चित्र कल्पून खूप हसलो. हसणे बाहेर दाखवायचे म्हणजे हा विनोद समजून सांगायला हवा. अन् काही पोलिश शब्द

व बाकीचे इंग्रजी शब्द मिळून सांगता सांगता आपलीच त्रधो उडायची !

एक्सरे संध्याकाळी मिळाला. तो घेऊन दुसऱ्या दिवशी डॉक्टरांकडे गेलो. आज डॉक्टर नवीन होते. पण सुदैवाने एक इंग्रजी जाणणारे गृहस्थ बरोबर होते. एक्सरेत काही नाही म्हटल्यावर डॉक्टरांनी पुन्हा ब्लड प्रेशर, कान, नाक, घसा वगैरे तपासले व शेवटी निष्कर्ष निघाला किरकोळ डोकेदुखी आहे. या गोळ्या घ्या व जरा कॉफी वगैरे जास्त घ्या म्हणजे इथली थंडी फार त्रासदायक नाही व्हायची.

एकंदरीत ही भाषेची अडचण पदोपदी नडत होती तेव्हा सर्वांतर्फे प्राध्यापकांना विनंती केली की, भाषेचा एक वर्ग ठेवा. मोठ्या उत्साहाने त्यांनीही एक भाषाशिक्षक पकडून आणून त्वरित सर्व व्यवस्था केली.

दुसऱ्या दिवसापासून शाळेतील मुलांसारखी घोकंपट्टी सुरू झाली.

हे काय आहे ?

ते टेबल आहे.

सामुदायिकरित्या शब्द घोकायला मोठी मजा वाटते. भाषेच्या वर्गाची छायाचित्रेही लगेच स्थानिक वर्तमानपत्रातून झळकली.

पोलिश ही ' स्लाव्ह ' वर्गातली भाषा. संस्कृतशी तिचे थोडेफार साधर्म्य आहे. त्यामुळे व्याकरण अगदी प्रचंड पाठान्तर करायला हवे असे आहे. चक्क रामः रामौ रामाः । व गच्छामि गच्छामः गच्छामः । असे पाठ करायला हवे. अगदी गुरुदाक्षिणेतील कारिका म्हणून राक्षसाला घाबरण्यासारखे पाठान्तर करायचे. छे ! ही गोष्ट आता जमणे महाकर्मकठीण. त्यातून संस्कृतसारखे सूत्रबद्ध काहीच केलेले नाही.

एकदोन पाणिनींची निर्यात आपण यांच्याकडे पूर्वीच करायला पाहिजे होती असे वाटले. पण आता काय उपयोग ! शेवटी आम्ही शब्द फक्त माहिती करून घ्यायचे व विभक्ति–प्रत्यय रहित त्यांचा वापर

करायचे धोरण अमलात आणले. त्यातून अभावित विनोद घडत किंवा अर्थ समजून घेताना ऐकणाऱ्याची धांदल उडे. 'मी शाळेत जातो' असे म्हणण्याऐवजी मी–शाळा–जाणे असे कोणी म्हणू लागला तर कसे वाटेल आपल्या कानाला ?

त्यातून मुळाक्षरेही इंग्लिशपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे उच्चाराप्रमाणे बव्हंशी स्पेलिंग असले तरी ch म्हणजे श, cz म्हणजे च वगैरे आधी पाठ व्हायला हवे. तरी काही शब्दांमधले साधर्म्य मोठे मजेशीर वाटते.

त्सुकेर–साखर, चोचा–आत्या, व्दे–दोन, मात्का–माता वगैरे.

० ० ०

# ५. स्टेचीनचा फेरफटका

प्रा. वोझाचिन्स्कींच्याबरोबर स्टेचीनचा फेरफटका मारण्याचे बरेच दिवस घाटत होते. तो यांग एक दिवस आला. मोटारीत बसताना त्यांनी एक नकाशा हातात ठेवला व आपला मार्ग त्याच्यावर पहात जा असे बजावले. स्टेचीनच्या मुख्य भागातून व उपनगरातून बरीच लांबची फेरी त्या दिवशी झाली.

शहरातले तीन भाग त्यातल्या त्यात मनावर ठसले. अगदी पहिला म्हणजे उत्तरेकडचा मिकीविचा रस्त्याच्या दोन्ही बाजूंचा भाग. यात प्रामुख्याने एक व दोन कुटुंबांकरिता असलेल्या बंगलेवजा घरांचाच भरणा जास्त होता. बहुधा सगळीच निमूळत्या छपरांची घरे. मागेपुढे सुरेख झाडे, वेली असलेली. पुण्याच्या जिमखान्यावरची सगळीच घरे बॅ. जयकरांच्या घरासारखी असतील तर तो भाग कसा. अर्थात येथील घरांची ठेवण बरीच जुन्या व ठशीव प्रकारची. क्वचितच एखादे घर

आधुनिक वास्तुशास्त्राच्या आधारावर बांधलेले. थंडीचा मोसम असल्याने सर्वच घरे, दारेखिडक्या बंद करून, घट्ट पडदे लावून, बंद ठेवून, एकमेकाला चिडीचूप करून, बसल्यासारखी वाटत होती. क्वचित एखाद्या ठिकाणी खेळणारी मुले दिसत होती. नाही तर सारे कसे शान्त शान्त.

तेथून पुढे तसेच ग्वेंबोकी तलावाच्या बाजूला फेरफटका मारला. वाटेत एका बाजूला अगदी छोटे छोटे फ्लॉट्स व त्यात छोटी छोटी लाकडी घरे दिसली. प्राध्यापक म्हणाले, " या आहेत खाजगी बागा. प्रत्येकाचे ' बीअर गार्डन 'च म्हणाना किंवा ' समर हाऊस 'ही म्हणता येईल. शहरात दाटीवाटीने व विशेषत: फ्लॅट्समध्ये राहणाऱ्यांना स्वत:चे बागकाम करण्याची हौस इथे भागवता येते. फळे, फुले, भाजीपाला लावता येतो; पण मुख्यत: उन्हाळ्यात ( म्हणजे आपल्याकडचा हिवाळाच ! संध्याकाळी इष्टमित्रांसमवेत बीअर पीत बसण्याची रंगत अनुभवण्यासाठी ह्या बागा आहेत. साधारणत: प्रत्येक शहराच्या भोवती असलेल्या हिरव्या पट्टयात ( Green Belt ) किंवा ज्या भागात शहराची दहावीस वर्षानंतर वाढ करायची आहे अशा भागात तात्पुरत्या मुदतीवर व अल्प भाड्याने असे प्लॉट्स लोक मुद्दाम घेतात. "

ग्वेंबोकी तळ्याच्या आसपास थोडेसे दाट जंगल आहे. थंडीचे दिवस सोडून इतर ऋतूंत ह्या भागात संध्याकाळ व सुटीचे दिवस घालविण्यासाठी पुष्कळ लोक येतात. त्या तलावाच्या एका बाजूला एक छोटीशी बंगल्यांची वसाहतही आहे. शहरातील ट्राम इथपर्यंत येते व इथून बाजूच्या खेडेगावात जाणाऱ्या काही बसेस सुटतात. तळे पुरते गोठलेले होते. इतके की, त्यावरून सहज चालत जावे ( किंवा घसरत ). जमिनीवर पडलेल्या बर्फाच्या पार्श्वभूमीवर उघडीबोडकी झाडे मोठीच मजेशीर दिसत होती.

नंतर दुसरा एक सुंदर भाग चांगला वाटला. तो पोझिम्कोवा रस्त्या-

वरचा. येथे बरेचसे नवे बंगले आहेत. बहुधा वरच्या वर्गातले लोक इथे रहात असावेत. ( अर्थात येथे उच्च वर्ग व खालचा वर्ग असे मानत नाहीत, तेव्हा अधिक उत्पन्नाचा गट असे म्हणा हवे तर ! )

तिसरा एक सुंदर भाग जुन्या गावच्या जागेवर उभारलेल्या इमारतींचा. अगदी ओद्रेच्या काठावर आहे हा व बाहेरून गावात शिरण्याचा मुख्य रस्ता येथेच येऊन मिळतो. युद्धात जुने गाव पुरतेच उध्वस्त झाले होते या भागातले. इथल्या नव्या इमारतींची रचना अगदी योजनापूर्वक करण्यात आली आहे. इमारतींच्या समूहातुन हिरवळी, उंचसखल भागातून सुंदर पायऱ्या, चौकाभोवती शानदार दुकानांची इमारत, रस्त्यांशी वेगवेगळे कोन करून अंतर्भागात शिरणाऱ्या इमारती व बदलत जाणारे दूरवरचे दृश्य या साऱ्यांमुळे या भागाला एक वेगळाच आकर्षकपणा, उठाव, वेगळाच ठसठशीतपणा आला आहे. एका बॉंबहल्ल्यात उध्वस्त झालेले चर्च नुसती डागडुजी करून त्याची भव्यता पटवून देण्यासाठी जतन करून ठेवले आहे. जवळ लढाईनंतर पुन्हा बांधून काढलेला धार्मिक किल्लाही आहे.

या भागात एक पोहोण्याचा तलावही आहे व त्याच्याजवळ एक पौंड–डॉलर शॉप आहे. येथे खास परदेशी पाहुण्यांसाठी पौंडात व डॉलरात खरेदी करता येते. नानाप्रकारच्या वस्तू मिळतात. परदेशी प्रवाशांकडून चलन मिळविण्याकरता येथे इतक्या नाना प्रकारच्या युक्त्या करण्यात येतात की विचारू नका. त्यातलीच ही एक. आमच्या भारतीय रुपयाला किंवा पोलिश झ्लोटीला येथे किंमत नसल्याने आम्ही बाहेर पडलो.

ओद्रेच्या पलीकडच्या काठावर सगळे बंदर वसविलेले आहे. अलीकडच्या काठावरून किनाऱ्याकिनाऱ्याने उत्तरेकडच्या कारखान्यांच्या भागाला जोडणारा एक मुख्य रस्ता प्रा. झारेंबा यांनी पूर्वी आखला होता. एक दिवस मलेमोठे शिपयार्ड आले तिथे आणि मधला रस्ता व

आजूबाजूचा भाग ताब्यात घेऊन सरळ कुंपण घालून टाकण्यात आले. एका महत्त्वाच्या रस्त्याची योजना बदलावी लागली. नगररचनेच्या तरतुदी न जुमानता आपल्या मनाप्रमाणे बांधकाम करणारी सार्वजनिक खाती येथेही आहेत!

भारतीय मनाला दिलासा देणाऱ्या आणखी दोन गोष्टी त्या दिवशी आढळल्या. एका घराच्या गॅलरीतून चक्क सतरंजी खाली लोंबत होती. कपडे असे बाहेर वाळत घालण्याचा प्रघात येथे दिसत नाही. एक तर थंडीमुळे धुण्याची गरजच कमी व कपडे घरातल्या घरात वाळवतात.

आणि दुसरी गोष्ट म्हणजे एकाने रस्त्यावर टाकलेली पिचकारी. अर्थात हे चुकूनच झाले असावे. थुंकू नका पाट्या नसतात. कारण सार्वजनिक ठिकाणी कोणीच तसे करीत नाही. निदान शहरात तरी. अजून खेडी पहायची होती आणि तेथे कदाचित ' वाईच पान द्या की ' म्हणणारा एखादा पोलिश तात्याबा भेटेल अशी आशा काही दिवस मनात धरून होतो.

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात व नंतरही कधीकधी येथे बर्फ पडते. तीन–चार दिवस रोज सकाळी हिमवर्षाव व्हायचा अन् दुपारी सारे वितळून जायचे. सकाळी विद्यापीठात जाताना त्या वर्षावात चालताना मोठी मौज वाटायची. बर्फ हातात घेऊन गोळे करावेत व फेकाफेकी करावी अशी इच्छा असायची. पण हातमोजाच्या बाहेर हात फार वेळ ठेववत नसे. आपल्या ओव्हरकोटावर किंवा जाणाऱ्यायेणाऱ्या वाहनांवर, तरंगत तरंगत येऊन पडणारे ते शुभ्र पुंजके फार छान दिसत. काही वेळा पीठ चाळताना दिसावे इतका दाट वर्षाव असे, तर काही वेळा श्रावणमासी सरसर यावी तशा मधूनच येणाऱ्या सरीसारखा. परंतु मार्चच्या दुसऱ्यातिसऱ्या आठवड्यापासून लख्ख सूर्यप्रकाशही अधूनमधून असतो. झाडांना दिसणारी कोवळी पालवीच सांगत असते की, आता हवामान बदलणार आहे.

त्या दिवशी असेच स्टासी या जवळच्या खेड्याकडे सहज म्हणून गेलो होतो. जंगलातून थोडीथोडी हिरवळ दिसू लागली होती, मध्येच एक छोटेसे तळे आहे व त्याच्या तीन बाजूंना खूप उंच अशा टेकड्या आहेत. चढाला छोट्यामोठ्या पायऱ्या आहेत. क्वचित खोलगट भागावर एखादा पूल, उंच भागासाठी अगदी अरुंद व छोट्या पायऱ्यांचा जिना, मध्येच टेकाडाच्या काठावरून तर मधूनच जंगलात शिरणारी पायवाट, अधेमधे जंगली लाकडाची बाके ठेवलेली. अशी नानातऱ्हेची आकर्षणे येथे सहलीसाठी करून ठेवली आहेत. बघितले तर तळे अगदी छोटे पण साराच आसमंत आल्हाददायक. सारे काही नैसर्गिक वातावरण !

जवळच एका अतिप्रचंड पण पूर्णपणे उध्वस्त झालेल्या सिमेंटच्या कारखान्याचे अवशेष आहेत. त्यातले खडकातच तयार केलेले ' समर-हाऊस 'च्या धर्तीचे कॉफीहाऊस मोठे मजेशीर आहे. त्याच्या समोर सिमेंटची प्रचंड कमान व त्यावर एक पॅगोडासारखी छप्पर असलेली गॅलरी अजून शिल्लक आहे. जंगलात आत असलेला हा कारखानाही युद्धात वाचला नाही. पण त्याचा अन् भोवतालच्या साऱ्या भागाचा सहलीचे सुंदर स्थान म्हणून उपयोग करणाऱ्या पोलिश लोकांच्या कल्पकतेची कल्पना आली.

० ० ०

# ६. श्विनोउइश्चे

सव्वीस मार्चची सुट्टी आळसात घालवण्यापेक्षा, बाल्टिक समुद्राच्या-काठी असलेल्या श्विनोउइश्चे या गावाला भेट देण्याचा बूट निघाला. तेव्हा सगळे आनंदाने तयार झाले. भेटलेला प्रत्येक पोलिश माणूस

काय काय पाहिलेत हे विचारताना या गावाचे नाव काढीत असे. समुद्रकाठचे सुट्टीचे एक रम्य ठिकाण व एक सुंदर छोटे गाव म्हणून सारेच त्या गावाबद्दल आवर्जून बोलत, पाहून या म्हणून सांगत. अजून बोटीने नेहमीची सर्व्हिस सुरू झालेली नव्हती म्हणून बसने जायचे ठरले. बसेस फार सुंदर बांधणीच्या आहेत. आग ओकणारा उन्हाळ्यातला सूर्य येथे नसल्यामुळे वर व बाजूला काचा खूप लावलेल्या त्यामुळेच खराखुरा निसर्ग पहायला मिळतो. आपल्या एष्टीत धक्काबुक्की, बोचक्यातला वा पाट्यातल्या मासळीचा नाहीतर कसलाबसला वास, मुंडासेवाल्यांची पानतंबाखू आणि ग्रामीण बायकापोरांचा कलकलाट व पिचकाऱ्या यांच्यामुळे निसर्ग बाहेरच रहातो आणि आपण मुकाट्याने डोळे आपल्या ' इनरसेल्फ 'चेच चिंतन करीत बसतो.

येथे सूर्यदर्शन ही पर्वणी असल्यामुळे व भर उन्हाळ्यातला ( उन्हाळा कसला आपल्या हिवाळ्यासारखाच ) घरेदारे, बस, सारे सारेच अशा रचनेचे की सूर्याची कोवळी किरणे ( पडतील तेव्हा ) मनसोक्त अंगावर घेता यावीत, उन्हात दिवसच्यादिवस पडून राहता यावे. आपल्याला क्वचित हिंवाळ्यात थोडा वेळ घालवायला सूर्याचे ऊन हवे असते, एरवी फक्त कपडे आणि धान्य वगैरे वाळवणालाच फक्त !

उन्हाळा अजून सुरू व्हायला बराच अवकाश असल्याने शिवनोउइश्चे गावाकडे अजून सुट्टी घालवण्यासाठी जाणारे प्रवासी नव्हते. त्या दिवशी प्रवाशी असे आम्हीच असू. वाटेत सगळीकडे चिक्कार बर्फ पडलेले होते. पाईनच्या वरवर चढत जाणाऱ्या पर्णराजीवरही साठून राहिलेले होते. काहींच्या खोडाला चिकटून बर्फाची पांढरी पट्टीच्या पट्टी उभी होती. काही झाडे तर जमिनीवरील बर्फातून चिमटीने शेंडा धरून अलगद वर उचलल्यासारखी बर्फाने थबथबलेली दिसत होती. निरनिराळ्या प्रकारची जंगलातील झाडे आणि बर्फ यांनी नानाप्रकारची दृश्ये उभी केली होती. कित्येकवेळा वाटे येथे थांबून फोटो घ्यावेत, पण बस तर

सुसाट धावत होती. बसमध्ये कंडक्टरही नव्हता, सगळे काम ड्रायव्हरच करायचा ( तिकिटे फाडणे वगैरे ). तेव्हा ड्रायव्हरला विनंती करणे शक्यच नव्हते.

शब्दकोशाच्या साहाय्याने या जंगलात कोणकोणते प्राणी असतात अशा चौकशा केल्या. काही मोठ्या जंगलामध्ये कोल्हे व लहान साप असतात. पण वाघ, हत्ती, सिंह वगैरे प्राणी येथल्या लोकांना प्रत्यक्षात पहायला मिळत नाहीत.

श्विनोउइश्चे तसे मोठ्या खाडीतले एक बेटच आहे. त्यामुळे बसेस, आगगाडी वगैरे सर्व अलीकडेच थांबतात. एका मोठ्या बोटीतून सर्व लोक काही मोटारगाड्या तेवढ्या–पलीकडे नेल्या जातात. अशाच एका बोटीने आम्ही गेलो व उतरल्यानंतर तिथल्या नगरनियोजन कार्यालयाचा शोध घ्यायला सुरुवात केली. त्या कार्यालयात थोडीफार चर्चा झाल्यावर तिथल्याच दोघातिघांनी मोटारीची व्यवस्था करून आम्हाला गाव दाखवायला सुरुवात केली.

बंदर आणि आरोग्यधाम असे या गावचे महत्त्व असल्याने समुद्राकडच्या बाजूने गाव पहायला सुरुवात करणे अवश्यच होते. बंदरावरची जेटी अगदी छोटी असली तरी बऱ्याच मोठ्या बोटींही तेथे लागतात. सध्या मुख्यत्वेकरून माशांच्या बोटींचीच व्यवस्था आहे. बाकीच्या बोटी खाडीतून आत स्टेचीनपर्यन्त जातात. बाल्टिक समुद्रकिनारा त्यादिवशी अगदी शान्त होता. वारा मात्र अगदी कुडकुडायला लावणारा होता. पांढरी बारीक रेती व समुद्राचे काळसर–तांबडट अगदी थंडगार पाणी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला आरोग्यधाम म्हणून बांधलेल्या अनेक इमारती. या भागाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे व आणखी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी नव्या घर्तींची विश्रामधामे व त्यांच्यासाठी सर्व सुखसोयी, गाड्या ठेवण्यापासून नाट्यगृहापर्यन्त सर्व बांधण्याच्या नव्या योजना समजावून सांगितल्या गेल्या. सध्याचे खुले

नाट्यगृह अर्धगोलाकृती आकाराचे असे नावीन्यपूर्ण वाटले. दुकानांसाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या केबिन्सही खूप आकर्षक नमुन्यांच्या होत्या.

गावही तसे नीटस अन् रेखीव आहे. मध्यभागी एक छोटेसे जंगलच बागेसारखे जतन करून ठेवले आहे. गावातली रहाण्याची घरेही सर्व सोयींनी युक्त व नमुनेदार वाटली. भारताला भेट दिलेल्या एका खलाशाने घर व भारतातून आणलेल्या वस्तू आपुलकीने दाखवल्या. तीन खोल्या पण अगदी नीटनेटक्या सजवलेल्या, त्याच्या मुलाने तर अनेक देशांतल्या विमानांचा ( खेळण्यातल्या ) एक साठाच जमवलेला दाखवला.

त्यानंतर एका किंडरगार्टन शाळेला भेट दिली. शाळेची रचनाही तशीच नमुनेदार होती. तीन ते सात वयाच्या मुलांकरिता वर्ग होते तिथे. आम्ही गेलो त्या वेळेला जेवणाची वेळ असल्याने ' जेवावे कसे ? ' हा पाठ चालला होता. प्रत्येक मुलाची बसण्याची, कोट व खेळणी ठेवण्याची जागा एकेका चित्राकृतीने ठरवलेली होती. जवळची एक प्राथमिक शाळाही अशीच सुसज्ज होती. वर्गात शिरताच छोट्यांनी उभे राहून जिSSदोSSब्रे ( गुड डे ) म्हणून अभिवादन केले. भाषा येत नसली तरी दिपोर्टीच्या इन्स्पेक्शनसारख्या आम्ही वह्या वगैरे पाहिल्या. प्रश्न विचारता आले नाहीत म्हणून डिपोर्टीसारखी दुसऱ्या दिवशी सुट्टीपण जाहीर करता आली नाही. जाताना परत मुलांनी दSSविSSझेनीSSया ( गुड बाय ) म्हणून निरोप दिला. एका वर्गात एकच मुलगा बसून अभ्यास करीत होता शिक्षा म्हणून. त्याच्याबरोबर अर्थात बाईंना पण शिक्षा घडत होती. प्रमुख गोष्टी पाहून झाल्यावर मार्गदर्शकांचा निरोप घेतला व आमचे आम्ही गावातून एक पायी फेरफटका मारला. खाडीच्या काठावर येऊन एका बार सेंट्रालियामध्ये शिरलो. तिथे पाव आणि उसळीसारखी भाजी खायला मिळाली. तशी भाजी बऱ्याच दिवसांनी खायला मिळाली.

थोडेसे इकडे तिकडे फिरून आगगाडीने परतायचे ठरले. शनिवारचा दिवस आणि संध्याकाळ झालेली होती. त्यामुळे पिऊन धुंद होऊन फिरणारे खलाशीही बरेच दिसले. भारताबद्दल माहिती असणारा एखादा आमच्यातल्या सरदारजीला महाराजा म्हणून सॅल्यूट ठोकून जाई.

आगगाडीत दोनच वर्ग असतात इथे. पहिला आणि दुसरा. आपला कॉस्मॉपॉलिटन—तिसरा वर्ग नाही, यांच्या गाडीला. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी दारे खिडक्या बंदच असल्याने कोळशावर चालणारी इंजिने असली तरी कोळसा, धूर, धुरळ्याचा त्रास नव्हता. (आणि पुढच्या डब्यातल्यांच्या पिचकाऱ्यांही अर्थातच नव्हत्या.)

रात्री परतायला बराच उशीर झाला. खूप चालून थकलोही होतो. दुसऱ्या दिवशी जेवणाच्या वेळेपर्यंत ताणून द्यायला काहीच प्रत्यवाय नव्हता. नवीन पाहिल्याचे व एका स्मरणीय सफरीच्या समाधानात बिछान्यावर टेकलो.

## कोवोबजेग आणि कामिएनपाम

तेरा एप्रिलला स्टेचीन प्रांतातल्या छोट्या छोट्या गावांच्या भेटीची एक खास सफर ठरविण्यात आलेली होती. त्या दिवशीही नेमकी हवा खराब होती. ही सफर खरे तर महिन्यापूर्वीच ठरलेली होती. पण वाईट हवेने तेव्हाही रद्द झालेली होती. यावेळी मात्र जायचेच असे ठरले. उत्तमपैकी अद्ययावत् अशी वेगवान् बस होती आणि प्रत्येक गावात शिरताना प्रा. झारेंबा रेडिओ बंद करून, स्पीकरमधून त्या गावाच्या वैशिष्ट्याची व नगरनियोजनविषयक प्रश्नांची माहिती सांगत. प्रत्येक महत्त्वाचे ठिकाण दाखवीत. गोलेनिऊ गावाहून बाहेर पडल्यावर वेगाने पळणाऱ्या बसने वाचवलेल्या वेळेचा सदुपयोग करून घ्यावा म्हणून प्रा. झारेंबांनी एक अचानक भेट जाहीर केली. ‘कोवोबजेग’ला जायचे म्हटल्यावर सर्वांनी टाळ्या वाजवून दाद दिली.

युद्धात हे गाव पूर्ण नष्ट झालेले होते. आज पोलंडमधील ते उत्कृष्ट विश्रांतिस्थान व मत्स्य व्यवसायाचे केन्द्र बनले आहे. १५ ते २० वर्षांत सबंध गाव एक नवे रूप घेऊन उभे राहिले आहे. युद्ध संपले तेव्हा प्रा. झारेंबा या गावात आले होते. केवळ ४–५ लोकच तेथे शिल्लक होते. तेव्हा कोवोबजेगसारख्या अनेक गावांचा जुनेपणा टिकवून अगदी नवी रचनाही तेथे करण्यात आलेली आहे. जुने रस्ते ठेऊन व काही जुन्या इमारती तशाच बांधून काढल्या आहेत.

या गावात खाणींच्या विभागातल्या लहान मुलांकरिता व कामगारांकरिता खूप मोठ्या प्रमाणावर आरोग्यधामे बांधलेली आहेत. सात ते चौदा वयाची आठशे मुले राहू शकतील एवढे एक सॅनिटोरियम बांधून पुरे होत आलेले आम्हाला दाखवण्यात आले. खाणींच्या दूषित हवेच्या प्रदेशातल्या सर्वांना काही आठवडे या गावी रहायला मिळते. केवळ लहान मुलांकरिता एक खूप प्रचंड हॉस्पिटलही आहे. त्याचा दर्शनी भाग प्रचंड प्रतिकात्मक अशा सूर्याच्या आकाराचा आहे. मोकळ्या हवेत सूर्यप्रकाशाबरोबर आपले आरोग्य येथे परत मिळवा असेच तो सुचवतो.

गावाचे चार भाग आहेत. जुने गाव, रेल्वेयार्ड, सॅनिटोरियम्स असलेला नवा भाग व बंदरांचा भाग. जुन्या गावातल्या रहाण्याच्या इमारतींचे वास्तुशिल्प आकर्षक नाही पण जुने चर्च व सिटी हॉल वैशिष्ट्यपूर्ण वाटले. तेथेच नगरनियोजन कार्यालयालाही भेट दिली. समुद्रकाठावरून प्रचंड लाटा व थंडगार वारे यामुळे लगेच परतावे लागले.

परतताना वाटेत कामिएनपाम या गावाला भेट दिली. तेथे ८५० वर्षांचे एक जुने चर्च आणि ४०० वर्षांचे एक झाड आहे. त्या चर्चमधले एक पुराणवस्तू संग्रहालय येथील धर्मोपदेशकाने स्वतः हिंडून दाखवले. आपला देश व त्याची जुनी परंपरा ( आपल्याएवढी नसली तरी ) हजार वर्षांची आमची परंपरा आहे. आमचा देश अनेक वैशिष्ट्यांचा आहे हे

दाखवण्याची या लोकांची तळमळ यासारख्याच अनेक ठिकाणी दिसून आली. लाकडावर कोरलेले बायबलातले प्रसंग तिथे होते. चर्चची बांधणीही विटांची पण खूप जाड व उंच, भिंतींची आढळली. चौदाव्या शतकातले बरेच फर्निचरही ठेवले आहे जपून. पोलंडमधले जुन्यात जुने व मोठ्यात मोठे असे ऑर्गन तिथे आहे. तेही वाजवून दाखवण्यात आले. धर्मोपदेशकांनी मला पाहून जवळ येऊन विचारले. 'तुम्ही भारतातले दिसता. लालबहादूर शास्त्रींसारखे दिसता. मी चित्रकार आहे व त्यांचे एक चित्रही काढले आहे. फार मोठा माणूस होता.' मी म्हटले, 'होय. त्या मोठ्या माणसाच्या मोठ्या देशातला मी एक छोटा माणूस आहे.'

ती सफर कामिएनपामनंतर मात्र हवा आणखीनच बिघडल्याने आटोपती घ्यावी लागली. पोलंडमधला निसर्ग हा असा लहरीच. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यातही भर हिवाळ्याचे रौद्र रूप धारण करतो. अधूनमधून आणि असे हे त्याचे प्रकार मेपर्यन्त चालतात.

० ० ०

## ७. –संगीत, नाट्य अन् चित्रपट–

पोलंडमध्ये येऊन स्थिरस्थावर झाल्यावर आम्ही सर्व तेथील वातावरणात रमून गेलो असलो तरी आपल्या खाद्यपदार्थांची आठवण अवश्य येई. त्यातून घरून आलेल्या एखाद्या पत्रात तोंडाला पाणी सुटेल अशी विचारणा असे. 'जेवताना कांद्याची भजी, लसणाची चटणी, मेथीची भाजी, डाळवांगे, वांग्याचे भरीत, पुरणपोळी, दहिवडे, मसाला दोसा, बटाटेवडे, चकल्या, शेव, चिवडा, करंज्या, लाडू इ. आपल्या खाद्यपदार्थांची आठवण ठेवली असशील अशी अशा आहे.'

तेथील मिळमिळीत जेवण तर आवडत नसेच, पण करायचे काय ? एक दिवस मात्र पिओत्रोविचच्या मागे लागून त्याच्याच घरी एक खास बेत ठरवला. शब्दकोशाच्या साहाय्याने, कणीक, तांदूळ, भाज्या, तिखट वगैरे खरेदी करून पुऱ्या, शिरा, बटाटे-कांदे-गाजर यांचा रस्सा, दहीभात, पापड (बरोबर आणलेले) असा स्वयंपाक केला. पोळपाट, लाटणे, झारा, उलथने वगैरे नसतानाही बेत बरा जमला होता. मांडी घालून कसे जेवायचे तेही दाखवले पिओत्रोविचला. फक्त 'वदनी कवळ घेता' म्हणायचे बाकी राहिले. ताटाऐवजी अर्थातच बशा होत्या. पोलिश पद्धतीप्रमाणे चहा न घेता चक्क पाणी प्यायला बरोबर घेतले होते. तसा मजा आला. फक्त कोपऱ्यावरच्या ठेवल्यावरून पानच जाऊन आणणे मात्र शक्य नव्हते. या कार्यक्रमानंतर आठपंधरा दिवसांनी, केव्हातरी पिओ-त्रोविचच्या निरनिराळ्या मित्रांना बोलावून असे जेवण करण्याचा प्रघात सुरू झाला.

जेवणाचा असा कार्यक्रम होऊ शकत असला तरी आपले संगीत ऐकायला मिळत नसे. रेडिओच्या खुंट्या फिरविताना आपल्या संगीताची सतत आठवण येई. आपसातले बोलणे सोडले तर हिंदीतले वा इतर भारतीय भाषातले शब्द किंवा आपले संगीत कानावर पडत नव्हते. वरचेवर मनात येई की, आपण निदान काही निवडक तबकड्या तरी बरोबर आणायला हव्या होत्या. आम्हा आठही भारतीयांत रागदारी-पासून फिल्मी संगीतापर्यंतचे सर्व प्रकार आवडणारे निरनिराळे जण होते, पण कोणीही गायनवादनापैकी एखादी कला अवगत असलेला नव्हता. लहानपणी आपली गाणे किंवा एखादे वाद्य शिकण्याची इच्छा आपण काही अंशी तरी पुरी करायला पाहिजे होती, असे मला आता अधिक प्रकर्षाने वाटू लागले होते, पण येथे आता त्याचा काहीच उपयोग नव्हता.

अशाच रेडिओच्या खुंट्या पिळतापिळता एकदा बीबीसीवर 'खूप

उगाओ खूप खावो ' हा हिंदी शेतकऱ्यांसाठी लागलेला कार्यक्रम ऐकायला आला. हिंदुस्थानात असताना रताळ्याची लागवड किंवा 'तायचुंग' भाताचा प्रयोग वगैरे कार्यक्रम लागल्यावर निमिषार्धात रेडिओ बंद केला तरी असता वा दुसरे एखादे केंद्र लावले असते. पण बीबीसीवरचा तो शेतकऱ्यांसाठी असलेला हिंदी कार्यक्रम तेथे मनःपूर्वक ऐकला; पण एकंदरीत आपल्याकडच्या बातम्या, संगीत व इतर कार्यक्रम ऐकण्याची प्रबळ इच्छा दिवसेदिवस अतृप्तच रहात होती.

आणि एक दिवस असाच रेडिओचा काटा फिरविता फिरविता रात्री सव्वानऊ वाजता 'दिल चाहता न होऽऽतो' असे अस्सल लखनवी थाटातले गझल ऐकू येऊ लागले. सगळेजण आपापल्या खोल्यांतून माझ्या खोलीत धावतच आले. मग टाळ्यांचा कडकडाट व गळ्यात गळे घालून जल्लोष केला सगळ्यांनी. आणि मग त्या दिवशी ऑल इंडिया रेडिओच्या एक्स्टर्नल सर्व्हिसेसचा पत्ता लागला आम्हाला. अर्थात दोन तीन तासांच्या त्या कार्यक्रमात बातम्या, व्याख्याने, चर्चा वगैरेत मधूनच थोडेफार संगीत ऐकायला मिळे. बातम्या व ध्वनिमुद्रिका ऐकण्यासाठी ती सारी रटाळ व्याख्याने वा कंटाळवाण्या चर्चा ऐकायची सर्वांची तयारी असे.

स्थानिक वर्तमानपत्रात पंजाबात झालेली गडबड, मिझो टेकड्यातली चळवळ किंवा अवमूल्यन अशा अगदी ठळक बातम्याच भारताविषयीच्या येत. सकाळच्या चहाबरोबर सकाळ, केसरी किंवा नऊ साडेनऊ वाजता टाईम्स ऑफ इंडिया वाचण्याची सवय असलेल्या माणसाला बिन-वर्तमानपत्राच्या देशात ( कारण पोलिश भाषेतली वृत्तपत्रे असून नसून आम्हाला सारखीच होती ) टाकल्यासारखे होते ते. तसा सर्वसामान्य पोलिश माणूसही सकाळच्या व दुपारच्या दोन्ही वेळच्या वर्तमान-पत्रांचीही अगदी उत्सुकतेने वाट पहातो. दुपारच्या आवृत्तीसाठी

बहुतेक स्टॉलवर रांगा लागतात व कित्येकदा चुटकीसरशी अंक संपून नंतर येणाऱ्यांना ' शिल्लक नाही 'च ऐकावे लागते.

वृत्तपत्रे व रेडिओ व केव्हा टेलिव्हिजन या दोन साधनांनी एकंदरीत आम्हाला पुरेसे समाधान मिळत नव्हते. तेव्हा तेथील चित्रपट, नाटके, आणि संगीताचे कार्यक्रम हे कसे असतात हे पाहण्याचे ठरवून आम्ही तिकडे मोर्चा वळवला.

" फराओ " हा पोलिश चित्रपट त्या वेळेला अगदी दणक्यात गाजावाजा करीत चालू होता. लहान मुलेही त्यातल्या राजाची भाषणे पाठ म्हणून दाखवीत किंवा एकमेकांना उत्सुकतेने आणि लकाकणाऱ्या डोळ्यांनी गोष्टी सांगत व चर्चा करीत. तिकिटे तितकी सहजासहजी मिळत नव्हती. पण एक दिवस सांस्कृतिक मंत्रालयातर्फे खटपट करून आमच्याकरिता तिकिटे मिळवण्यात आली.

हा चित्रपट म्हणजे १९१२ सालच्या परतंत्र व खंडित झालेल्या पोलिश जीवनाचे चित्रण शिवरामपंत परांजप्यांच्या तंत्राने करणाऱ्या, एका कादंबरीवर आधारलेला होता. चित्रपटात प्रत्यक्ष बाबिलोन व असीरियन यांच्या संघर्षाचे चित्रण करण्यात आले आहे. चित्रण प्रत्यक्ष इजिप्तमध्ये जाऊन पिरॅमिडस व वाळवंटाच्या प्रदेशात केलेले आहे. तंत्राच्या दृष्टीने तो उत्कृष्ट होताच पण सारे प्रसंगही अतिपरिणाम-कारक होते. कालव्यासाठी जमीन घेतल्यानंतर तेथील एका छोट्या शेतकऱ्याने त्याच जागेवर टांगून घेऊन केलेली आत्महत्या आणि असे कित्येक क्षण व प्रसंग बारकाव्यानिशी व ठसठशीतपणे चित्रित करण्यात आलेले होते. पण प्रत्यक्ष संवाद कळत नसल्याने चित्रपटातला खराखुरा गाभा व रस अनुभवता येणे कठीणच होते.

पोलिश चित्रपटाप्रमाणेच अधूनमधून फ्रेंच, इटालियन, व्हिएटनामीज हे पोलिश भाषेत डब केलेले किंवा केवळ पोलिश टायटल्स असलेले

चित्रपटही येथे बरेच पाहायला सापडले. पण खरा प्रसार आहे इंग्लिश व अमेरिकन चित्रपटांचा. त्यांनाही बेसुमार गर्दी होते. ओळीने कित्येक आठवडे वा आलटून पालटून वेगवेगळया चित्रपटगृहात ते लागतात. अमेरिकेतले स्वातंत्र्य लढ्यावरचे, ' काऊ बॉय ' धर्तीचे व सामाजिक पेचप्रसंगावरचे अधिक लोकप्रिय ठरणारे चित्रपट डब किंवा पोलिश मथळे देऊनच प्रसिद्ध होतात. एकदोनदा तर जाहिरातीवरील नाव बघून मोठ्या उत्साहाने चित्रपट पहायला गेलो, पण पूर्णपणे पोलिश भाषेत डब केलेला असल्याने केवळ अभिनय पाहण्यावरच समाधान मानावे लागले, असेही घडले. एकंदरीत सर्वसामान्य माणसाला तरी आपल्या-कडच्यासारखेच चित्रपटाला जाणे म्हणजे अगोदर ठरवून, जरा नीट-नेटक्या पेहेरावात व बराच गाजावाजा करीत जावे लागते.

' माय फेअर लेडी ' या जगप्रसिद्ध नाटकाचे पोलिश रूपान्तर पाहण्याची संधीही अशीच एक दिवस चालून आली. आपल्या रंगभूमीच्या तुलनेने पोलिश रंगभूमी पहाता येईल हाही मनात हेतू होता. गेल्यावर पडदा उघडण्यापूर्वी मनावर परिणाम होतो तो मंचाच्या खाली व थोडेसे पुढे बसलेल्या वाद्यवादकांच्या ताफ्याचा. आपल्याकडच्या एखाद्या ' खाशा ' लग्नासाठी आणलेला बॅण्डच म्हणाना. मनाला वाटू लागले एखाद्या उत्तम तबलापटूने गायकाला खाऊन टाकावे तसे हा बॅण्ड नाट-काला मारून टाकणार. या इतक्या वाद्यांचा आवाज म्हणजे सारे थिएटर भरून उरतो. परंतु सुदैवाने नाटक फारच परिणामकारक वठले.

एक तर शॉच्या त्या नाटकाच्या काळातले इंग्लंड फारच समर्थपणे उभे केलेले होते. त्या वेळचे पोशाख, लब्धप्रतिष्ठित वर्गाची राहणी, खालच्या वर्गाची राहणी, सारे सारे रूपान्तर करताना अबाधित राखून, ठाशीवपणे उभे केले होते. कामेही बरीचशी सफाईदार होती. शेक्स-पीअरकालीन इंग्रजीचा कट्टर पुरस्कर्ता असलेला व ब्रह्मचारी आणि स्त्रियां-पासून दूर राहणारा प्राध्यापक, अगदी खेडवळ वळणाची व फुले विकीत

फिरणारी ती मुलगी एलिसा, तिचा दारूडा बाप, आणि त्याचे सोबती या सगळ्यांबरोबर प्रत्येक बारीकसारीक व्यक्तीही अगदी ठाकठोक उभी केली होती. कर्नलबरोबर, त्या मुलीला राजकन्येसारखी सुसंस्कृत व सफाईदार बोलणारी करून दाखविण्याची प्राध्यापकाची पैज; तिला खडे, चॉकोलेट, मेणबत्या यांच्या साहाय्याने रात्र रात्र जागून चिकाटीने शिकविण्याचा प्रयत्न, एलिसाचा शिकतानाचा वैताग; प्राध्यापकाला मारून टाका अशी शिक्षा द्यायची राजपुत्राला विनंती करण्याचे ठरविणे आणि उत्तम बोलण्यात यश आल्यानंतरचा तिचा आनंद, घोड्यांच्या शर्यतीच्या मैदानावरील लब्धप्रतिष्ठित व्यक्तींचे चित्रण; शर्यतीसाठी घोड्यांच्य वेषातल्यांच्या नाच; 'माय फेअर लेडी' ची निवड; प्राध्यपकाचे एलिसावर बसलेले प्रेम, या सगळ्या प्रसंगांचे चित्रण फारच परिणामकारक होते. पोलिश समजत असते तर नाटकातली रंगत अधिकच समजली असती यात शंका नाही. पण वेषभूषा, अभिनय, नेपथ्यरचना यांचा परिणामही काही कमी नव्हता. नाटकातल्या पात्रांचे येणे जाणे केवळ विंगइतकेच मर्यादित नव्हते तर रंगमंचच जणू खाली उतरून दोन्ही बाजूंचा काही भाग व्यापत होते. त्यामुळे नाटकाचा एकप्रकारे प्रेक्षकांशीच प्रत्यक्ष दुवा साधला होता. नाटकातील कित्येक दृश्ये मनावर कायमचा ठसा उमटवून गेली.

अशी एक म्हण आहे की, पोलंडला एकदा भेट दिलेला मनुष्य तेथे पुन्हा पुन्हा येतो, पोलिश रंगभूमीबद्दल तरी ही म्हण अगदी खरी ठरावी.

असेच एक दिवस पियानोवादनाच्या एका कार्यक्रमाला गेलो. पाश्चात्यांचेही 'क्लासीकल' असते अन् त्यालाही निवडक श्रोतृवर्ग असतो. वयोवृद्धांचा भरणा त्यात अधिक असला तरी काही खास रसिकता असलेला किंवा जोपासणारा तरुणवर्गही होता तिथे. थिएटर

बाहेरून अगदी साधे वाटत असले तरी आतून भव्य व कलात्मक दिसत होते. भल्या प्रचंड रंगमंचावर मोठा वाद्यवृंद बसण्यासाठी गॅलरी-सारखी रचना होती, पण त्या एवढ्या रंगमंचावर फक्त एक पियोनो ठेवलेला होता. ते एकच वाद्य अन् त्यावर प्रेक्षकांपुढे लवून तेथे येऊन बसलेला तो किरकोळ शरीरयष्टीचा पण तरतरीत आणि वाद्यवादनाच्या खास पोषाखातला तो वादक, हे सारे त्या मोकळ्या रंगमंचावर चमत्कारिकच वाटत होते. पण पियानोच्या स्वरांनी सारे प्रेक्षागृह त्याने दणाणून टाकले, भारून टाकले. प्रत्येक कार्यक्रमानंतर उरे तो टाळ्यांचा कडकडाट, तसे त्याच्या सुरातले काहीच कळत नव्हते आणि काही वेळा तर उगाचच पियानो बडवून ढगांसारखा गडगडाट तो करतो आहे असेही वाटे; पण काही वेळा एखादा सूर आपल्या सुरांशी जुळणारा सापडे अन् वाटे चुकून का होईना चटकन् या वादकाने 'वद जाऊ कुणाला शरण' वाजवावे! पण छे! असे कोमल सूर कुठले काढायला तो! वरून खाली, खालून वर असे तोफांचे गडगडाटच जास्त.

गायकाचे वा वादकाचे कौतुक म्हणजे टाळ्यांचा प्रचंड कडकडाट व त्याने त्याचा स्वीकार पुढे येऊन मान लववून करायलाच हवा. क्वचित् पुढे येऊन त्याला खास पसंतीदर्शक फुलेही प्रेक्षक देत.

पोलंडमध्ये व आजूबाजूच्या देशांत गाजलेल्या एका मोठ्या गानवृंदाचा कार्यक्रम ऐकण्याची संधी एकदा अशीच चालून आली. स्टेचीन विद्यापीठास वीस वर्षे पूर्ण होऊन एकविसाव्या वर्षात पदार्पण करीत असणाऱ्या दिवसाचा सोहळा होता तो! सकाळीच प्राध्यापक झारेंबा व इतर काही प्राध्याप-कांनी विद्यापीठात प्रवेश केल्यापासूनचे व व्याख्यानांचे काही प्रसंग दूर चित्रवाणीसाठी चित्रित करण्यात आले होते. विद्यापीठाचे तिन्ही विभाग सागरी, शेतकी व तांत्रिक (या तीन शाखा एकेका स्वतंत्र विद्यापीठा-एवढ्या मोठ्या आहेत.) हा सोहळा एकत्र साजरा करतात.

संध्याकाळी कार्यक्रमाच्या प्रारंभी आपल्या पदवीदानप्रसंगी निघते तशी, झगे घातलेल्या प्राध्यापकांची व त्यांच्यापुढे त्या त्या विभागाचे ध्वज घेतलेल्या विद्यार्थ्यांची एक मिरवणूक येऊन व्यासपीठावर स्थानापन्न झाली. सगळी भाषणे पोलिश भाषेतच असल्याने फारसे काही समजत नव्हते. पण अशा प्रसंगाच्या वेळचा भाषणांचा एक साचा ठरलेला असतो व तो सगळीकडे सारखाच असतो. आतापर्यन्तचा इतिहास, प्रगतीची वाटचाल, थोडेफार राजकीयं, परिस्थितीचे पडसाद, काही गौरव, काही आभार हे सारे त्यात असावे असे समजत असलेल्या शब्दांवरून, नावांवरून व टाळ्यांवरून समजत होते.

या कार्यक्रमानंतर तो संगीताचा खास कार्यक्रम होता. तांत्रिक शाखेतल्या एका विद्यार्थ्याने इतर विद्यार्थी जमवून शिकवून हा संच नावारूपास आणला आहे. हा संच इटली, जर्मनी, स्वीडन येथील दौरा करून आलेला आहे, व लवकरच इंग्लंडलाही जाणार आहे, असे सांगून आमची उत्सुकता आणखी वाढविण्यात आली होता.

'फिलहार्मोनिया' या पूर्वी उल्लेख केलेल्या व संगीत कार्यक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या खास प्रेक्षागृहातच हाही कार्यक्रम होता. त्या प्रचंड रंगमंचावर कितीही गायक व वादक बसवले तरी तो मोकळाच पडेल अशी माझी आपली एक कल्पना होती. पण प्रत्यक्षात तो लहान पडतो आहे असे दिसून आले. कल्पना करा की, प्रथम साठ वादकांचा ताफा तुमच्यासमोर देऊन बसतो. त्यात बासरीसारख्या वाद्यपासून, विविध आकारांची व्हायोलिन्स, गिटारी, क्लॅरिओनेट्स, तुतारी वा शिंगासारखे प्रचंड कर्णे असलेली वाद्ये, ड्रम्स, मनुष्याइतक्या उंचीची हार्प्स घेऊन सारे तुमच्यासमोर स्टेडियमच्या गॅलरीसारख्या पायऱ्यांवर प्रथम येऊन बसतात आणि त्यांच्या पाठोपाठ मागच्या दोन रांगांत ऐंशी गणवेशधारी मुलेमुली एका शिस्तीत येऊन उभ्या राहतात. एवढा प्रचंड जमाव

समोर असूनही सारे कसे आखीव, रेखीव व नीटस भासते. पण एक गोष्ट सारखी मनात येते की; एवढया वाद्यातून आणि समुदायापासून संगीत ऐकायला मिळणारे ते वरच्या पट्टीतले, तोफाबंदुकांच्या आवाजाला शोभणारेच येणार, सारंगीवरच्या कोमलऋषभ आसावरीचे सूर थोडेच येथे ऐकायला मिळणार !

आमच्या गायनाच्या पंचावर एक गायक त्याचे साथीदार, दोन तंबोरे, एक पेटी ( तीही ऑल इंडिया रेडिओच्या सवयीने पुष्कळदा नसतेच ), तबले व फार तर सारंगी किंवा व्हायोलिनवादक आणि कधीकधी एकदोन तथाकथित तज्ज्ञ रसिक व एकदोन अलबतेगलबते एवढ्यांनीच तो मंच केवढा भरून जातो. मग त्यावरून वर वर्णन केलेल्या मंचाची कल्पना करता येईल आणि केवढा भव्य असेल तेही पटेल. आपल्या मंचावर अगोदरपासून, सारंगी, तंबोऱ्यांचे कुई ऽऽ कुई ऽऽ, ऊं ऊं, तबल्याचे ठक् ठक् वगैरेंनी एक खास वातावरण तयार होत असते व बुवा साहेबांचा खास 'आ' लागताच श्रोतेमंडळी तल्लीन होऊ लागतात.

याउलट, पाश्चात्य संगीताच्या कार्यक्रमाच्यावेळी वाद्यांची जुळवाजुळव फार वेळ घेत नसली तरी मंचावरचा एवढा समुदाय, मुख्य दिग्दर्शकाचे आगमन व लवून केलेला स्वागताचा स्वीकार या साऱ्यांनी हिथले निराळे वातावरण तयार होते.

आपल्याकडे पाठ करून दिग्दर्शक तो एवढा प्रचंड ताफा केवळ आपल्या हाताच्या तालावर नाचवीत असतो. मला आपली एक शंका येते की, एवढया प्रचंड वेगाने व उच्च पट्टीतल्या संगीतामुळे त्या दिग्दर्शकाचेच कान अगोदरच बधीर होत असले पाहिजेत. ( एक शंका : तो कानात बोळेच घालून उभा रहात असेल. ) विविध प्रकारच्या भारतीय संगीताला सरावलेल्या कानाला त्या पाश्चात्य

९५९३९ ५९

संगीतात गोडी उत्पन्न होणे अर्थातच कठीण. पण एकंदरीत श्रोतृ-समुदायातील प्रतिसादावरून त्यांना ते फारच आवडलेले दिसले.

त्या वाद्यांच्या साथीशिवाय म्हटलेल्या ऐशी गायकांच्या गाण्याचा कार्यक्रम मात्र मलाही फार आवडला. इतक्या जणांचा ताल, सूर, तबल्या-तंबोऱ्याच्या साथीशिवाय इतका छान जमू शकतो हे त्याचे वैशिष्ट्य. त्यातल्या एका गाण्याचा प्रकार मला अगदी आपल्या वेदघोषांसारखा वाटला. मुख्य वैशिष्ट्य म्हणजे पुरातन काळापासून चालत आलेली लोकगीते, ग्रामीण गीते, विविध प्रदेशांतले विशिष्ट सूर या सगळ्यांचा अभ्यास करून हे संगीत तयार झालेले आहे. बिटल्ससारखा उगाच आरडाओरडा, धांगडधिंगा, घाम येईपर्यंत बेंबीच्या देठापासून किंचाळणे त्यात नाही. आपली संस्कृती, परंपरा या सगळ्यांवर आधारित आणि नव्या प्रकारांना सामावून घेतलेले ते संगीत आहे. विद्यार्थ्यांमधल्या उत्साहाला केवढे उत्कृष्ट वळण लावले आहे आणि ते किती लोकप्रिय केले आहे याबद्दल त्यांना खरे श्रेय द्यायला हवे.

आपल्या 'वाहवा'ने गायकाच्या तानेची दाद केव्हाही द्यावी आणि स्वीकार म्हणून मान हलवून बुवांनी आणखी एक जोरकस तान ठेवून द्यावी, हा आमच्या रसग्रहणाचा, कौतुकाचा प्रकार. पण त्या उलट तो भाग पूर्ण संपेपर्यंत थांबून मग टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करण्याची यांची पद्धत. कित्येक रसिक, फुले घेऊन मंचाकडे धावत. (अर्थात फुले देणे हे येथे खऱ्याखुऱ्या प्रेमाचे प्रतीक आहे. कारण एका फुलाला ९ रुपयांपासून २२ रुपयांपर्यंत ऋतुमानाप्रमाणे किंमत पडते) प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट हे कौतुकमिश्रित रसग्रहण, त्याचा स्वीकार पुढे येऊन मान लववून करायचे, कित्येक वेळा अनेकदा मान लववून भागत नाही. विंगमधून परत येऊन पुन्हा स्वीकार करावा लागतो व तरीही टाळ्या थांबल्या नाहीत तर आणखी एखादा तुकडा 'पेश' करावा लागतो. एका पियानो वादकाला एकदा 'आता वाज-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व
ग्रंथालय

वणे शक्यच नाही ' असे आपल्या बोटांकडे बघून खुणेनेच व्यक्त करावे लागले. अशी त्याच्या कौतुकाची तऱ्हा !

कार्यक्रम संपवून परतताना माझ्या मनापुढे दोन चित्रे सारखी येत होती. एक म्हणजे एवढ्या गायकवादकांनी भरलेला मंच, अनेक प्रकारची वाद्ये, विविध दिव्यांचे प्रकाश आणि श्रोतृवर्गाचे ते कौतुक आणि मनापुढे तुलनेने सहज उभे राहणारे दुसरे दृश्य. पुण्यातल्या सवाई गंधर्वांच्या पुण्यतिथीच्या सोहळ्याचे, छोट्याशा मंचावर हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीतले भीमसेन जोशी यांचे ते शेवटचे गाणे. सकाळची वेळ. तीन रात्रींच्या जागरणाचे पारायण म्हणजे त्यांनी गायिलेली ती ' तोडी '. मधे बसलेली त्यांची उंचशी झब्यातली आकृती, पण खरा भीमसेनी आवाज, बाजूला दोन तंबोरे, सारंगी व तबलजी आणि ' येरी माई आज शुभमंगल गाओ ' चे सूर. फिल–हार्मोनियातले पूर्ण पाश्चात्य असे सूर विसरून हेच सूर गुणगुणत त्या दिवशी मी खोलीकडे परतलो.

० ० ०

# ८. क्रोस्नो गावातला ईस्टरचा सण

ईस्टरच्या सणानिमित्त एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात चारपाच दिवस सुट्टी होती. पिओत्रोविच या आमच्या मित्राने त्याच्या बहिणीकडे क्रोस्नो या छोट्याशा गावी चलण्याचे आमंत्रण मला व आमच्यातल्या आसामी मित्राला दिले. शनिवारी निघायचे होते. शुक्रवारपर्यन्त हवा तशी बरी होती व वसंतागम साजरा करायला अनुकूल हवा पडणार असे वाटत होते. शनिवारी पहाटे उठलो तेव्हा बाहेर चांगलाच पाऊस पडू लागला होता. वसंतागम साजरा करण्याला सुरुवात तर ही अशी झाली. तसेच पावसातून स्टेशनवर गेलो. स्टेशनचे बाहेरून छोटेखानी

चाटणारे स्टेशन आतून खूप मोठे होते. गाडीत जागा छान मिळाली, गर्दी तशी नव्हतीच. झलानागुरा या गावी उतरून बस स्टेशनवर गेलो. सुट्ट्यांमुळे तेथेही खूप गर्दी होती. मधल्या दालनात लोक दाटीवाटीने बसले होते. बसची घोषणा झाली की घोळक्यांनी बाहेर पडत.

पावसाळी हवेमुळे ऋतू बदलल्यासारखे वाटत नसले तरी एकंदर सृष्टीचे स्वरूप बदलल्याचे जाणवत होते. फेब्रुवारीत पोलंडमध्ये आलो तेव्हा बर्फाच्छादित जमीन व पर्णहीन वृक्ष दिसत होते. आता सर्वत्र हिरवळ दिसू लागली होती. सूचीपर्णी वृक्ष बर्फाचे नसून पानांचेच असावेत असे दिसत होते. इतर वृक्षांनीही आपल्या ओल्या–हिरव्या पालवीची वस्त्रे धारण करायला सुरुवात केली होती. त्याच्यामुळेच सपाट व टेकड्या नसलेल्या त्या प्रदेशात जिवंतपणा वाटत होता.

बसने क्रोस्नो (क्रोस्नो ओद्रास्की–कारण ओद्रेच्या काठी आहे म्हणून, आणखी कोठेतरी क्रोस्नो याच नावाची गावे बहुधा असावीत.) गावी पोहोचलो. तेव्हा पाऊसबिऊस नव्हता व छोट्या गावातल्या अनोळखी व नवेपणाच्या औत्सुक्याने पिशव्या खांद्यावर टाकून चालतच मुक्कामाकडे निघालो. बस नदीच्या अलीकडच्या छोट्या वस्तीतच थांबली. नदी पार करून टेकाडावर वसलेल्या मुख्य गावाकडे जायचे. नदीचे पात्र तसे मोठेच होते. मोठमोठे पडावही दिसले. गाव तसे छोटेसेच, वस्ती जेमतेम सात हजार, दोन रस्त्यांच्या कडेने आगगाडी-सारखे वसलेले लांबलचक. थोडीफार २–३ मजली घरे सोडली तर बाकीची बैठीच होती. टेकडीचा उतार, ओद्रेचे मोठे पात्र त्यातल्या बोटी, जुने चर्च व सुंदरसा नदीवरचा पूल यामुळे एकंदर गावाला चित्रमयता आली होती.

पिओत्रोविचची मोठी बहीण तेरेसा, तिचे यजमान वोजिमिज

कोचोट, त्यांचा चार वर्षांचा चुणचुणीत छोकरा स्त्रावेक व त्यांची शाळेत शिकणारी मावशी मिला यांनी आमचे मनापासून स्वागत केले.

ईस्टरचा सण तसा घरी बसूनच साजरा होतो. दोनतीन दिवस खाणेपिणे, गप्पा हाच मुख्य कार्यक्रम. सकाळी नऊच्या सुमारास प्रातः उपहार, दुपारी दोन अडीचच्या सुमारास जेवण, रात्री नऊच्या सुमारास रात्रीचे जेवण. अधूनमधून चहा-केक चालू असतेच. घरात टेलिव्हिजनवर दिवसभर काहींना काही कार्यक्रम चालूच असतो. अमेरिकन इंग्लिश, रशियन व निवडक जुन्यानव्या पोलिश फिल्म्स, मुलांचे कार्यक्रम, फुटबॉलचे सामने, बातमीपत्रे, हवामानवृत्त इ. चालू असतात. घरात बसून माणसाला इतकी करमणूक, ज्ञान व मनोरंजनासह साध्य झाली आहे. एका दिवशी आम्ही सात चित्रपट पाहिले. चित्रपटगृहात जाण्याची व तिकीट काढण्याची कटकट नाही.

दिवसभर घरात बसून टेलिव्हिजन पहात राहण्याची कल्पना मला व्यक्तिशः पसंत नसली तरी गोष्टीचे फायदे खूप आहेत. आपल्याकडे अर्थात् पावसाळ्यातले धो धो पावसाचे काही तास वगळले तर तशी घरी बसून रहाण्याची वेळ क्वचित् येते. आपले हवामानही आपल्याला बाहेर हिंडायला प्रवृत्त करणारे. या लोकांना वसंतऋतु सोडला तर घरी राहणे भागच पडते. आपल्यालाही दिवाळीच्या दिवसात घरोघर हिंडताना पोटावर होणारे अत्याचार टाळायचे असले तर ही एक बरी सोय होऊ शकेल. आरामखुर्चीत तंगड्या पसरून बसावे आणि समोर दूरचित्रवाणीवर आपले निवडक चित्रपट—माणूस, शेजारी, पहिली मंगळागौर चालू असावेत. नाहीतर क्रिकेटचा कसोटी सामना-काळ्या बाजारात तिकीट घ्यायला नको आणि सुटीच्या दिवशी बस, गाडी, टॅक्सी, रांगा वगैरे काही त्रास न घेता पुन्हा ! अर्थात् आपली दूरचित्रवाणी आणि छोटी गाडी केव्हा येणार आणि कोणते आधी येणार हे निर्णय होतील तेव्हा खरे. ईस्टर सणावरून गाडी दुसरीकडेच गेली. असो.

पोलिश कौटुंबिक जीवनाचा येथे थोडा अधिक परिचय झाला. अर्थात् एकूण पाश्चिमात्यांचा औपचारिकपणा आपल्याला तितकासा रुचत नाही. आई-बापांनी मुलांना किंवा नवराबायकोंनी एकमेकांला सारखेच प्रोंशे ( कृपया ) व जिंकूया ( धन्यवाद ) म्हणत रहायचे! कल्पना करा. आपल्याकडच्या सीताकाकूंनी रामभाऊंच्या पुढे पिशव्या आणि रेशनकार्डे आदळून रेशनिंगचे धान्य आणण्याचे फर्मान सोडण्याऐवजी, 'कृपा करून रेशनिंग आणाल का गडे' असे म्हटले तर त्याचा परिणाम काय होईल? अर्थात् कृपा करून, गडे वगैरे शब्द येत नाही असे नाही सीताकाकूंच्या तोंडून, पण केव्हा, एखादे पातळ किंवा दागिनाबिगिना हवा असेल तेव्हा आणि बाळयालासुद्धा अभ्यासाला लावायचा तर कृपया म्हणून थोडाच तो दाद देणार आहे.

पाश्चात्यांकडील जेवणातला खाद्यपदार्थांचा सुटसुटीतपणा मात्र घेण्यासारखा आहे. त्यामुळे सगळेजण एकदम जेवायला बसतात. पंचपक्वानांचा दरवळ, कढीचा भुरका, मठ्ठयाबरोबर जिलबी किंवा तूप वहात असलेली पुरणपोळी असले प्रकार सणाच्या दिवशी सुद्धा नाहीत. तेच केक, बटाटे, व इतर पदार्थ त्या दिवशी जरा अधिक लक्षपूर्वक टेबलावर मांडले जातील. नेहमीपेक्षा संख्येने थोडे अधिक इतकेच. रामभाऊ पानावर बसून सीताकाकूंना फर्मावीत नाहीत. सगळ्यांनी मिळून जेवण्याचा वा खाण्याचा कार्यक्रम तास दीडतास चालू रहातो. गप्पाही रंगत असतात. मध्येच पटापट बशा व ग्लास टेबलावरून अदृश्य होत असतात. रावसाहेब पानावरून उठून पान चघळीत लोडावर आडवे होऊन घोरू लागले आहेत आणि 'मंडळी' तिकडे मुकाट्याने आवराआवर करीत आहेत असे दृश्य दिसणार नाही. भोजनात सुरू झालेल्या गप्पा भोजनोत्तरही रंगत राहतात व सर्वजण त्यात मनापासून भाग घेत असतात.

क्रोन्सोसारखी छोटी गावे पोलंडमध्ये खूप आहेत. क्रोन्सो तसे अगदी

खेडेगाव नसले तरी गॅस नाही व संडासही साधेच. आंघोळ कावळ्याचीच करावी लागे. पोलिश अस्खलित बोलता येत नसल्याने 'सारे काही ठीक आहे' एवढेच म्हणून उत्तर द्यायचो. मला म्हणायचे असायचे "अरे बाबा, शहरी खडखडाटाला कंटाळलेल्याला ही आल्हाददायक विश्रान्ती आहे. आणि आमच्याकडची लहान गावे व खेडी तर तुला ठाऊकही नाहीत कशी आहेत ती! लहानपणी प्राथमिक शाळेत वाचलेला शहर व खेडे संवाद किंवा मोटार व बैलगाडी यांचा संवाद मला आठवायचा. पण त्याला काय काय सांगत बसणार शब्दकोशाच्या साहाय्याने! म्हणून गप्पच बसावे लागे. तो मात्र म्हणायचा लहान गाव म्हाताऱ्यांना च मोठे तरुणांना चांगले असते म्हणून. लहान गावाचा तोटा मात्र लगेच दिसून आला. स्वावेकने त्याच्या आईच्या डोळ्यात बोट घालून जखम केली आणि त्या दोघा नवराबायकोंना झलानागुरा या तालुक्याच्या गावी जावे लागले. शिवाय आयत्यावेळी अधिकउणे पाहुणे आल्यास स्पॉझिप्ची, डेलिकाटेसी या रोजच्या गरजेच्या वस्तू पुरवणाऱ्या दुकानांच्या सोयी अगदीच अपुऱ्या. आपल्या खेडेगावातल्या भिकुमल मारवाड्याकडे केव्हाही मीठमीरची, चहा, गूळ वगैरे मिळू शकते तसे नाही इथे. अर्थात त्यांच्याकडे असे आयत्यावेळी पाहुणेच काय, कोणी सहज चहालाही ठरवल्याशिवाय जात नाही म्हणा!

कोचोट कुटुंबाच्या आदरातिथ्यात आमचे ते तीन दिवस अगदी मजेत गेले. स्वावेकशी तर इतकी गट्टी जमली होती की, भाषा येत नसताही आम्ही खूप गप्पा मारायचो आणि खेळायचो. त्याची खेळणी तरी किती प्रकारची होती. नाना प्रकारची विमाने, बोटी, मोटारी, बाहुल्या, प्राणी. एक त्याच्या उंचीचे केसाळ अस्वल तर तो सारखा घेऊन हिंडायचा.

तेरेसा व मिला या दोघी बहिणींच्या लहानपणापासूनच्या स्मरणवह्या होत्या. त्यांत कितीतरी नातेवाईक, मित्र, पाहुणे वगैरेंची हस्ताक्षरे

चित्रे, वगैरे होते. मी मराठीत व हक या मित्राने आसामी भाषेत त्यांच्या स्वागताबद्दल आभार नोंदवले व शेजारी इंग्रजीत भाषान्तर लिहून ठेवले. त्याचे त्या कोणाकडून तरी पोलिश भाषेत रूपांतर करून घेणार. फोटो व इतर स्मृतिचिन्हे यांची देवाणघेवाणही झाली.

मंगळवारी जवळचे आणखी एक गाव पाहून जायचे असा बेत होता; पण हवा एकदम बिघडली होती. पाऊसही पडत होता. तेव्हा बेत बदलून थेट गाडीने स्टेचीनला जायचे ठरले. कोचोट दापत्य पहाटेच उठून झलानागुराला गेले होते. निघताना स्वावेक कसा निरोप घेतो त्याची मला उत्सुकता होती. आपल्या दारात छकडा किंवा टांगा आल्यावर लहान मुले आधीच जागा अडवून बसतात व मामा किंवा काकाबरोबर जाण्याचा हट्ट धरतात. स्वावेकला आपल्या मामाचा खूप लळा असूनही व आमच्याशी चांगली दोस्ती जमलेली असूनही फाटकापलीकडूनच त्याने निरोप दिला. मी उद्या स्टेचीनला येणार आहे व एकटाच बरे का ! असे मात्र बजावले. आम्ही चालतच स्टेशनकडे निघालो. थेट गाडी नसल्याने वाटेत एका ठिकाणी गाडी बदलून स्टेचीनकडे परतलो.

० ० ०

# ९. पूर्व जर्मनीतली अपूर्वाई

क्रोस्नोहून परतल्यावर काही दिवस अभ्यासात गेले; तर लवकरच आणखी एक प्रवासाची संधी चालून आली.

पूर्व जर्मनीतल्या आर्किटेक्ट्स असोसिएशनच्या निमंत्रणावरून पाचसहा दिवसांचा एक धावता दौरा करणे ही आमच्या सर्वांच्या दृष्टीने अ ' पूर्व ' संधीच होती. वर्तमानपत्रांतून पूर्व जर्मनीच्या राज-

कारणाबद्दल नेहमीच वाचायला मिळत असते. परंतु नगरांची वाढ व विकास, नवी शहरे, उद्योगधंदे यांच्या पाहणीवरून समाजजीवनाची व लोकांच्या इच्छाअपेक्षांची जशी कल्पना येऊ शकेल, तशी केवळ राजकारणामुळे पूर्वग्रहदूषित अशा बातम्या वाचून तितकीशी येत नाही. आमच्यापैकी सर्वांनीच या संधीचा लाभ पुरेपूर घ्यावयाचाच असे ठरवून जरूर ती व्यवस्था करा असा प्रा. झारेंबांच्याजवळ आग्रहच धरला. राहणे, जेवण व फिरण्यासाठी बस, एवढी व्यवस्था जर्मन असोसिएशनने करण्याचे मान्य केल्यावर सगळे प्रश्न चुटकीसरसे सुटले.

तेवीस एप्रीलला सकाळी सात वाजण्याच्या सुमारास आम्ही बसने निघालो. स्टेचीनपासून अगदी नजीकच्याच सीमेवरील नाक्यातून प्रवेश करण्याची खास परवानगी आमच्याकरता मिळालेली होती. पोलिश बसने आमचा तेथपर्यन्तचा छोटासा प्रवास सुरू झाला; तेव्हा प्रत्येकाचश सहलीबद्दलच्या उत्साहाला उधाण आले होते. कोणी काय सामान घेतले याची चर्चा झाली. मग गाण्यांचाही कार्यक्रम सुरू झाला. तेवढ्यांत सीमा जवळ आली.

सीमेवरील चौकीच्या दोन्ही बाजूस दोन्ही देशांच्या सीमा दर्शवणारे कुंपण आहे. या ठिकाणी नदी, पर्वतराजी अशी नैसर्गिक सीमा नाही. अर्थात दक्षिणेकडच्या बऱ्याचशा भागात मात्र नदी हीच सीमा मानली गेलेली आहे.

चौकीपाशी बस आल्यावर पोलिश कमांडरने हस्तांदोलन करून आमचे प्रत्येकाचे स्वागत केले व कस्टम्स, पासपोर्ट, परकीय चलन वगैरे बाबतीत सहाय्य करून चौकीच्या पलीकडे नेले व ‘ तुमचा प्रवास सुखकर होवो ’, अशा शुभेच्छा प्रदर्शित करून प्रत्यक्ष सरहद्दीच्या कुंपणापर्यंत नेले. पोलिश हद्दीचे कुंपण व जर्मन हद्दीचे कुंपण यात बराचसा मोकळा भाग होता. शास्त्रीय प्रयोगात निर्वात प्रदेश असतो

तसा हा निर्मनुष्य प्रदेश. या प्रदेशातून जाताना आता आपण जर्मनीत प्रवेश करणार आहोत, हा एक रोमांचकारी अनुभव वाटला. आता पूर्व व पश्चिम असे कृत्रिम भाग झाले असले तरी मूळची जर्मनभूमी शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचलेल्या गटेची भूमी, वैदिक धर्माचा, ग्रंथांचा, संस्कृत भाषेचा तळमळीने अभ्यास करणाऱ्या विद्वानांची भूमी, जगातले श्रेष्ठ शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ निर्माण करणारी भूमी, आपल्या उच्च आर्यकुलाचा अतीव अभिमान बाळगणाऱ्या जर्मनांची भूमी, साऱ्या जगाला पादाक्रांत करू पाहणाऱ्या हिटलरची भूमी महायुद्धामध्ये भग्न व नष्ट होऊनही प्रचंड वेगाने प्रगति करणाऱ्या जर्मनांची भूमी– अशा त्या जर्मनभूमीत आम्ही प्रवेश करीत होतो. जर्मन कमांडरनेही आमचे हसतमुखाने स्वागत केले व पुन्हा सारे उपचार पार पाडण्यासाठी चौकीत नेले. सगळे पुरे होईपर्यंत बराच वेळ गेला तरी आम्हाला घेऊन जाणारी जर्मन बस आलेली नव्हती. सकाळी न्याहारी घेता आलेली नव्हती व कडकडून भूक लागली असली तरी उपयोग नव्हता.

बऱ्याच वेळाने अखेर एक डौलदार बस तिचे सांगितिक हॉर्न वाजवित चौकीच्या आवारात शिरली. ऑक्सफर्डचे फर्डे इंग्रजी बोलणाऱ्या, जर्मन दुभाषी व मार्गदर्शकाने जर्मन हद्दीत पुन्हा एकदा आमचे स्वागत केले. बसमधून जर्मन आर्किटेक्टस् असोसिएशनचे प्रतिनिधीही आले होते. त्यांना मोडकेतोडके पोलिश व इंग्लिश येत होते. बसचा ड्रायव्हर आणि मार्गदर्शक यांच्यात एकमत न झाल्याने बसला उशीर झाला होता. ड्रायव्हरच्या मते आम्ही दुसऱ्याच एका नाक्यावरून प्रवेश करणार होतो म्हणे. सकाळचा चांगला वेळ मात्र फुकट गेला होता.

बसमध्ये सगळे स्थानापन्न झाल्यावर ती वेगाने धावू लागली. त्या दिवशी हवाही फारच छान होती. पोलंडमध्ये स्वच्छ सूर्यप्रकाश बऱ्याच दिवसात आम्हाला पाहावयाला मिळाला नव्हता तो आज जर्मनीत

शिरल्यावर आम्ही पाहत होतो. बसमधून आमच्याकरता प्रातःउपहार व कॉफीही आली होती. त्यांचा समाचार आम्ही आस्थेने घेत होतो.

बस ‘ ऑटोबॉन ’ वरून धावत होती. इंजिनिअरिंग कॉलेजात असताना केवळ वाचूनच माहित झालेले हे ऑटोबॉन. या हमरस्त्यावरून आपल्याला कधी काळी तरी अतिवेगाने जायला मिळावे अशी इच्छा होती, ती आज फलद्रूप होत होती. हिटलरने आपल्या दणकट लष्करी वाहनांचा देशाच्या या टोकापासून त्या टोकाला अल्पावधीत नेण्यासाठी त्यांना जन्म दिला. आजच्या मोटारयुगात त्यांची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. गावे व खेडी एका बाजूला टाकीत, पसरलेल्या जंगलांतून व शेतांमधून हे रस्ते धावतात. वसाहतीकडे जाणारा एखादा रस्ता व एखादा लोहमार्ग खालून वा वरून बाजूला होत असतो. महत्त्वाच्या रस्त्यांना छेदताना दुसऱ्या रस्त्यावर वा दुसऱ्या दिशेला वळण्यासाठी योग्य अशी रचना असते. पाट्या असतात आणि वेग फारसा कमी न करता, वळणे साध्य होऊ शकते.

ऑटोबॉन सोडून काही वेळाने आम्ही दक्षिणेकडे श्वॅत या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वळलो. आता रस्ता लहानमोठ्या खेड्यांमधून जात होता. ही युरोपियन खेडी आपल्यापेक्षा फार वेगळी. एक तर बरीचशी घरे लाकडी असतात. क्वचित् काही विटामातीचीही. पण एकंदरीत सगळ्यांचे बाह्यरूप हे सारखेच. प्रत्येकाचे कमीजास्त ऐश्वर्य वा सधनता ही आतल्या सुखसोयी, उपकरणे, फर्निचरवरून समजायची. अर्थात टेलेव्हिजनसारख्या काही गोष्टी प्रत्येक घरात असतात व त्यामुळे बाहेरच्या जगात घडणाऱ्या गोष्टींचे घरात प्रत्यक्ष ज्ञान होत असते. त्यामुळे शहरे व खेडी यांतील लोकांमधला फरक बराच कमी होत असतो. गावाच्या मध्यभागात सतराव्या, अठराव्या शतकात बांधलेल्या चर्चचा कळस आकाशात उंच उठून दिसतो. बाकीचे निसर्गचित्रही आपल्या-सारखे खडकाळ व डोंगराळ दिसत नाही. दूरवर उलगडत जाणारी

हिरवी मैदाने व शेते (हिवाळ्यात बर्फमय म्हणून पांढरी), एका बाजूला जंगल व त्यातून मधूनच ट्रॅंग्युलेशन सर्व्हेचे टोकदार उंच टॉवर किंवा विजेच्या तारा लोंबकळत ठेवणारे प्रचंड हातांचे राक्षसी पायलॉन्स.

श्वॅत या गावी साधारण साडेअकरा–बाराच्या दरम्यान पोहोचलो. प्रथम प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे खाद्यपदार्थांची मागणी नोंदवून ठेवण्याचा कार्यक्रम पार पडला व नंतर गावातल्या सर्वांत उंच इमारतीवर जाऊन गावाचे विहंगम दृश्य पाहण्याचे ठरले. उंचावरून गावाच्या रचनेची, बांधणीची माहिती चटकन, व नीटपणे होऊ शकते. युरोपमधल्या बहुतेक शहरांतून अशा इमारती, चर्चचे किंवा मुद्दाम बांधलेले मनोरे, वगैरे ठिकाणाहून अशी सोय केलेली असते. बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची तर ही चांगली सोय असतेच, पण गावात राहणाऱ्यांनाही गावाबद्दलची आपुलकी वाढवायला मदत करणारी ही सोय आहे. पर्वतीवरून पुण्यातल्या त्या अस्पष्ट इमारतींकडे बोटे दाखवून ती मंडई, ते माझे कॉलेज, तिकडे स्टेशन आहे असे वर्णन करून सांगणाऱ्यांना ही गोष्ट एकदम पटेल.

रशियातून नळाने येणारे तेल श्वॅत या गावी शुद्ध केले जाते. त्या तेलशुद्धीकरणाचा एक आणि कागदाचा एक, असे दोन मोठे कारखाने आहेत. गाव तसे सातशे वर्षांचे जुने आहे. पण युद्धात ऐंशी टक्के नष्ट झाले होते. गावाच्या एकंदर रचनेवर बरोक काळातल्या बांधणीचा बराच पगडा आहे. पण १९५८ साली तेलशुद्धीकरण कारखाना उभारल्यावर गावाची प्रचंड प्रमाणात वाढ करावी लागली ती मात्र अगदी नवीन रचनेची व योजनाबद्ध करण्यात आली आहे. केवळ काही वर्षांपूर्वी सहा हजार लोकवस्ती होती, तेथे आज वीस हजार झाली आहे. साठ हजार व नंतर एक लाख इतक्या लोकसंख्येपर्यन्त त्याची वाढ होणार आहे व त्या दृष्टीने सर्व आखणी करण्यात आली

आहे. सर्व इमारती बहुधा पूर्वरचित सामानाच्या (प्रीफॅब्रीकेटेड मटेरियल) आहेत. त्यामुळे उभारणी स्वस्त व झटपट तर होतेच, परंतु प्रत्यक्ष जागेवर, कमी मनुष्यबळावर व सुसंबद्ध वेळापत्रकानुसार होते. अशाप्रकारच्या इमारती असूनही त्यांच्यात विविधताही खूप निर्माण केली आहे. प्रत्येक निवासविभागात (रेसिडेन्शिअल सेक्टर) एक, सर्व दैनंदिन गरजा भागविणाऱ्या सोयींचा केंद्रबिंदू निर्माण करण्यात आला आहे. त्या ठिकाणी एकाच छपराखाली पोस्ट ऑफिसपासून बूट दुरुस्त करणाऱ्या दुकानापर्यंत सर्व गोष्टी असतात. जवळपास शाळाही. सर्वांनाच नेहमी या ठिकाणी यावे लागते. व त्यामुळे सुसंघटित समाजजीवन निर्माण करण्यासाठीही हा केंद्रबिंदू उपयोगी पडतो.

श्वेतमधले जेवण फारच रुचकर होते. आपल्यासारखे मसालेदार व फोडणीचे पदार्थ या लोकांच्या खाण्यात असावेत असे वाटले. पुष्कळ दिवसांनी असे जेवण मिळाले. जेवणानंतर मुख्य आर्किटेक्टच्या कचेरीत जाऊन नकाशे पाहणे, चर्चा व तदनंतर गावातून एक फेरी एवढा कार्यक्रम उरकून आमच्या बसने फ्रँकफूर्टचा रस्ता धरला.

आपल्याकडे जसे नुसते वडगाव, वडगाव बुद्रुक, वडगाव खुर्द, जयरामस्वामीचे वडगाव, मावळ वडगाव अशी एकाच नावाची अनेक गावे आहेत तशी युरोपातही असतात, हा शोध गममीदार वाटला. फ्रँकफूर्ट या नावाचीच पूर्व व पश्चिम जर्मनीत दोन का अधिक गावे आहेत. आम्ही जाणार होतो फ्रँकफूर्ट ओडर या गावी. ओद्रा ही नदी जर्मनीत ओडर म्हणून ओळखली जाते. ओद्रा हे तिचे पोलिश नावच प्रथम मला अधिक मृदू वाटायचे. पण जर्मनांच्या तोंडून 'ओडर' हे नाव ऐकल्यावर तेही मृदू वाटले. 'ड' चा उच्चार 'द' व 'ड' यांच्या मधलाच काहीसा करतात ते लोक.

जर्मन लोकांच्या करड्या शिस्तीप्रमाणे भाषाही जरा ऐकायला कर्णकटूच वाटेल अशी माझी कल्पना होती. 'जर्मन हाऊ टू स्पीक

ॲण्ड राईट इट ' या रोझेनबर्गच्या पुस्तकावरून जर्मनचा अभ्यास करू पाहणारा मी आणखी काय कल्पना करणार? कारण नावातून, शब्दातून डी. आर. टी. वगैरे अक्षरे अशा काही तऱ्हेने येतात की शब्द उच्चारायला कर्कशच वाटावेत. दुसरी गोष्ट म्हणजे समास. कित्येक शब्द जोडून समास करण्याची या भाषेची ढब म्हणजे थेट बाणभट्टाच्या कादंबरी-तल्या चारपाच ओळींच्या एकेका शब्दाची आठवण व्हावी. पण प्रत्यक्ष या लोकांच्या तोंडून जर्मन भाषा ऐकल्यावर ती कानाला मृदूच वाटते. अगदी फ्रेंच माणसाच्या तोंडातून इंग्रजी ऐकल्यासारखी. फ्रेंच माणूस इंग्रजी शब्दांना फ्रान्समधल्या अस्सल साखर, मध वगैरे गोड पदार्थांत गुळगुळीत करून मगच ते इंग्रजी तुमच्या कानात ओततो. जर्मन भाषा पोलिश भाषेच्या शेजारी असली तरी आणि तुलनेने इंग्रजीला जवळची वाटली तरी उच्चारांच्या बाबतीत फ्रेंचला जवळची वाटते.

संध्याकाळी फ्रँकफूर्टला पोहोचलो व प्रथम एक छानदार चहा घेतला. जर्मन चहाही मला अधिक आवडला. एक तर चहाबरोबर आपल्या-सारखे दूध होते व तो कपबशीतून होता. कपातून दुधाच्या चहाचा एकेक घोट घेणे व पोलिश लोकांसारखे पेल्यामधून, लिंबाच्या फोडी टाकलेल्या चहाचा घोट घेणे या दोन्हींची लज्जत वेगळीच. पण आपली कपबशीतून दुग्धयुक्त चहा फुरकत पिण्याची जन्मजात सवय. तेव्हा तोच बरा वाटतो झाले. चहापानानंतर गावातून व बाजारपेठेतून एक फेरफटका मारला. दुकाने सगळी बंद असल्याने आम्ही सगळे किंमतीची चर्चा करीत मनानेच खूप खरेदी करीत होतो. अंधार पडू लागला तसे बसकडे वळलो व ' आयसेनहुटेनस्टॅट ' या गावाच्या दिशेने बसचा प्रवास सुरू झाला.

पाऊणे नऊ वाजता आम्ही त्या गावात पोहोचलो. हॉटेलची सुंदर, नीटस इमारत पाहूनच प्रवासाचा सारा शीण नाहीसा झाला. काऊंटर-वरच्या मुलीला इंग्रजी चांगले येत असल्याने सर्व औपचारिक गोष्टी

सुरळीत पार पडल्या. खोल्या शोधून काढून प्रत्येकजण दहापाच मिनिटे विसावले. पुन्हा साडेनऊ वाजता हॉटेलचे स्वयंपाकगृह बंद होत असल्यामुळे जेवणासाठी घाई करणे भाग होते. जेवण व त्या समवेत व नंतर आर्किटेक्ट्स असोसिएशनच्या प्रतिनिधींशी गप्पा हे सगळे अकरा–साडेअकरापर्यन्त चालले होते. डोळे पेंगू लागल्याने मग सगळ्यांनीच निरोप घेऊन खोलीकडे पावले वळवली. सकाळी लवकर उठायचे ठरवूनच मी निद्राधीन झालो.

सकाळी लवकर उठून मुख्य कार्यक्रम सुरू होण्याअगोदर पायीच गावाचा एक फेरफटका मारण्याचा विचार प्रत्यक्षात अमलात आणता आला. पायी हिंडल्याशिवाय कोणतेही गाव पाहिल्यासारखे वाटत नाही. गावाची रचना, लोकांचे राहणे, चालणे, वागणे, मुलांचे खेळ, वाहनांची रहदारी, रस्ते, दुकाने, जाहिराती सारे काही मनासारखे पहायचे असेल तर मोटारीचा काय उपयोग? या बाबतीत सायकलही नको वाटते. आपल्या पायांचा ( अर्थात बुटातून म्हणा ) व त्या गावाच्या मातीचा संबंध आल्याशिवाय, रमतगमत दुकाने, वस्तू, इमारती पाहिल्याशिवाय त्या गावाशी आपले आपुलकीचे नाते जोडल्यासारखे वाटत नाही. सुदैवाने आमचे बाकीचे लोक थोडे उशीराच उठल्याने मला शहराच्या मध्यभागात तरी मनसोक्त हिंडता आले. काही आडव्या, मधूनच उभ्या अशा नव्या इमारती, यांची वैचित्र्यपूर्ण पण सुंदर रचना त्या मुख्य रस्त्यावर आहे. टोकाला दूरवर, शहराच्या मुख्य कारखान्याचे, पोलाद कारखान्यांचे मनोरे व धुराडे दिसले. पोलंडप्रमाणे येथेही दुकानातून वस्तू नीटनेटक्या व किंमतीची लेबले लावून ठेवलेल्या होत्या. साधारणतः खाद्यपेय पदार्थ, काचेच्या व इतर वस्तु येथे तुलनेने स्वस्त वाटल्या.

न्याहारीनंतर सिटी कौन्सिलला भेट होती. प्रत्येक युरोपियन गावात असते त्याप्रमाणे शहराची प्रतिकृती व नकाशे, छाया चित्रे यांचे एक

मोठे प्रदर्शन येथेही होते. अशा प्रदर्शनाचे महत्त्व प्रवाशांप्रमाणेच तेथील नागरिकांनाही वाटते. गावाची प्रतिकृती, नकाशे, छायाचित्रे यांच्याबद्दल औत्सुक्य नागरिकांनाही असते. नागरिकत्वाच्या भावनेची वाढ 'आपले हे गाव ' या भावनेची वाढ व्हायला हे प्रदर्शन पूर्वी म्हटलेल्या मनोऱ्या-प्रमाणेच उपयोगी पडेल, पण ते उभारायलाही आपल्याकडच्या नगर-पालिका, ' सरकारी अनुदान ' मिळत असेल तर करू असेच म्हणतील.

आयसेनहुटनस्टॅट हे एक नव्या आखणीचे गाव आहे व इंग्लंड-मधल्या क्रॉली या नव्या शहराशी त्याचे बंधुत्वाचे संबंध प्रस्थापित करण्यात आले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर बांधलेले हे पहिलेच नवे शहर. कसेनबर्ग या जुन्या खेडेगावाजवळ ते उभारण्यात आले आहे. पूर्वी हा भाग केवळ शेतीचा म्हणून दुर्लक्षित राहिला होता. त्याच्या विकासाला वाव देण्यासाठी व रशियातून येणारे लोखंड, पोलंडमधून येणारा कोळसा वापरून शुद्ध करण्यासाठी, तेथे एक प्रचंड कारखाना काढण्यात येऊन हे नवे शहर पन्नास सालापासून वसविण्यात आले. नदी, कालवा, जंगल व एकंदरीत उतार आणि मूळची दोन खेडेगावे या सर्व परिस्थितीचा योग्य असा फायदा घेऊन शहराची आखणी केली आहे. आम्ही बरेच नवे विभाग पाहिले. तसेच एका उंच टेकडी-वरून सबंध शहराचे विहंगम दृश्यही पाहिले. दूरवरच्या बलास्टफर्नें-सच्या पार्श्वभूमीवर नव्या शहरातल्या नव्या धर्तीच्या इमारतींच्या रचना जुन्या इमारती व जुन्या भागांशी योग्य तऱ्हेने जुळून जाताना पाहि-ल्यावर मन प्रसन्न झाले. त्या टेकडीवर छानपैकी विस्तृत बाग, एक हॉटेल वगैरेची तरतूद केली आहे. एका दुर्बिणीतून गावाचे नीट दर्शन घेता येते. गावाचा फेरफटका उरकून सरळ लिपझिग शहराकडे जाणाऱ्या रस्त्याला आमची बस वळली.

लिपझिग हे आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनासाठी प्रसिद्ध असलेले

शहर आहे. आम्ही पोहोचलो तेव्हा जवळजवळ अंधार पडला होता. रस्त्यावरची गर्दी, ट्राम्स, बसेस, निऑन साईन्सच्या जाहिराती, जुन्या-नव्या, उंच-बैठ्या इमारतींची गर्दी, या सगळ्यांमुळे आपण एकदम पुण्यासारख्या मोठ्या गावात आल्याचा भास झाला. प्रथम अर्थातच हॉटेल शोधून काढून थोडी विश्रांती व मग जेवण आणि जवळपासच्या भागातच एक छोटासा फेरफटका, एवढा कार्यक्रम उरकून, थकलेल्या शरीराला विश्रांती देण्यासाठी म्हणून खोलीकडे परतलो. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून हिंडायला मात्र मिळाले नाही. चक्क पाऊस पडत होता. हॉटेलच्या दारातून रस्त्यावरची रहदारी पहात बसणेच प्राप्त होते. समोरच्या चौकात त्या पावसातही एक स्त्री-पोलिस वाहतुकीचे नियंत्रण करीत होती. पाऊस थोड्या वेळाने थांबला अन् आमचा कार्यक्रम सुरू झाला.

कार्यालयांना भेटी, चर्चा, शहराच्या मुख्य भागाची व उपनगरांची पाहणी हा कार्यक्रम होता. लिपझिग हे सुमारे साडेसहा लाख लोकवस्तीचे शहर. युद्धात येथील बऱ्याच इमारती पडल्या, काही शिल्लकही आहेत, पण जुनेपणा टिकविण्यासाठी काही जशाच्या तशा बांधूनही काढल्या आहेत. १९५४–५५ सालापर्यंत शहराचा मध्यभाग व सार्वजनिक इमारती, यांच्याऐवजी राहण्यासाठी, घरांच्या बांधणीवरच लक्ष केंद्रित करण्यात आले होते. त्यानंतर शहराच्या मुख्य केंद्रभागाची पुनर्रचना व बांधणी करण्याचे काम हळूहळू हाती घेण्यात आले. चौदाव्या शतकातल्या जुन्या गावाच्या विस्ताराएवढा आजच्या शहराचा, या मुख्य केंद्रभागाचा ( टाऊन सेन्टर ) विस्तार आहे. त्या वेळच्या गावाभोवतालच्या जुन्या खंदकाचा उपयोग केंद्रभागाभोवती प्रशस्त हिरवळी, बागा, गाड्या उभ्या करण्याची जागा, प्रशस्त वलयाकृती रस्ता ( रिंग रोड ) वगैरे तरतुदीसाठी अत्यंत योग्य तऱ्हेने करून घेण्यात आला आहे. केंद्रभागात अशा गोष्टींचा इतर शहरांतून

अभाव जाणवतो. जुने चर्च, किल्ला, बाजाराचा चौक यांची नीट दुरुस्ती करून जुन्या चांगल्या वास्तू टिकविल्या आहेत. तर कुरूप दिसणाऱ्या व अनावश्यक इमारती पाडून त्यांच्या जागी उंच अशा गगनचुंबी इमारतीही बांधण्यात आल्या आहेत. नव्याजुन्यांचा मेळही फारच छान रीतीने घालण्यात आला आहे. मध्यभागात काही राहण्याच्या इमारतींची सोय असल्याने हा भाग संध्याकाळी व रात्री एकदम ‘ सारे कसे शान्त शान्त ’ असा होत नाही. त्यातही थोडे खेळते जीवन राहते. शिवाय या मध्यभागाभोवतीच ४००, ५०० व ६०० प्रवाशांच्या सोयी असलेली प्रचंड हॉटेल्स बांधण्यात येत आहेत. प्रवाशांवर हे शहर बरेच अवलंबून असते. हॉटेलांमधली व्यवस्था किती नमुनेदार असते ते मुद्दाम दाखविण्यात आले, अगदी स्वयंपाकघरात नेऊन. तेथे पदार्थांच्या चवी योग्य आहेत की नाही हे चाखून पाहत खास निरीक्षक फिरत होते. भूक लागली होती म्हणून त्या माणसांचा हेवा वाटला, नाही तर ते एक त्रासाचे काम वाटले असते.

शहराची प्रतिकृती पाहिल्यानंतर व केंद्र भागाची एक पायी फेरी करून नंतर शहरातून बसने एक फेरफटका मारला. वेळेअभावी प्रदर्शनाची जागा बाहेरूनच पाहावी लागली. दुपारी बर्लिनकडे रवाना झालो. लिपझिगहून ऑटोबॉन या हमरस्त्याने साडेतीन-चार तासांत बर्लिनला पोहोचता येते. सर्व हमरस्ते बर्लिनभोवती ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या वलयाकृती रस्त्यास येऊन मिळतात.

लिपझिगमध्ये पावसाळी हवा असली तरी बर्लिनमध्ये मात्र स्वच्छ सूर्यप्रकाश होता. शहराचा विस्तार बराच असल्याने परिसरात आल्यानंतरही इच्छित स्थळी पोहोचेपर्यंत बराच वेळ मोडला. ‘ गावात तुम्ही प्रथम कोठून शिरता त्यावरूनच गावाबद्दलचे मत बनते ’ अशी एक म्हण आहे. त्यानुसार मत द्यायचे तर सुरुवातीचेच मत काही चांगले होत नाही. कारण अरुंद रस्ते, जुनाट इमारती असलेल्या भागातून

आम्ही आत शिरलो. आपल्याकडच्यासारख्या गलिच्छ वस्त्या नसल्या तरी अजून जुनाट वस्त्या बऱ्याच आहेत, अर्थात नूतनीकरण होण्याची वाट पाहात. वाटेत रशियन स्थळशिल्पाचा (लॅण्डस्केप आर्किटेक्चर) नमुना म्हणून वाखाणण्यात येत असलेल्या सैनिकांच्या स्मारकरूपी सीमेटरीचा काही भाग पाहिला. जसजसे आम्ही, आजूबाजूची लहान गावे (जी आता बर्लिनचाच भाग बनली आहेत) सोडून मुख्य बर्लिन शहराकडे येऊ लागलो तसतसे आजूबाजूचे चित्र बदलू लागले. तिथला काही जुना भाग मुंबईतल्या दादर, माटुंग्यासारखा व काही फोर्टसारखा दिसत होता. रस्ते मात्र जरा अरुंद वाटत होते. नवीन बांधलेले भाग एकदम उठून दिसत होते. प्रथम आम्ही असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना भेटून नंतर थोडासा उपहार घेतला व नंतर बर्लिनचा केंद्रभाग व उप-नगरातून फेरी मारली.

जुन्या बर्लिन शहराचे केन्द्र पूर्व बर्लिनमध्येच राहिले आहे. अर्थात पूर्णत: उध्वस्त अवस्थेतच. प्रथम राहण्याची घरे व इतर भागांच्या बांधणीनंतर आता या केंद्र भागाच्या बांधणीवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. या भागाकडे जाणारा मुख्य रस्ता म्हणजे कार्ल मार्क्स ॲव्हेन्यू. या रस्त्यावरच्या बऱ्याच इमारती, फ्रँकफूर्ट गेटपासून अलेक्झांडर प्लेसपर्यंत-च्या, या रशियन वास्तुशिल्पाचा नमुना आहेत. दिल्लीतली रशियन वकिलातीची इमारत उदाहरण म्हणून देता येईल. अलिकडच्या इमारती जर्मन–वास्तुशास्त्रज्ञांनी बांधलेल्या–या मात्र अगदी वेगळ्या म्हणून उठून दिसतात. जुन्यामध्ये साधारण ठराविक चौकटींची व सरळसोट रचना आढळते, तर नव्यात उंच, उभ्या, आडव्या, लांब–निरनिराळे आकार व बाह्यांगाचा एकमेकांशी योग्य मेळ साधून बांधलेल्या अशा दिसतात. कुशल कलाकाराने केवळ उभ्या, आडव्या व निरनिराळ्या रेषांनी जिवंत चित्र उभे करावे तशा या इमारती आहेत.

शहराचे मुख्य केन्द्र–अलेक्झांडर प्लेस–त्याच्या एका बाजूला

अगदी जुन्या इमारतींचा भाग आहे. त्या पाडून तेथे पूर्ण नवीन रचना करण्यात येणार आहे. जुने बांधकामाचे नियम काही ठिकाणी पाळण्यात येतील व काही जुन्या इमारती दुरुस्त होऊन नीटनेटक्या स्वरूपात नव्या इमारतींमध्येही उभ्या करण्यात येणार आहेत.

शहराच्या केन्द्राच्या पुनर्रचनेच्या बाबतीत (आणि बाकीच्या भागांबाबतही कमीजास्त फरकाने) नेहमीच एक वादाचा मुद्दा उपस्थित होत असतो. जुने ते सोने म्हणून ठेवायचे का वाढत्या गरजेस अनुसरून, पूर्ण पाडून नवी उभारणी करायची, की दोन्हींचा मेळ साधायचा ? यापैकी एक कोणता तरी दृष्टिकोन स्वीकारून बरेच वेळा निर्णय घेतला जातो. युद्धात बरीच पडझड झाल्यामुळे युरोपातल्या बऱ्याच शहरांना याबाबत निर्णय घेणे पुष्कळ सोपे गेले आहे. पण आपल्याकडच्या शहरांतून हा निर्णय घेणे फार अवघड होते निर्णय घेणे मात्र आवश्यक असते. पुष्कळ वेळा असे मांडण्यात येते की, मागील पिढ्यांनी दिलेला वारसा पूर्ण नष्ट करून तेथे काही नवीन ठेवण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? पुढच्यांसाठीही मागचा वारसा ठेवायला हवा. उलट काही म्हणतात, बदलत्या काळाच्या गरजेप्रमाणे आपण जरूर ते बदल केले नाहीत तर पुढची पिढी आपल्याला दोषच देईल. प्रत्येक शहराने आपआपल्या परिस्थितीप्रमाणे या प्रश्नाला उत्तर द्यायचे आहे. एक गोष्ट खरी की, अगदी जतन करण्यासारखा भाग थोडाच असतो व एकंदर रचना तशीच ठेवून बदलत्या काळासाठी बरेच बदल करणे शक्य असते. पोलिश व जर्मन वास्तुशास्त्रज्ञांनी असेच काहीसे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

त्या दिवशी संध्याकाळी केंद्र भागाची प्रतिकृती पाहून व काही उपनगरे, केंद्र भाग वगैरेतून हिंडून बस आम्हाला बाहेरच्या भागात, जेथे बर्लिन टॉवर आहे तिकडे घेऊन निघाली. उपनगरांचा तोंडवळा मुंबई व आपल्या इतर मोठ्या शहरांच्या उपनगरांशी खूपच जुळता आहे. जुन्या राहत्या घरांचे विभागही बरेच सारखे आहेत, ट्राम, लोकल ही वाहनेही आहेतच.

जुना बर्लिन टॉवर युद्धात पुरा नष्ट झाला आहे व अगदी नवा असा मनोरा व एक हॉटेल तेथे बांधण्यात आले आहे. खूप दूरपर्यंतचे बर्लिन शहर तेथून दिसते. गर्द झाडी, तळे, दूरवरच्या शहराच्या अस्पष्ट रेखा व गिरण्यांचे धूर हे चित्र अंधारामुळे हळूहळू अस्पष्ट होऊ लागले तेव्हा तेथेच जेवण घेऊन मगच शहराकडे परतायचा विचार ठरला.

आम्हाला मुक्कामाला उपनगरातले एक मध्यम प्रतीचे हॉटेल मिळाले होते. बर्लिनमध्ये हॉटेलात जागा मिळणे अत्यंत कठीण असते व आमचा कार्यक्रम खूपच आयत्या वेळी ठरलेला व त्यातच दहापंधरा जणांची एकदम सोय करणे म्हणजे आणखीच कठीण. जेवणे झालेली होती व कोणालाच इतक्यात झोपावेसे वाटत नव्हते, तेव्हा पाचसहा जणांच्या आमच्या एका टोळक्यात पुन्हा अलेक्झांडर प्लेसकडे जायचा ठराव मंजूर झाला आणि सगळेच निघाले.

रात्र होत आली तशी उपनगरे पेंगू लागली होती. तेथे शान्तशान्त होत होते. पण शहराचा मध्यभाग अजून जागाच होता. गजबजलेला होता. लोकल व ट्यूब रेल्वे खडखड करीत जात येत होत्या. मोटारी पळतच होत्या. अनेक जोडपी दुकानांपुढे उभी राहून वस्तूंबद्दल चर्चा करीत होती. दुकाने बंद असली तरी दिवे लखलखत होते व साऱ्या वस्तू काचेमागे आकर्षक तऱ्हेने मांडलेल्या होत्या. एखादे उघडे असलेले रेस्टॉरंट भरलेले असायचे. कुठे जागाच मोकळी नसायची. आम्हीही वस्तू पाहत चर्चा करीत हिंडत होतो.

सहज बोलता बोलता जर्मनीच्या फाळणीबद्दलचा विषय निघाला. हे लोक जर पुन्हा एकत्र आले तर साऱ्या जगाला हादरवून सोडण्याची धमक त्यांच्यात आहे. पण सध्यासारखी राजकीय, वैचारिक, लष्करी व तणातणीची परिस्थिती कशी व किती दिवस राहू शकेल हे

कोणालाच सांगता येत नाही. आमच्याबरोबरचे गृहस्थ बोलत होते अन् आम्ही ऐकत होतो. मात्र, पूर्व व पश्चिम यांच्यातले अंतर वाढत आहे. एकंदर विचारसरणी, आचारविचारांचा पगडा, विकासाचा वेग व दिशा सारेच वेगवेगळ्या मार्गांनी चालू आहे, त्यामुळे पुष्कळांच्या मनात असलेली पुन्हा एकत्र येण्याची सुप्त इच्छा पूर्ण होण्याची नजिकच्या भविष्यकाळात तरी शक्यता दिसत नाही व अधिक दुरावत गेल्यास पुढे काय होईल ते सांगता येत नाही. जर्मनांच्या स्वभावा-बद्दलही बोलणे निघाले. ते स्वतःच जरा आतल्या गाठीचे बनले आहेत. पाहुणे आल्यापेक्षा गेल्याचाच त्यांना आनंद वाटतो असे विनोदाने त्याने सांगितले. असा स्वभाव कदाचित त्यांच्यातली पूर्वीची श्रेष्ठत्वाची व नंतरची पराभवाची या दोन्ही भावनांचा परिपाक असू शकेल.

गप्पांच्या व पाहण्याच्या नादात पायपिटी बरीच झाली होती व बारा वाजायला आले होते. परत जाण्यासाठी लोकल, ट्यूब रेल्वे वगैरे चौकशी करून एका गाडीने जायचे ठरले. तिकिटे काढून वर चढून गेलो. ( जमिनीखालच्या बोगद्याऐवजी शहराच्या मुख्य भागातून ही गाडी उंच पुलावरून जाते. ) पण तिथे कळले ही गाडी थेटची नव्हे—आता गाड्या बदलतच इच्छित स्थळी जावे लागेल. झाले. नकाशे पाहून, नावे पाहून उतरावयाचे स्टेशन कितवे ते पाठ करून ठेवलेले सगळे श्रम वाया गेले. पुन्हा बदलावयाच्या स्टेशनांची नावे पाठ करू लागलो. लोकल गाड्यांच्या प्रवासाची तशी मला अद्याप भीतीच वाटते. मुंबईला इतके वेळा जाऊनसुद्धा. अजून दादरहून चर्नीरोडला जायचे म्हणजे मी आपला स्टेशने मोजतो. शिवाय गेलेल्या प्रत्येक स्टेशनवरची पाटी गर्दीतून मान बाहेर काढून काढून पहावयाचा प्रयत्न करतो. पुन्हा त्या धिमी, तेज, डबल फास्ट वगैरे गाड्यांच्या घोटाळ्यातून आपल्याला योग्य अशा गाडीत बसायचे म्हणजे आणखी एक घोटाळ्याचे कामच. त्या दिवशी बर्लिनमधल्या

त्या अवघड नावाच्या स्टेशनांवर तीन गाड्यांतून बदलाबदली करून विचारत विचारत अखेर एकदाचे आम्ही योग्य त्या स्टेशनवर पोहोचलो. लहानपणी आई म्हणायची, विचारत विचारत माणूस दिल्लीलासुद्धा जाईल. दिल्लीलासुद्धा मी पाचसहा वेळा जाऊन आलो पण त्या म्हणीची प्रचीती आली मात्र बर्लिनला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता आम्ही दोघेतिघे तयार होऊन उपहारगृहात इतरांची वाट पहात बसलो. काही अजून उठावयाचे होते. समूहात असताना सर्वांच्या सोयी पाहण्यापेक्षा आपल्या सोयी व सवयीकडे अधिक लक्ष देणारे काही भेटतात. आपण घरी नसून परदेशात आहोत, थोड्या वेळात जास्तीत जास्त पाहून घ्यायला हवे वगैरे विचार करण्या-ऐवजी आपली झोप, आपला नट्टापट्टा, आपले खाणेपिणे या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटतात. त्यामुळे त्या दिवशीची सुंदर हवेतील एक सकाळ बर्लिनमध्ये केवळ दूर एका उपनगरातल्या हॉटेलात बसून नुसती फुक्कट घालवावी लागली.

सकाळचा एक कार्यक्रम त्यामुळे रद्द झाला व आम्ही दुसऱ्या ठरलेल्या कार्यक्रमाला—चीफ आर्किटेक्टस् ऑफिसला—भेट देण्यासाठी गेलो.

पूर्व बर्लिनच्या नियोजनाच्या आराखड्याची सर्व पार्श्वभूमी त्यांनी समजावून सांगितली. सर्व रचना अद्यापही अशी आहे की, पूर्व व पश्चिम बर्लिन एकत्र आल्यास एक सुसंगत शहर होऊ शकेल. छप्पन्न सालापर्यंत दोन्ही भागातल्या नगर व वास्तुशास्त्रज्ञांनी एकमेकांशी चर्चा करूनच सर्वसाधारण आखणी केली आहे. त्यानंतर मात्र बहुतेक काम स्वतंत्र रीतीने चालू आहे. विशेषतः एकसष्ट साली बर्लिनची भिंत बांधल्यापासून अधिकच. येथल्या चर्चेनंतर ती भिंत पाहायला जाणे ओघाने आलेच होते.

जगातल्या बातमीदारांना वरचेवर खाद्य पुरवणाऱ्या व जागतिक तणातणीच्या जागांपैकी एक असलेल्या अशा त्या स्थळाला भेट देण्यासाठी सगळेच उत्सुक होते.

' ब्राडेनबर्ग गेट ' या एका प्रमुख चौकीवर आम्हाला प्रथम नेण्यात आले. शहराच्या मध्यभागी असलेल्या त्या प्रचंड प्रवेशद्वाराभोवतालची जागा सध्या दोन शहरांमधली निर्मनुष्य अशी जागा आहे. एक कमांडंट तेथपर्यंत तुकडीतुकडीने सगळ्यांना घेऊन गेला. प्रथम एका छोट्य शा खोलीतले एक प्रदर्शन व स्लाईडस् दाखवून राजकीय, आर्थिक व एकंदर जीवनाबाबतच्या ' पूर्व व पश्चिम ' अशा संघर्षाची सगळी माहिती देण्यात आली. उपस्थित झालेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरेही दिली गेली व नंतर त्या भिंतीपाशी नेण्यात आले. रणगाड्यांनाही दाद देणार नाही अशी दणकट भिंत आहे ती. उंची तशी कमीच आहे. पलीकडे पश्चिम बर्लिन. त्या भिंतीमुळे ते एक बेटच तयार झालेले आहे. पलीकडचे पश्चिमेतले हुतात्म्यांचे स्मारक, फ्रेंचांचा विजयस्तंभ व दूरवर काही उंच इमारती दिसत होत्या. ब्रिटिश सैन्याच्या पलीकडल्या चौकीवरून दुर्बिणी व कॅमेरे लावून इकडच्या बाजूला भेट देणाऱ्यांचे निरीक्षण चालले होते. एकजण गमतीने म्हणाला, ' बघा रे बाबा, आता आपल्याला इंग्लंडमध्ये येऊ द्यायचे नाहीत.' आमच्यासारखे त्या बाजूलाही भेट द्यायला आलेले लोक दिसत होते.

भिंतीच्या पाहणीनंतर आजूबाजूच्या भागातूनच फिरत आम्ही कोठल्या हॉटेलमध्ये जेवणासाठी एकदम सगळ्यांना जागा मिळेल काय ते पहात फिरत होतो. वाटेत निरनिराळ्या देशांच्या ' दूतावासाचा ' भाग लागला. ही अमक्या देशाची वकिलात, ही तमक्या, असे मार्गदर्शक सांगत होते. मध्येच एकाने विचारले. ' काय हो; भारतीय दूतावासाची जागा कोठे आहे ? राजकारणाबद्दल कोणताही उहापोह

वा मतप्रदर्शन न करता त्याने मोठे मार्मिक उत्तर दिले. वास्तुशास्त्रज्ञच होतो तो व नुकतीच पुढील कार्यक्रमावर चर्चा झाली होती. हजरजबाबीपणे त्याने पटकन उत्तर दिले, ‘ भारतीय दूतावासाचा समावेश आमच्या पुढील कार्यक्रमात आहे. ’

दुपारच्या जेवणासाठी एका सुंदर हॉटेलात जागा तर मिळाली. भारतीय म्हणून तुम्हाला छानपैकी भाजीपाल्याचे जेवण देतो, असे परिचारक सांगून गेला. तेवढ्यात आणखी एक भारतीय गृहस्थ तेथे भेटले. मद्रासमधल्या कोटल्याशा कारखान्याचे प्रतिनिधी होते ते. बाकीचे कुशल प्रश्न विचारून झाल्यावर जाता जाता म्हणाले, ‘ आम्हा शाका-हारी लोकांची जगाचा दौरा करताना नेहमीच पंचाईत होते.’

दुपारी उरलेले काही भाग पाहून आम्हाला आर्किटेक्टस् असो-सिएनच्या कचेरीकडे नेण्यात येत होते. हे काय ? ते काय ? असे आमचे प्रश्न चालूच होते. एक टेकडीवजा भाग व बाजूला हिरवळ, भोवती तारेचे कुंपण होते. इमारती नव्हत्या म्हणून ही काय बागेसाठी जागा आहे का, असे विचारल्यावर हळूच एकाने सांगितले, ‘ अहो, तिच्याखालीच हिटलरचे स्वत:साठी बांधून घेतलेले हल्लाप्रतिबंधक तळघर होते. ’ त्या जागेवर पाटी नाही. का कोणी नेऊन दाखवतही नाहीत. जगाला पादाक्रान्त करू पाहाणाऱ्या त्या महत्त्वाकांक्षी पुरुषाने तिथेच खाली स्वत:चा अंत करून घेतला.

आर्किटेक्ट्स असोसिएशन म्हणजे आमचे यजमानच त्या दौऱ्याचे. निरोपादाखल त्यांनी छोटासा समारंभ योजला होता. शुभेच्छादर्शन, ओळखी व छोटीछोटी भाषणे झाली. भारतीय असोसिएशनबरोबर संबंध वाढविण्याची उत्कट इच्छा त्यांनी व्यक्त केली व आम्हा सर्वांना निरोप दिला.

परतीचा प्रवास सुरू होण्यापूर्वी थोडा वेळ तेथल्या मोठ्या विविध वस्तुभांडारामध्ये आम्हाला सोडण्यात आले होते. वेळ थोडा होता व पैसेही फारसे शिल्लक नव्हते. त्यामुळे खरेदी करण्याऐवजी भरगच्च वस्तूंनी भरलेल्या त्या दुकानाचे निरीक्षण करीतच आम्ही वेळ घालवला. संध्याकाळी बस येताच पुन्हा पोलंडकडे आमचा भरधाव प्रवास सुरू झाला.

० ० ०

## १०. आया है बसंत !

पूर्व जर्मनीचा दौरा करून आल्यानंतरच्या पंधरा दिवसात म्हणजेच एप्रिलच्या मध्यापासून पोलंडमधले हवामान खूपच बदलले. अजूनही थंडी असली व मधूनच एकदोन दिवस पाऊस पडत असला तरी खराखुरा वसंत ऋतु सुरू झाल्याची निशाणी यच्चयावत वृक्ष-वल्लींनी दिलेली. इतके दिवस बर्फाळ व ढगाळ हवा सहन केल्यानंतर केवळ दोनचार दिवसांच्या अंतराने झाडांनी हिरव्या रंगांच्या अनेक छटांची पालवी धारण केलेली दिसत होती. पहाटे ४–३० ( पहाट कसली चक्क सकाळच ! ) ते रात्री ८। पर्यंत स्वच्छ सूर्यप्रकाश दिसू लागला. आता लोकनृत्ये, गाणे, समारंभ अशा निरनिराळ्या कार्य-क्रमांना उधाण यायला पोषक वातावरण तयार होते. कामगार दिन, शान्तता दिन, छोट्यामोठ्या सहली यांची निमित्ते असतातच.

एक मेचा कामगार दिन म्हणजे सगळयात मोठा सोहळा. दिल्लीला प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने जशी कार्यक्रमांची रेलचेल असते व तीनचार दिवस तयारी, तालमी होत असतात तसेच. झाडून सारे जण या कार्यक्रमात सहभागी होतात. कवायतीच्या, मानवंदनेच्या

स्वीकारासाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, पुढारी दाटीवाटीने मंचावर बसले होते. त्यात आमचे प्राध्यापक झारेंबही होते. सर्व क्षेत्रांतल्या अधिकारी व्यक्तींना हा मान मिळतो आणि मिरवणुकीत सर्व क्षेत्रांतले लोक दाखल झालेले असतात. निरनिराळे कामगार, विद्यार्थी सगळेच अनेक प्रकारची दृश्ये सजवलेली, सोंगे घेतलेली. त्यातल्या काहींना प्रेक्षकांतून हमखास दाद मिळायची. आता युद्ध नको, व्हिटनाममध्ये शान्तता हवी, पोलंड काल होता, आज आहे, उद्या राहील असे अनेक घोषणांचे फलक होते. इतिहासातले, युद्धातले प्रसंग, नृत्ये, खेळ, सगळे होते. लोकही दोन्ही बाजूंना दाटीवाटीने उभे होते. खाद्यपेयांच्या गाड्या होत्या. एकंदर दांडगा उत्साह होता लोकांचा.

थोड्याच दिवसांनी मिच्कीविचा या मुख्य चौकात ( मिच्कीविच या मोठ्या लेखकाचा तेथे मोठा पुतळा आहे. ) युद्धानंतरची २१ वर्षे पार पडल्याचा दिवस असाच नृत्ये, गाणी, खेळ, कवायती सादर करण्यात येऊन साजरा करण्यात आला. आजूबाजूला खेळणी, खाऊ, आईस्क्रीम यांची जत्रेसारखी तात्पुरती दुकाने होती.

सुट्ट्या, प्रवास, सहली यांचाही हा हंगामच. सुरुवातीच्या दिवसांतच आम्ही शिनोडइश्चे या गावाची बोटीने एक सहल केली. पूर्वी हिवाळ्यात पाहिले त्यापेक्षा गाव आता अधिक जिवंत वाटत होते. हवाही चांगली पडू लागली होती. समुद्रावर सुट्टी घालवायला येणाऱ्यांची संख्या बरीच होती. पण थंडी पुरती संपल्याशिवाय समुद्रस्नान व दिवसच्या दिवस सूर्यस्नान मात्र होत नाही.

एकोणीस मेला स्टेचीनमध्ये ‘ शान्ततेची शर्यत ’ या नावाने प्रसिद्ध असलेल्या सायकलच्या शर्यतीचे आगमन झाले. १९४८ सालापासून ही शर्यत दरवर्षी घेण्यात येते. प्राग या झेकोस्लोव्हाकियाच्या राजधानी-तून सुरू होऊन पोलंडमधून ती पूर्व जर्मनीत बर्लिनपर्यंत जाते व तिथे

तिचा शेवट होतो. त्यावर्षी ती ९ मे ला निघाली व २४ मे च्या सुमारास बर्लिनला पोहोचली. या वेळच्या शर्यतीत स्टेचीनपूर्वीच्या मुक्कामापर्यंत रशियन सायकलस्वार पहिला व पोलंडचा दुसरा होता. स्टेचीनपर्यंतच्या टप्प्यात इटलीने पहिला व पोलंडने दुसरा क्रमांक मिळविला. त्या वेळी १७ राष्ट्रांनी भाग घेतला होता. मला एका गृहस्थांनी विचारले तुमच्या देशाने का नाही भाग घेतला ? मला अर्थात उत्तर देणे कठीण होते. पण प्रत्यक्ष स्टेडियमवर एक मजेशीर उत्तर सापडले. भारताने यापूर्वी दोन वेळा भाग घेतला आहे. एका वेळी तर भारतीय सायकलस्वार केवळ देश पहाण्याच्या हेतूनेच आले होते. संपूर्ण शर्यतीच्या ४–५ तास ते मागे असायचे व चर्च, प्रेक्षणीय स्थळे गावे पहात पहात जायचे. यावेळचा, शेवटचा सायकलस्वारांचा तांडा जेव्हा स्टेडिमयवर शिरला तेव्हा एकजण विनोदाने म्हणाला की, शर्यतीचा आजचा टप्पा नक्की संपला आहे. कारण भारतीय सायकलस्वारांनी यंदा भाग घेतलेला नाही. शर्यतीतला शेवटचा स्वार येईपर्यंत सर्व वाहतूक बंद ठेवून बाकीचा सारा जामानिमाही ठेवावा लागतो व सगळे आल्यानंतर त्या टप्प्यातल्या पहिल्या–दुसऱ्याचे सत्कार होतात.

० ० ०

# ११. स्टेचीनचा निरोप

स्टेचीनमधला मुक्काम संपत आला असतानाच एका सायंदैनिकाच्या संपादकांची ओळख झाली. त्यांनी चहा प्यायला म्हणून बोलावले. खूप गप्पा झाल्या. माझे क्षेत्र, पोलंडमधल्या मुक्कामातले अनुभव, पोलिश चालीरीती, हिंदू धर्म, संस्कृती, भाषांची समस्या, खाणे, नमस्काराची पद्धत वगैरेची माहिती त्यांनी विचारली. कॅथॉलिकांच्या बहुशः पुराणमतवादी अशा त्यांच्या धर्माच्या पार्श्वभूमीवर आपल्या धर्मातील नव्यांचा

स्वीकार, सहिष्णुता, विविधतेतील एकात्मता वगैरे गोष्टी त्यांना वेगळ्याच वाटत होत्या. आमच्याकडे सरकारी नोकर कोणत्याही पक्षाचे सभासद नसतात ही गोष्ट त्यांना नवलाईची वाटली, तरी फार आवडली. मीही त्यांना तेथील वृत्तपत्रांबाबत प्रश्न विचारले. स्टेचीनमधली दोन्ही दैनिके सरकारी तत्त्वावर चालतात. त्यात कामगार पक्ष, साम्यवादी पक्ष, यांचे प्रतिनिधी आहेत. ते सर्वसाधारण धोरण ठरवतात. सेन्सॉरशिपचे नियंत्रण हळूहळू कमी होत आहे, वगैरे माहिती सांगण्यात आली. दुसऱ्या दिवशी आमची चर्चा, मुलाखतीच्या रूपाने छायाचित्रासह छापून आली, तेव्हा मात्र एकदम आश्चर्याचा गोड धक्का बसला.

एक जूनला आम्हाला अभ्यासक्रमाची शिफारसपत्रे समारंभाने देण्यात येऊन स्टेचीनमधल्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तो सगळा आठवडा अगदीच गडबडीचा गेला. स्टेचीनमधला मुक्काम संपवून आम्ही पोलंडच्या १७ दिवसांच्या सफरीला निघणार होतो. तेव्हा येथल्या सगळ्यांचा निरोप, सामानाची पुन्हा बांधाबांध. हे सगळे उरकायचे होते. साडेतीन महिन्यांच्या मुक्कामातही येथल्या वातावरणाने खूप आपलेसे केले होते. पुन्हा हे लोक, हा गाव, हा देश आयुष्यात पाहायला–भेटायला मिळेल असे सांगता येत नाही. भाषेची अडचण असूनही केवळ लोकांच्या आपुलकीच्या साहाय्याने मुक्काम चांगला पार पडला होता. या भावनेबरोबरच पुन्हा आपल्या माणसात, आपल्या देशात जायचे आहे याचा आनंद, उत्सुकताही वाटू लागली होती. सगळ्यांचे निरोप घेता घेता बांधाबांध राहून गेली होती व शेवटची रात्र सबंध बांधाबांधीतच गेली.

० ० ०

# १२. पोलंडची धावती सफर

सकाळी ९ वाजता निघणाऱ्या बससाठी घाईघाईने बरोबर वेळेवर तयार झालो आणि बसने स्टेशन सोडले.

दुपारी एक वाजता कोशालिन या छोट्याशा गावी रेल्वे–स्थानकावर सुंदर जेवण मिळाले. स्वुप्स्क या गावी चार वाजता चहा झाला. विशेषसा कोठे वेळ न घालवता आम्हाला पहिल्या मुक्कामाला ग्डांस्क गावी पोहोचायचे होते. पोहोचेपर्यंत ७–३० वाजले. अर्थातच पहिले काम म्हणजे हॉटेलात खोली शोधून थोडा आराम व नंतर जेवण. त्यानंतर चार-पाच जणांचे टोळके करून जेवल्यानंतर गावाच्या मुख्य भागात भटकायला बाहेर पडलो. पादचाऱ्यांची व वाहनांची तुरळक रहदारी चालू होती.

सोळाव्या शतकातल्या काही इमारती केंद्र भागात पुन्हा तशाच बांधून काढल्या आहेत. पिवना हा सबंध रस्ता त्या वेळच्या इमारतींची शैली, घाट, डौल तशीच्या तशी व्यक्त करतो. तेथे वरुण राजाचा पुतळा असलेले एक सुंदर कारंजे आहे. रात्री, दिवसा, निरनिराळ्या कोनातून ते पाहण्यासाठी प्रवासी तेथे येत असतात. पलीकडे लहानसा चौक व त्यापलीकडे नदीवरचे छोट्या नावांचे बंदर. बरीच वाहतूक चालते नदीतून.

दुसऱ्या दिवशी सकाळी ग्डान्स्कच्या रिजनल प्लॅनिंग ऑफिसला भेट होती. ग्डान्स्क, ग्दिनिया व सोपोत या तीन गावांच्या संपूर्ण प्रदेशाच्या आखणीसाठी एकसूत्रित योजना येथे आखली जात आहे. बाल्टिक समुद्राकाठची ही तीन गावे पोलंडच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. डांझिग हे युद्धकाळातले महत्त्वाचे बंदर येथेच होते. युद्धानंतर पुनर्बांधणी करून या तिन्ही गावांचा विकास करण्यासाठी बराच मोठा प्रयत्न करण्यात येत आहे. बंदर, कारखाने, कचेऱ्या या

सगळ्यांचे हे महत्त्वाचे केन्द्र आहे. नदीतून देशाच्या मध्यभागापर्यंत नाविक वहातूकही चालते. ग्डान्स्क हे नैसर्गिक बंदर असले तरी गाळ व इतर प्रश्नामुळे ते जास्त वाढवता येत नाही. ग्दिनिया त्या मानाने खूप मोठे बंदर आहे. भारतातूनही येथे नियमित जहाजे येतात. जहाज दुरुस्तीही चालते व बांधणीही. ग्दिनियाच्या बंदराच्या भागातून फिरायला खूप मजा वाटते. तेथे छोटीशी बागही आहे. संपूर्ण बंदराचे दृश्य अलीकडच्या एका टेकडीवरून पाहाता येते. तो देखावा खरो-खरच रम्य आहे. सोपोत हे त्या मानाने छोटेसे गाव. ते दोन्हींच्या मध्येच आहे व मुख्यत: विश्रान्तीस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. येथला वालुकामय किनारा, समुद्रात आतपर्यंत जाणारी एक जेटी हे दृश्य–सुट्टी मजेत घालवू पाहणाऱ्यांना मोठे आकर्षणच आहे.

एकंदर ग्डान्स्क–सोपोत–ग्दिनिया व बाजूचा ७५ किलोमिटर लांबीचा एका बाजूला टेकड्यांची रांग व दुसऱ्या बाजूला समुद्र असा हा चिंचोळा पट्टा असला तरी लोकसंख्येच्या दृष्टीने अगदी गजबजलेला आहे. गावांची बांधणीही छान आहे. आमचा अभ्यासक्रम येथेच हवा होता असे वाटले, पण कोणीसे म्हणाले, हिवाळ्यात स्टेचीनपेक्षा येथली हवा खराब असते. या प्रदेशाच्या आखणीबाबत बरेच संशोधन येथे करण्यात आले असून बऱ्याच योजना मांडण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात मुंबईमध्ये जसे कारखाने व इतर कामधंद्यांचे केंद्री-करण झाले आहे तसे पोलंडच्या या भागात झाले आहे. प्रश्न अनेक आहेत. उत्तरे शोधली जात आहेत. तांत्रिक विद्यापीठ, नियोजन कार्यालय व दुपारच्या निरनिराळ्या विभागांच्या सहलींमुळे बऱ्याच गोष्टी पाहायला मिळाल्या.

चार तारखेला नियोजन कार्यालयाच्या भेटीनंतर वेस्टर प्लाट ही जागा दाखवण्यात आली. पोलिश भूमीवर युद्धाची पहिली ठिणगी

येथेच पडली. मार्गदर्शकांना युद्धाच्या आठवणी व तेथील स्मारके यांमुळे गहिवरून येत होते. शान्ततेचे महत्त्व अशा ठिकाणांमुळे पटकन पटवता येते खरे !

१३ ते १५ व्या शतकांत बांधलेले एक प्रचंड चर्च दुपारी पाहिले. तेथील ऑर्गनही अतिशय प्रसिद्ध आहे. त्यानंतर ग्डान्स्ककडे परतताना विद्यार्थ्यांच्या खूप मिरवणुका दिसल्या. तो विद्यार्थीदिन होता. चित्र-विचित्र सोंगे घेतलेले विद्यार्थी नाचत, गात चालले होते. परीक्षा खरे तर अजून व्हायच्या होत्या. पण एकदा ही ' टॉम फूलरी ' म्हणजे सुधारित धुळवड पार पडल्यानंतर अभ्यासाला लागायला त्यांना हुरूप येत असावा. सगळ्या मिरवणुका एका मुख्य चौकात जमत होत्या. तेथे गाणी वगैरे चालू होती. आमच्यातल्या सरदारजींना एकदम स्फूर्ती आली व मंचावर जाऊन ' मी या मिरवणुकीने फार प्रभावित झालो आहे. ' वगैरे एक ' भाषण ' त्यांनी तिथल्या तिथे ठोकले.

पाच तारखेला सकाळी ते सुंदर गाव सोडून आम्ही मालबार्क कॅसल या सुप्रसिद्ध किल्ल्याला भेट देण्यासाठी निघालो. या ठिकाणी मध्ययुगात टयुटॉनिक सरदारांनी बांधलेला युरोपातला सर्वांत मोठा किल्ला आहे. झरोता दरवाजा, प्रमुख सरदारांचा महाल व म्यूझियम प्रेक्षणीय आहेत.

दुपारचे जेवण तोरून या गावी घेतले. तोरून गावात मध्ययुगातील बऱ्याच इमारती आहेत. नदीवरचे बंदर व उद्योगधंद्यांचे केंद्र आहे. टाऊन हॉलसमोर १८५३ साली बांधलेला कोपर्निकस या प्रख्यात खगोलशास्त्रज्ञाचा सुंदर पुतळा आहे. येथील उंच मनोऱ्यावरून गावाचे दर्शन घेतले व आम्ही व्रोस्वा या गावाच्या दिशेने कूच केले. वाटेत ग्नेझ्नो या गावी चहाचा छोटा मुक्काम केला. या गावातही एक सुंदर चर्च

आहे. याच ठिकाणी पोलंडच्या पहिल्या राजाने ख्रिस्ती धर्माची दिक्षा घेतली होती.

ग्नेऊनंतर प्रवास करीत आम्ही व्रोस्वा येथे रात्री साडे दहा वाजता पोहोचलो. कोटल्या हॉटेलात जेवण मिळेल याचा शोध करीत बस फिरवावी लागली. एका ठिकाणी ‘शक्य आहे’ म्हणून सांगण्यात आले. नृत्यगायनाचा कार्यक्रम चालू होता, तिकडे लक्ष द्यायचे सोडून आम्हा थकलेल्या व भुकेल्या मंडळींना जेवण आणून देण्याची सेवा करायला नोकर नाखूष होता. अगदी सावकाश एक एक पदार्थ आणून देऊन एका आडबाजूच्या हॉलमध्ये त्या लोकांनी मध्यरात्रीपर्यंत जेवण लांबवले आमचे.

दुसऱ्या दिवशी सकाळी पहिला कार्यक्रम प्रादेशिक व नगरनियोजन कचेरीला भेट असा होता. तेथील चर्चेनंतर शहरातले काही निवास-विभाग, नवा औद्योगिक विभाग, प्रचंड स्टेडियम, एक प्रचंड उद्यान व जवळचा चित्रपट–निर्मिती विभाग पाहिला. तेथे ८००० माणसे एका वेळी बसू शकतील एवढे प्रचंड चित्रपटगृह आहे. वाटेत घुमटाच्या आकाराचे एक घरही पाहिले. याशिवाय शहराचा जुन्यात जुना विभाग तेथील सम्मीलीत अशा जुन्या (परंतु नव्याने पुन्हा बांधून काढलेल्या) इमारतीच्या रचनेमुळे फार सुंदर वाटला. दुपारच्या जेवणानंतर शहराचा गजबजलेला केंद्रभाग, रेल्वे स्थानक; एक मोठे डिपार्टमेंटल स्टोअर यातुन फेरफटका मारला.

दुसऱ्या दिवशी सकाळी व्रोस्वा सोडून सिलेशिया या आग्नेय पोलंड-मधल्या, कारखानदारी व लोकसंख्या या दोन्ही दृष्टीने अत्यंत दाटी-वाटीने विकासित झालेल्या विभागाकडे रवाना झालो. वाटेत ओंपोले या छोट्याशा गावातल्या अगदी एक आकर्षक रचनेच्या नगरचौकात काही वेळ थांबलो. येथेही सर्व जुन्या इमारतींनी एकमेकींशी रेखीव प्रमाण

साधल्यामुळे त्या चौकाची रचना मनात ठसणारी वाटली. दुपारचे जेवण सिलेशिया भागातल्या काटोविचे या महत्त्वाच्या गावी ठरलेले होते. या गावाचा विकास इतका झपाट्याने झाला आहे आणि गाड्यांची गर्दी तर इतकी आहे की, बस थांबवायला कोणत्याही रस्त्यावर जागा मिळेना. दोनतीन चकरा मारल्या. नंतर शेवटी स्टेशन-जवळ आम्हाला सोडून बस दूर उभी करून ठेवण्यासाठी न्यावी लागली. जेवणानंतर, भरपूर धूर सोडणाऱ्या औद्योगिक विभागातून व नंतर आकर्षक अशा निवास विभागातून फेरफटका झाला व संध्याकाळ एका अत्यंत रम्य व प्रचंड अशा उपवनात काढली. कारखानदारीने गजबज-लेल्या व दाट लोकवस्तीच्या भागासाठी येथे अतिविस्तृत व आकर्षक असे उपवन आहे. त्यात तळे, टेकड्या व एक प्लॅनेटोरियम आहे. लोकल व बसेस यामुळे अगदी लवकर शहरात पोहोचता येते. एक प्रचंड असे स्टेडियमही पहायला मिळाले. रात्रीच्या जेवणानंतर दुकानांनी सजलेल्या मध्यभागातून फिरलो. कारखानदारीचे गाव असल्यामुळेच मध्यरात्री-पर्यंत हा भाग शान्त नसतोच, उलट दिवसापेक्षा जास्त रहदारी, फिरणारे लोक, रंगीबेरंगी दिव्यांचा झगझगाट व वस्तूंनी भरलेल्या दुकानांच्या शोकेसेस यामुळे त्यात एक वेगळाच जिवंतपणा वाटतो. दुकानांपुढे उभे राहून वस्तूंची कल्पनेतच खरेदी करणारी कितीतरी जोडपीही हिंडत असतात.

आठ जूनच्या सकाळी तिथल्याच ' मियास्तोप्रोयेक्त ' या घरबांधणी विभागाच्या कार्यालयात नव्या शहरांच्या बांधणीवर आणि पूर्वरचित सामानाच्या प्रचंड इमारतींच्या बांधकामाच्या माहितीवर दोन सुंदर लघुपट दाखविण्यात आले. मॉडेल्स पाहून व चर्चा वगैरे करून नोवेतिची या प्रख्यात नव्या नगराकडे निघालो. अतिशय आकर्षक असे हे नवे शहर आहे. येथेही फार छान प्रदर्शन, काही नवनव्या कल्पनांनी बांधलेले चर्च व इतर इमारती, गावाचे दोन तुकडे पडू नयेत म्हणून

चर खणून खाली घेण्यात आलेले लोहमार्ग अशा बऱ्याच गोष्टी पाहिल्या.

दुपारी 'ओश्विएश्चिन' या, युद्धकाळात जर्मनांनी उभारलेल्या कॉन्सन्ट्रेशन कॅम्पची जागा पाहिली. या ठिकाणी कोंडून ठेवलेल्या लोकांच्या अतीव हालांची क्रूर कहाणी सांगणारा लघुपट, कपडे, केस, बूट, हाडे यांचे ढीग, गॅस चेंबर्सचे नमुने वगैरेचे एक प्रदर्शनच करून ठेवण्यात आले आहे. डोळे एकीकडे भरून येतात तर क्रूरतेविरुद्ध संतापही येत राहतो. तेथील ते भीषण, करुण वातावरण पाहवत नाही, सहन होत नाही. अतिशय अस्वस्थ मनःस्थितीतच माणूस बाहेर पडतो तिथून.

सायंकाळी क्रॅको या पोलिश इतिहास, संस्कृती, कला या सगळ्यांचे केन्द्र व एके काळची राजधानी असलेल्या प्रसिद्ध शहरी पोहोचलो.

एकाची निवड प्रतिवर्षाची सुटी घालवण्याकरिता करण्यात येते. पोलंड देशाने या दोन्ही आकर्षणामुळे पर्यटनक्षेत्रात खूपच आघाडी मिळवलेली आहे. टूरिझम प्लॅनिंग हे एक क्षेत्रच त्यांनी बनवलेले आहे. पोलंडमधला प्रत्येकजण तात्रा पर्वताविषयी विशेष आपुलकी बाळगतो. थंडीच्या बर्फाळ दिवसात बर्फावरून घसरण्यासाठी वा उन्हाळ्यातही तेथल्या खास वनश्रीने नटलेल्या विभागात राहण्यासाठी विविध सोयी आहेत.

पर्वताकडे जाणारा रस्ताही नदीच्या कडेकडेने, जंगलातून, टेकड्यांतून जातो. मला रुरकी ते हरिद्वारमधल्या प्रवासाची आठवण झाली. अर्थात येथल्या निसर्गाला हिमालयाच्या पायथ्यामुळे व जंगलांमुळे येणारा भव्यपणा नसला तरी तात्रा पर्वताच्या रांगांचे निळसर रंग व न. चिं. केळकरांनी उपमा दिलेल्या मसाले भातावरील खोबऱ्याप्रमाणे टाकलेले पांढरेशुभ्र बर्फ आणि तुपाच्या ओघळाप्रमाणे वाहणारे बर्फाचे ओघळ, अधूनमधून काळसर हिरवी जंगले; कुठे तरी व बाजूला थोडेफार विरघळू लागलेले बर्फ; थंड पण सुखद वारा; निसर्गाच्या सान्निध्यात येणारा एक मनमोकळा विशिष्ट गंध; आणि पर्वताच्या परिसरात सहलीला निघाल्याच्या भावनेमुळे चढणारी एक स्वप्नमय धुंदी या साऱ्यामुळे अशी सहल नेहमीच संस्मरणीय बनते.

झाकोपाने हे टुमदार गाव, तेथले ते रेखीव वळणा वळणाचे चढउताराचे रस्ते, छोटी छोटी घरे, छोटी सुंदर हॉटेल्स, पर्वतराजी-तल्या लोकांचा तो विशिष्ट पोषाख या सर्वांचे एक चित्र मनावर कोरून ठेवले गेले आहे. झाकोपाने गावात त्या दिवशी कसला तरी धार्मिक उत्सवही चालू होता. तेथील फेरफटक्यानंतर मोर्स्कीओको पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या तळ्याकडे आमची बस निघाली. पर्वराजींमधून झेकोस्लोव्हाकिया व पोलंडची हद्दही जाते. अशा एका ठिकाणी तिकडूनही सहलीसाठी पोलंडमध्ये येणारी एक बस भेटली. मोर्स्कीओको येथील झऱ्याचे पाणी तिथल्या थंडीच्या मानाने

बरेच गरम असते. तेथील प्रादेशिक वास्तुशिल्पाचा नमुना म्हणून दाखवण्यात येत असलेले एक लाकडी चर्चही तेथे आहे. तेथून झाकोपाने येथे परत येऊन जेवण घेतले व दुपारी गुबावुस्का या गावी गेलो. तेथे ट्रॉलीने जवळजवळ १००० फूट वर जाऊन संपूर्ण तात्रा पर्वतराजीचे व दऱ्यांचे दृश्य पाहायला मिळते. खालची छोटी छोटी गावे व तेथील सर्व वातावरण यांमुळे शिवरामपंत परांजप्यांनी वर्णन केलेल्या पर्वतावर उदात्ततेकडे घेऊन जाणाऱ्या कल्पनाशक्तीचा तात्काळ प्रत्यय येतो. निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन प्रतिवर्षी आपल्या शरीराला व मनाला केवळ विश्रान्तीच नव्हे तर उदात्त, भव्य दृश्यांचे दर्शन घडून उदात्त भावना वाढविण्यास मदत करणाऱ्या अशा या सहलींचे सारेच युरोपातले लोक मोठे भोक्ते आहेत.

रात्री क्रॅकोला परत आलो. दुसऱ्या दिवशी क्रॅको येथील तांत्रिक विद्यापीठात प्रा. झोरेक यांनी पारंपारिक संगीताच्या पार्श्वभूमीवर त्या प्रदेशाच्या नियोजनाबबतचे प्रश्न व आराखडे दाखवणाऱ्या उत्तम स्लाईडस दाखवल्या. इतर ठिकाणी आतापर्यंत व्याख्याने व चर्चा केल्या होत्या. येथील पद्धत नाविन्यपूर्ण व आकर्षक वाटली.

दुपारी मध्ययुगीन राजांचा सुप्रसिद्ध वॉवेल कॅसल पाहिला. १६ ते १८ व्या शतकापर्यंतचे राजे येथून राज्य करीत होते. तेथील सुंदर व भव्य दालनांचा राजवाडा, त्यातील उत्तमोत्तम पडदे, गालिचे, खास शाही फर्निचर, दागदागिने, शस्त्रास्त्रे, तंबू या सर्वांचे जतन करून ठेवण्यात आले आहे. पोलंडची राजधानी आता वॉर्सा असली तरी ऐतिहासिक, सांस्कृतिक व कला-विज्ञानाच्या दृष्टीने क्रॅको हीच खरी राजधानी आहे. युद्धकाळानंतर पुन्हा राजधानी येथे आणावी असा आग्रह धरण्यात आला होता, पण वॉर्साचीच बांधणी करून आम्ही पराजित होत नाही असे दाखवायचे हा विचार प्रबल

ठरल्यामुळे ती वॉर्सातच राहिली. औद्योगिकरणाने शहराभोवतालचे चित्र पालटत असेल, आकाशात धुराडी धूर सोडत असली व प्रत्यक्ष राज्यकर्ते दूर वॉर्सात रहात असले तरी हा राजवाडा, हा किल्ला, तेथले प्रदर्शन शहराच्या मध्यभागातल्या भव्य इमारती, मोटारींना प्रवेश न देणारे छोटे गल्लीबोळ व त्यांच्या बाजूच्या इमारतींची सुसंगत बांधणी यामुळे क्रॅकोने आपली संस्कृती व परंपरा शहराच्या मध्यभागात आपल्या हृदयाशी घट्ट धरून जपून ठेवली आहे. मार्गदर्शकही त्याच्या इतिहासाशी तन्मय होऊन वर्णन करीत असतात. युद्धानेही हा वारसा नष्ट केला नाही हे सुदैवच!

दुपारी नोवा हुटा या जवळच्याच नव्या कारखान्यासाठी वसवलेल्या गावाला भेट दिली. क्रॅकोतल्या ऐतिहासिक विशिष्ट वास्तुशिल्पाच्या पार्श्वभूमीवर येथले आधुनिक वास्तुशिल्प एकदम वेगळे भासते, तरीही मनावर ठसते. क्रॅकोला परत येऊन संध्याकाळी नदीकाठच्या शान्त वातावरणात काही वेळ घालवला व जेवणानंतर पुन्हा एक फेरी शहरातून मारली.

अकरा जूनची शनिवारची सकाळ अशीच काही लोक इकडे तिकडे फिरत राहिल्याने फुकट गेली. निघायला उशीर झाला व दुपारच्या जेवणाच्या वेळी पोहोचायच्या गावी वेळेवर जाणार नाही म्हणून वाटेतच क्लचबोर्क या गावी जेवण घेण्याचे ठरले. जेवण यथातथाच होते, पण गावाचा मध्यभाग मात्र फार सुंदर वाटला. चारही बाजूंनी रस्ते व बाजूची जुन्या धर्तीची बांधणी आणि त्यातली दुकाने, मध्यभागी स्थानिक शासनसंस्थेची इमारत व समोरची छोटी बाग असे छोट्या गावातले ते शान्त वातावरण मला खूप आवडले.

पोझनानला पोहोचलो तेव्हा अंधार पडला होता. पण आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनाचे दुसऱ्या दिवशी उद्घाटन होते. त्यामुळे

त्या भोवतालचा भाग तर गजबजलेला होताच पण सगळ्या शहरभर सर्व देशांचे झेंडे, औद्योगिक प्रदर्शनाच्या जाहिराती व जाणाऱ्या-येणाऱ्यांची वर्दळ यामुळे गावात अद्यापही जिवंतपणा वाटत होता. एरवी या वेळी गाव शान्त असायचे. आमचा पहिला कार्यक्रम अर्थातच जेवण. नंतर राहण्याचे होस्टेल शोधून काढणे व नंतर औद्योगिक प्रदर्शनाभोवतालच्या विभागातून एक फेरी. आम्हाला रहायला विद्यार्थ्यांचे होस्टेल देण्यात आले होते. कारण हॉटेल्स सगळी तुडुंब भरून गेली होती. होस्टेलचा भाग पाहिल्यावर मला अहमदाबादच्या पटेल इंजिनिअरिंग कॉलेजच्या भागाची आठवण झाली. अगदी तसाच दिसत होता हा भाग. मुख्य शहरापासून दूर.

बारा जूनचा सकाळचा मुख्य कार्यक्रम म्हणजे प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाला हजर राहणे. खास निमंत्रणपत्रिका आम्हाला मिळाल्या होत्या. गर्दी तर चिकार होती. वार्ताहरांच्या मोटारी व कॅमेरे सज्ज होते. अशाच एका उंच मोटारीवर मी प्रवेश मिळविला. तेथून फीत कापण्याच्या समारंभाचे छायाचित्र घेता येण्यासारखे होते, व साऱ्या जत्रेचे दृश्य पहाता येत होते. पंतप्रधानांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाल्यानंतर जत्रेत आम्ही मनसोक्त हिंडलो. आपआपल्या औद्योगिक प्रगतीचे दर्शन घडविण्याची चढाओढ तेथे लागली. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, कॅनडा, पूर्व व पश्चिम जर्मनी यांची मोठमोठी दालने होती. कॅनडाचा स्टॉल खूप रंगीबेरंगी होता, तर इस्राएलनेही छोटासा पण सुरेख स्टॉल मांडला होता. भारताचे नाव यादीत होते व झेंडाही होता. कोणी भारतीय भेटतील म्हणून तो स्टॉल आम्ही शोधून काढण्याचा खूप प्रयत्न केला. अखेर एकदाचा सापडला, पण तेथे फक्त फलकाशिवाय काहीच नव्हते.

दुपारी शहरातल्या रस्त्यातून व एकातून दुसऱ्यात उलगडत जाणाऱ्या जुन्या चौकांमधून पायीच भटकत भटकत नदीकाठी पोहोचलो

नदीच्या काठी फिरण्यासाठी बऱ्याच सोयी करण्यात येत आहेत. नदीकडेचा गावाचा एक जुना भाग पाहिला. तेथील पडीक इमारती नूतनीकरणाची वाट पहात आहेत. त्या दिवशी सुट्टी असल्याने दुकाने सगळीच बंद होती. गावातून हिंडून आम्ही होस्टेलवर परतलो.

तेरा जूनला सकाळी पोझनान सोडले. वॉर्साकडे निघालो. पोलंडच्या सहलीतल्या प्रवासाचा तो शेवटचा टप्पा होता. त्या प्रशस्त रस्त्यावरून बस किंवा मोटारीच धावताना दिसत होत्या. ट्रक्स नाहीच. बहुतेक मालवाहतूक रेल्वे वा नदीतून चालते. वॉर्साच्या दर्शनाची, तशीच प्रत्येकाला आपल्या पुढच्या परतीच्या कार्यक्रमांची निश्चिती करण्याची उत्सुकता होती. वाटेत एका ठिकाणी जेवण, एका ठिकाणी चहा, असे छोटे मुक्काम करीत आम्ही साडेपाच वाजता झला-झोवा-वोला या ठिकाणी पोहोचलो. वॉर्साच्या अलीकडे फक्त नऊ किलोमीटर अंतरावर अठराव्या शतकातल्या फ्रेडरिक शोविन या सुविख्यात पियानोवादक व संगीतकाराचे घर त्याचे स्मारक म्हणून जतन करून ठेवण्यात आले आहे. त्याच्याभोवती अगदी नमुनेदार उद्यान करण्यात आले आहे. छोटेसे संग्रहालयही आहे. नामवंत पिआनोवादक तेथे सुट्ट्यांच्या दिवशी कार्यक्रम करतात. बाहेर रस्त्यावरच्या हॉटेलची चालिका येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व प्रवाशांकडून नाणी, स्वाक्षऱ्या जमा करीत असते. ते स्मारक व उद्यान येथे बराच वेळ घालवून आम्ही उशीराच निघालो. वॉर्सात पोहोचायला साडेनऊ वाजले. उशीर झाला असला तरी जेवणानंतर जवळपासच्या भागातून एक फेरी मारलीच.

० ० ०

# १३. वॉर्सा

“ हे माझ्या यौवनकाळच्या राजनगरी
ज्यावर एकहि रक्ताचा थेंब
किंवा अश्रुबिंदु सांडला नसेल
असा एकतरी दगड
तुझ्या पथांतून कधी सापडेल का ? ”

सिप्रियन कामिल नॉर्विद

हीच ती वॉर्सा नगरी असेल का की तिच्याबद्दल कवीने वरील उद्गार काढले आहेत. जी केवळ १५–२० वर्षांपूर्वी उध्वस्त, भुईसपाट, मृत्युवत होऊन पडली होती, असा संभ्रम निर्माण होण्याइतके वॉर्सा नगरीचे स्वरूप पालटले आहे, पालटत आहे. आज तिच्यावर तारुण्याने मुसमुसलेल्या नव्या नवतीचा साज दिसत आहे. तो पाहिल्यावर जुन्या रहिवाशांनाही तिला ओळखणे कठीण जाते. ( अर्थात् अद्याप काही पडीक भाग नव्याने बांधले जाण्याची वाट पहात उभे आहेत ते पाहण्यापूर्वीच ) अशा वॉर्सा नगरीचे दर्शन घ्यायला सगळेच उत्सुक होते.

वॉर्साचा ( पोलिश लोक वर्शावा म्हणतात ) फेरफटका करणे, या तशा नव्याच राजधानीच्या शहराचा परिचय करून घेणे ( १५ व्या शतकानंतरचाच इतिहास या शहराला आहे. तेव्हा तसे फारसे जुने नाही ते ) या गोष्टी करण्यापूर्वी सगळ्यांना आपल्या पुढच्या प्रवासाची निश्चिती करायची होती. ते एकदा झाले म्हणजे वॉर्सात मोकळेपणाने फिरायला बरे. त्या दृष्टीने मुक्कामातल्या पहिल्याच दिवसाच्या सकाळी काही अधिकृत कार्यक्रम नव्हता, हे सर्वांच्या पथ्यावरच होते. आपआपल्या देशाच्या दूतावासांना भेटी द्यायच्या होत्या. माझेही

तिकीट हातात पडायचे होते. मध्येच रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे तिकीट मिळण्यात आणखी थोड्या अडचणी आल्या होत्या. दूतावास, एअर इंडिया यांच्या कचेऱ्यांना भेटी देऊन आलो. अर्थात् सर्व गोष्टी सुरळीत होऊन प्रत्यक्ष निघण्याच्या आदल्या दिवशी तिकीट मिळेपर्यन्त, ठरलेल्या कार्यक्रमातून वेळ काढून अनेक गाठीभेटी व फेऱ्या माराव्या लागल्याच. ' शिक्षण-मंत्री श्री. छगला आलेले आहेत व ते सर्वांना भेटू इच्छितात ' हा निरोप मात्र ते निघून गेल्यावर मिळाला. असो ! असे चालायचेच, अशी समजूत करून घ्यावी लागली.

१४ तारखेलाच दुपारी वॉर्साच्या जुन्या भागाला भेट दिली. ऐतिहासिक महत्त्वाचा हा भाग पूर्णपणे जसाच्या तसा बांधून काढण्यात आला आहे. मादाम मेरी क्यूरीचे घरही तेथे पहायला मिळाले. जुन्या गावाखालून बोगदा काढून दोन्ही बाजूंना जा–ये करणाऱ्या वाहतुकीची सोय करण्यात आली आहे. नंतर पंतप्रधान, इतर पुढाऱ्यांची व अधिकाऱ्यांची निवासस्थाने व एक मोठे उद्यान असलेल्या भागातही हिंडायला मिळाले. त्या उद्यानातच चिनी व अमेरिकन राजदूतांचे एकमेकांना भेटण्याचे स्थान असलेली इमारत आहे. राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानाभोवतालचा भाग पाहून नव्या दिल्लीतल्या काही भागांची आठवण झाली.

दुसरा दिवस वॉर्सातल्या भूविज्ञान संस्थेला भेट, इतर मोठमोठ्या इमारतींची पाहणी. सुंदर म्हणून प्रसिद्ध असलेले निवास विभाग, नव्या रचनेचा औद्योगिक विभाग, पूर्वी ज्यू लोक रहात असलेल्या घेटोची पुनर्बांधणी केलेला भाग व इतर कित्येक भागातून हिंडण्याच्या गडबडीत गेला. वॉर्साचे जुने व नवे छाप पाडणारे वास्तुशिल्प पहायला मिळाले. रशियाने भेट म्हणून बांधून दिलेली ४५ मजली इमारत की ज्यात पोलिश अकादमी ऑफ सायन्स ॲण्ड कल्चरची कचेरी

आहे, तिलाही भेट दिली. त्या प्रचंड इमारतीबद्दल पोलिश लोकांच्या मनात परस्परविरोधी भावना आहेत. तिच्याभोवती प्रचंड मोकळा भाग ठेवण्यात आला आहे. त्या इमारतीची भव्यता मनात ठसण्यासाठी. पण कोणीसे म्हणून गेले, "छे छे! ती तर आमच्या शहराच्या केंद्रभागासाठी राखीव जागा आहे!"

सोळा व सतरा जूनला आम्ही सहकारी संस्थांच्या मध्यवर्ती संघटनेचे पाहुणे होतो. पहिल्या दिवशी फलेनिचा या उपनगरातल्या एका गृहबांधणी विभागाची पाहणी व तेथेच जेवणाचा कार्यक्रम होता. घरांची बांधणी व रचना आकर्षक होतीच, पण दुकाने, शाळा व इतर सर्व सोयींनी परिपूर्ण होती. शाळेतले वातावरण तर फारच छान वाटले. संध्याकाळी वॉर्साचा विनाश व पुनर्बांधणी यांच्यावरचे फारच सुंदर लघुपट पहायला मिळाले. वॉर्सा संपूर्ण नष्ट करण्याचा चंग हिटलरने बांधलेला होता. एक इमारत उभी असता कामा नये असे आदेश होते. त्या उद्ध्वस्त भागांचे व नंतर बांधून काढलेल्या भागांचे दर्शन मन हेलावणारे होते. या लोकांना म्हणून तर फिनिक्सचे वारस म्हणायचे.

रात्री वॉर्सातल्या 'ग्रॅन्ड थिएटर' मध्ये 'हाल्का ऑपेरा' पाहाण्याची संधी म्हणजे सुवर्णसंधीच होती. हे प्रचंड ऑपेरा हाऊस म्हणजे युरोपातले संगीत, नृत्य, नाट्य कार्यक्रमाचे मोठे केन्द्र आहे. याचे वास्तुशिल्प इतिहासकाळापासून प्रसिद्ध आहे. युद्धानंतर ते पुन्हा बांधून काढले असून 'ग्रॅण्ड' विशेषणास खरोखरच पात्र आहे. आतील सर्व व्यवस्था, थाट, प्रकाशव्यवस्था खरोखरच पहाण्यासारखी आहे. तेथे पर्वतराजीत घडलेल्या, राजपुत्राच्या एका प्रेमकथेवर आधारित नृत्यनाट्य पहायला मिळाले.

सतरा तारखेला सहकारी संस्थांच्या निवास विभागांना भेटी होत्या.

जॉलीबुश या सुप्रसिद्ध विभागातील घरे अतिशय आकर्षक होती. घराभोवती चांगल्या चांगल्या वृक्षवेली लावलेल्या होत्या. मार्गदर्शक म्हणून आमच्याबरोबर आलेल्या सुप्रिम को-ऑपरेटिव्ह कौन्सिलच्या सभासदाने सरकारी घरबांधणी दोन्ही दाखवून दोन्हीतला नेमका हाच फरक स्पष्ट केला. सरकारी घरांचा विभाग म्हणजे नुसती साधीसुधी घरे उभी होती. सरकारी क्षेत्रातल्या विभागात घरांच्या बाह्य रूपाकडे, दुरुस्तीकडे, झाडे लावणे व इतर सोयी सर्वांकडे नीट लक्ष दिलेले दिसले. शिवाय त्यांनी एक खऱ्याखुऱ्या अर्थाने चालवलेले महिला मंडळाचे कार्यालयही दाखवले. येथे सभा, उखाळ्यापाखाळ्या याऐवजी शिवण, कपडेदुरुस्ती, घड्याळ दुरुस्ती करणे, शिवणे वगैरेसाठी कित्येक विभाग होते. आपल्या वस्तू स्वतःच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली दुरुस्त करण्याची व करायला शिकायची सोय होती. वाचनालय होते. अगदी छोट्यांची पूर्वप्राथमिक शाळाही फार आकर्षक होती. मुलांना जेवण्यापासून सगळ्या गोष्टींबद्दल शिक्षण हसत खेळत देण्यात येते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामाला जाणारे आईबाप, मुलांना येथे सोडून जातात.

संध्याकाळी वॉर्सातले प्रचंड स्टेडियम पहायला मिळाले. नदीवरील पुलामुळे शहराच्या केन्द्र बिंदूपासून २–३ मैलांच्या आत हे स्टेडियम आहे. त्याच्या दोन्ही बाजूंनी आणखी दोन पूल शहराला जोडतात. अर्थात् शहर आता दुसऱ्या बाजूलाही वाढत आहेच. स्टेडियमजवळून मुख्य उपनगरी लोहमार्ग जात असल्याने वाहतुकीची उत्कृष्ट सोय आहे. युद्धकाळातल्या सर्व उद्ध्वस्त इमारतींचा ढिगारा या स्टेडियम बांधणीत उपयोगात आणला आहे. स्टेडियमची रचना अगदी आदर्श अशी आहेच. पण त्याच्या बांधणीसाठी जुन्या वॉर्सातील माती,

दगड, विटा, वापरल्यामुळे जुन्या वॉर्साचे व पोलिश लोकांच्या पुनर्बांधणीच्या भगीरथ प्रयत्नांचे ते प्रतीकच आहे.

वॉर्सामध्ये एका चौकाच्या व तेथे नवीन बांधलेल्या इमारतींच्या संदर्भात, तेथील रहिवासी, तज्ञ हे नगरविकासाबाबत किती जागरूक असतात; याबाबत एक मजेशीर हकीकत ऐकायला मिळाली.

वॉर्सा हे हौशी नगरनियोजनकारांचे शहर आहे अशी एक म्हण येथे प्रचलित आहे. आपल्या शहरातले रस्ते, चौक कसे आखले जावेत याविषयी प्रत्येक नागरिकाची स्वत:ची अशी काही निश्चित कल्पना असलेली किंवा नव्या इमारती कशा बांधल्या जाव्यात, शहराच्या विकासाची प्रत्येक योजना कशी असावी याबाबत लोकांत चर्चा, वादविवाद होणारी अशी गावे फारच थोडी असतील. इथले नागरिक नव्या किंवा पुनर्बांधणी झालेल्या इमारती, प्रमुख रस्ते, पूल इत्यादी ठिकाणांना भेटी देऊन, वास्तुशिल्पशास्त्राच्या तत्त्वांबाबतची आपली मते, प्रकट करीत असतात. वादविवाद करतात, नियतकालिकांतून लिहीत असतात.

मी गेलो त्यावेळी वॉर्सातल्या थिएटर चौकावर ( प्लास टीएट्रालनी) बरेच लक्ष केंद्रित झालेले होते. एकतर युद्धपूर्व कालापासून शहरातला हा एक महत्त्वाचा असा चौक आहे. दुसरे म्हणजे बरीच वर्षे गाजत असलेले युद्धातल्या नेत्यांचे स्मारक या चौकात उभारून अलीकडेच त्याचे उद्घाटन झालेले होते. तिसरे कारण म्हणजे पूर्वी कोराझी नावाच्या विख्यात वास्तुशिल्पकाराने ज्याचा आराखडा तयार करून अभिजात वास्तुशिल्पाचा नमुना म्हणून बांधलेले ग्रँड थिएटर, जे युद्धानंतर अत्यंत काळजीपूर्वक व फार मोठा खर्च करून पुन्हा बांधण्यात आले होते व नुकतेच सुरूही झाले होते. चौथे कारण अगदी समोरच आधुनिक वास्तुशिल्पाच्या आधारावर बांधलेल्या नव्या उंच निवासाच्या

इमारती. या सर्व कारणांमुळे चर्चा, वादविवाद, लेख, प्रतिलेख यांचा प्रवाहच सुरू झाला होता व तज्ञांपासून सामान्यांपर्यंत सर्वांनी त्यात भाग घेतलेला होता. वॉर्सातले चौक आणि प्रामुख्याने तो थिएटर चौक यावरची चर्चा कित्येक महिने चालू होती.

युगेनिश वाश्चुक याने चौकाची पुढील प्रमाणे व्याख्या चर्चेला सुरुवात करून दिली. ' वाहतुकीच्या प्रवाहांचे एकत्र येण्याचे स्थान की जेथून ओसरणाऱ्या लाटेसारखे परंतु अनियमितप्रमाणात, वाहतुकीचे प्रवाह बाहेर पडून बाहेरच्या एकंदर वाहतुकीत मिसळून जात असतात, पादचाऱ्यांना काही क्षण विश्राम मिळतो. थांबायला मिळते. ' त्याच्या मते थिएटर चौक मात्र हे कार्य करीत नाही. कारण ही जागा अशी नाही, जेथे लोक भेटतात किंवा सर्व बाजूंनी वाहतूक येत जात असते. तसेच घराच्या दिवाणखान्यासारखी शहराची आगत स्वागत करण्याची अशी बंदिस्त असलेली अशीही ही जागा नाही. किंवा करमणुकीचे, विश्रान्तीचे स्थळही हे नव्हे.

प्रा. श्वांकोवस्की या इतिहासकाराने वॉर्सातल्या चौकांचे निरीक्षण करून लिहिले की, नव्या व जुन्या शहरातले ' मार्केट स्क्वेअर्स '– बाजार चौक हेच खरे नागरी चौक म्हणता येतील. त्यांनी असेही म्हणणे मांडले की ' चौकाभोवतालच्या इमारतींची पुनर्बांधणी करताना कोराझी ऐग्नर वगैरे मोठमोठ्या नगरनियोजनकारांच्या नगराबद्दलच्या कल्पना पार विसरल्या गेल्या. '

या आणि इतर मुद्द्यांवर शहराचे आणि तेथल्या परंपरेचे प्रेम असलेल्या लोकांनी खूप उलटसुलट मते व्यक्त केली. निरनिराळ्या वास्तुशिल्पकारांनी चर्चेला योग्य वळण देण्यासाठी मते व्यक्त केली. वादिस्वाव कोजेनिओस्की यांनी म्हटले की, ' आता चौक हे जेथे सर्व बाजूने वाहतूक जात–येत असते असे स्थान राहिलेले नाही.

बाजार चौकाची अभिजात रचना ( क्लासिकल ) जेव्हा केली जात होती किंवा निघाली होती तेव्हा इतक्या मोटारवाहतुकीची कल्पना नव्हती. आता चौक हे लोकांसाठी राखून ठेवून वाहतुकीच्या जा–ये साठी खास स्थानांची रचना करायला हवी. '

चौकाच्या व्याख्या व रचनेबरोबरच चर्चेचा ओघ जवळच बांधलेल्या अती उंच व अत्याधुनिक तऱ्हेच्या इमारतींकडे वळला. त्यांच्यावर बरीच टीका करण्यात आली. काहींचे मत असे होते की ग्रँड थिएटर आणि चौकात उभारलेले नाइक स्मारक यांच्या अभिजात धर्तीच्या रचनेशी या उंच इमारती विसंगत दिसतात. त्यांची रचनाच नव्हे तर प्रमाणही चौकाच्या एकंदर प्रमाणाशी विसंगत आहे. वास्तविक आधुनिक वास्तुशिल्पसुद्धा ऐतिहासिक महत्त्वाच्या इमारतींशी जुळवून घेणारे हवे. त्यांच्यावर प्रभाव गाजवणारे नव्हे. या मतावरही उलटसुलट चर्चा झाली. काहींच्या मते त्या एक महत्त्वाचे कार्य बजावतात हे विसरून चालणार नाही. या इमारतीतल्या रहिवाशांमुळे वॉर्साच्या या लोक नसलेल्या रुक्ष भागात जिवंतपणा आलेला आहे. या इमारतींच्या तथाकथित कुरूपपणापेक्षा शहरातले इतर कितीतरी भाग आहेत, ज्यांच्याकडे अधिक लक्ष जायला हवे. ' मी त्या इमारतीत रहातो म्हणून त्यांचे तेथे अस्तित्व योग्य ' असे मत मांडणारेही होते.

नोविच्की यांनी तात्त्विक भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या मते एका पिढीच्या आयुर्मर्यादेपेक्षा जास्त आयुर्मर्यादा असलेल्या इमारतीबाबत मतभेद हे होणारच. आखणी, रचना, बांधणी अशी असावी की ज्यामुळे नव्या जुन्या वास्तुशिल्पकलेचा संगम दिसून यावा आणि त्या स्थानाचे म्हणून जे जे कार्य असेल तेथे ज्या क्रिया घडायच्या असतील त्यांच्या बाबतचे उद्देश सफल झाले पाहिजेत.

या व अशा हिरीरीने झालेल्या चर्चेमुळे शहराच्या महापौरांना

शेवटी एक लांबलचक निवेदन देणे भाग पडले. चौकाची व्याख्या बदलली आहे हे त्यांनी मान्य केले. रचनेच्या घाटणीबद्दलच्या सातत्या बाबत व्हेनिसमधल्या सेंट मार्क या चौकाचे उदाहरण देताना त्यांनी हे स्पष्ट केले, की तेथील इमारतींची बांधणी हजार वर्षे चालू होती. काही इमारती तर नेपोलियनच्या काळात बांधल्या गेल्या आहेत. ऐतिहासिक महत्त्वाच्या वास्तुजवळ आधुनिक वास्तुशिल्पकलेमुळे वेगळ्या तऱ्हेचे विरोधामुळे उठावदार, आकर्षक व मिळून जाणारे असे नागरी शिल्पसमूह ( अर्बन कॉम्प्लेक्सेस ) निर्माण होत असतात. ही गोष्ट सहजसाध्य नसते आणि उत्कृष्ट रचना तयार झाली तरी लगेच लोक तिचे मनापासून स्वागत करतातच असे नाही. परंतु असेच करायला हवे ही गोष्ट शतकाच्या इतिहासाने सिद्ध झालेली आहे. वॉर्सात अजून पुनर्बांधणी होण्याची वाट पहात असलेले कितीतरी चौक आहेत. त्यांच्याकडे चर्चेचा ओघ आता वळवायला हरकत नाही. असा त्यांनी समारोप केला.

० ० ०

# १४. नियोजन आणि इतर क्षेत्रांतील प्रगती

पोलंडमधली नगरनियोजनाची पद्धत तशी थोडीफार आपल्यासारखीच आहे. मात्र अंमलबजावणीच्या बाबतीत तेथील लोक बरेच दक्ष आहेत. शिवाय राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवरील नियोजनाकडे त्यांनी अधिक लक्ष दिलेले आहे. प्रत्येक नगराचा विकास कसा करावयाचा हे ठरविताना राष्ट्रीय आणि प्रादेशिक नियोजनातील तरतुदींचा प्रामुख्याने विचार केला जातो. अर्थात तरीही प्रादेशिक असमतोलाचे प्रश्न नाहीत असे नाही. परंतु ते कमी करण्यात येत आहेत हळूहळू.

...७

एखादा नियोजनाचा आराखडा तयार करण्यापूर्वी सर्व लोकांकडून आणि निरनिराळ्या संस्थांकडून, खात्यांकडून सूचना मागविल्या जातात व परिषदा भरवून त्यांवर चर्चा केली जाते. बऱ्याच दूरवरचा विचार करून एक मार्गदर्शक आराखडा आणि नजिकच्या भविष्यकाळच्या गरजा भागविण्याकरिता वीस वर्षांचा आराखडा अशा दोन्ही योजना आखण्यात येतात. या आराखड्यामध्ये वर उल्लेख केलेल्या एका बाजूला राष्ट्रीय व प्रादेशिक तर दुसऱ्या बाजूला स्थानिक अशा सर्व बाबींचा, गरजांचा योग्य तो समन्वय करण्यात येतो. संबंधित अशा सर्व खात्यांची मान्यता घेण्यात येते. एका अशाच आराखड्यावर बावीस निरनिराळ्या संबंधित खाती व संस्थांच्या प्रतिनिधींच्या संमती दर्शक सह्या पाहायला मिळाल्या. आराखडा तयार होताच त्याच्या खर्चाची व अंमलबजावणीची तपशीलवार योजना तयार करण्यात येते. एकदा मंजूर झालेला आराखडा अर्थात सर्वांवर बंधनकारक असतो.

नगर योजनांच्या पद्धतींशिवाय इतर बाबतींतही साम्य व फरक पहाण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ एखादा विशिष्ट प्रश्न अभ्यासण्यासाठी चर्चा, कमिटी, परिषदा भरवणे.

महाराष्ट्र राज्याप्रमाणेच सहकारी संस्थांची वाढ फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. शेतकऱ्यांच्या खरेदी–विक्रीसाठी काही वस्तूंच्या परदेशाशी व्यापारासाठी, घरबांधणी, वगैरे कितीतरी बाबतीत सहकारी क्षेत्राने प्रगती केलेली आहे. घरांच्यासाठी तर प्रत्येक मोठ्या शहरातून आपल्या गरजा व देऊ शकत असलेले भाडे वगैरे कळवून अर्ज दिल्यानंतर पुष्कळच कमी वेळात घर मिळू शकते.

मशिन टूल्स, शेतीची अवजारे व इतर कारखाने, औष्णिक विद्युत केंद्रे, मच्छीमारी व पूर्वरचित घरांची बांधणी ( प्रीफॅब्रिकेटेड हाऊसेस )

दूध, अंडी, मांस या व इतर पदार्थांची पैदास आणि निर्यात, आरोग्य आणि वैद्यकीय मदत, तांत्रिक शिक्षण, या व इतर काही क्षेत्रात पोलंडने बरीच आघाडी मारलेली आहे. बऱ्याच देशांतून निरनिराळ्या शिक्षणक्रमासाठी पुष्कळ विद्यार्थीही येत असतात.

० ० ०

# १५. लंडनमार्गे परत

अठरा तारखेला सबंध दिवस दुसऱ्या दिवशीच्या निघण्याच्या प्रवासाची तयारी, विमानाचे तिकीट, किरकोळ खरेदी, पुस्तके पोस्टाने रवाना करणे व निरोप घेणे यात मोठ्या घाईतच गेला. आवराआवर, गप्पा, निरोप यात रात्री निजायलाही खूप उशीर झाला आणि एकोणीस तारखेची सकाळ उजाडली. तेव्हा विचार लंडनच्या दिशेने अगोदरच वाट चालू लागले होते. पिओत्रोविच व हलीना ओर्लिन्स्का यांची धावपळ चालू होती. आठ वाजता विमानतळाकडे घेऊन जाणारी मोटार आली आणि त्या दिवशी निघणारे दोघेतिघे व पोचवायला येणारे असे सर्वजण मोटारीत बसलो. आता प्रत्येकाचा मार्ग वेगळा होता. कोणी थेट परतणार होते। कोणी लंडनमार्गे, कोणी पॅरिसमार्गे तर कोणी कैरोमार्गे.

माझे लंडनला जाणारे विमान पावणे अकरा वाजता सुटायचे होते. विमानतळावर सर्व प्राथमिक गोष्टी वगैरे उकरण्यासाठी निघालो तेव्हा ४ महिन्यांपूर्वीच्या, वॉर्साच्या पहिल्या दर्शनाची आठवण झाली- आता चित्र बदलले होते. स्वच्छ सूर्यप्रकाश होता. किती गोष्टी पाहिल्या होत्या अन् किती पहायच्या राहिल्या होत्या. पुन्हा इथे येऊ न येऊ, आपुलकीने स्वागत करणारी ही माणसे भेटतील न भेटील

आयुष्यात, त्यांचा निरोप घ्यायला शब्द अगदी वाच्यार्थानेही अपुरे होते; कारण त्यांच्या भाषेत निरोपाचे शब्द काय होते हे काही पाठ करून ठेवले नव्हते. विमानाची घोषणा होऊन विमानाकडे निघालो तेव्हा मनातल्या मनातच निरोपाचे, आभाराचे व सदिच्छेचे शब्द उच्चारून मी पिओत्रोविचचा व पोलिश भूमीचा निरोप घेतला. या भावनांबरोबरच आता पुढच्या प्रवासाचीही चिंता मनाला लागली होती.

लंडनला दोन वाजण्याच्या सुमारास पोहोचलो तेव्हा अगदी ऊन नसले तरी हवा स्वच्छ होती, पाऊस नव्हता. लंडनच्या प्रचंडपणाचा पगडा मनावर विमानतळापासून पडू लागला होता. राष्ट्रकुलातल्या प्रवाशांकरिता असलेल्या खास सोयीमुळे अक्षरशः मी पाच मिनिटात बाहेर आलो. सामान ताब्यात घेऊन बाहेर पडायलाच १०–१५ मिनिटे काय ती लागली आणि समोरच श्री. भास्कर साठे उभे होते. एक वर्षानंतर आम्ही भेटत होतो. त्यांना पाहून मला आनंदाचे भरते आले. धावत जाऊन अस्सल मराठी भेटीगाठीची मिठी मारायचा माझा विचार होता, पण लंडनच्या शिष्टाचारात ते बसेल न बसेल म्हणून आपले हस्तांदोलनच केले. कसे जायचे हे ठरविण्यापूर्वी १० मिनिटे तेथेच आधी मराठीत गप्पा मारून घेतल्या. कारण चार महिन्यात मराठी भाषेत बोलायला मिळाले नव्हते. अन् त्या पुढची गोष्ट म्हणजे आपले पदार्थ खायला मिळाले नव्हते. साठे विमानतळा-वर आल्यामुळे आता हे सगळे जमणार होते.

बसने जायचा बेत मुक्रर करून आम्ही बसस्टॉप गाठला. मुंबईच्या 'बेस्ट' सारख्या, लंडनच्या लाल बसेसनी प्रथमच परकेपणा घालवून टाकला. बसमध्ये लोक गप्पा मारीत होते. बहुधा पु. लं. ची

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........



अपूर्वाईतली वर्णने त्यांना भाषांतरित करून ऐकवण्यात आली असावीत असे वाटले. पु. लं. नी केलेल्या इतर अनेक कामगिरीत लंडनच्या ' जन्ते 'ला सुधारण्याच्या या कामगिरीचीही नोंद घ्यावी लागेल.

लंडनमध्ये सर्व खाद्यपदार्थ — वडे, डोसे, पापड, लोणची, अगदी मसाला पानसुद्धा मिळते. हे कळल्यावर अगदी आनंद वाटला.

इंग्लंडमधल्या मुक्कामात नेहमीचे प्रवासी बघतात ती स्थळे बघण्याचे मी बहुश: टाळले. साठेंना वेळ असेल तेव्हा ते किंवा त्यांचे मित्र, वा मी एकटाच फिरायचो. आजूबाजूच्या ४०–५० मैलांच्या परिघातील नवी शहरे, नवे निवासविभाग. नगररचनासंबंधित कार्यालये वगैरे पहाण्यातच सगळा वेळ घालावला. नाही म्हणायला एकदा लंडन दाखवणाऱ्या आरामबसने लंडनचे चट्दर्शन उरकले. वेलविन, स्टीव्हनेज ही नवी गावे तर नगररचनाकारांची तीर्थक्षेत्रेच. तसेच कॉन्व्हेन्ट्रीचे अद्यावत शॉपिंग सेन्टर, रोहम्प्टनची गृहरचना या ठिकाणीही अधिक वेळ घालवला. एक दिवस ऑक्सफर्डलाही जाऊन आलो. तेथील सुप्रसिद्ध कॉलेजेसच्या अगदी जतन करून ठेवलेल्या जुनाट वास्तू पाहून मात्र काही विशेष उल्हसित वाटले नाही. पण अशोक तुळपुळे या मित्राची भेट झाली.

इंग्लंडमध्ये लोकांनी बस व रेल्वेने प्रवास करावा म्हणून जवळजवळ निम्म्या किंमतीला किती तरी गावांची एका दिवसाची परतीची तिकिटे मिळतात. रेल्वे तर अती वेगाने धावणाऱ्या आहेत, पण तरीही बस व रेल्वे मोकळ्याच राहतात. अन मोटारींच्या वाहतुकीचा आणि वाढीचा प्रश्न काही सुटत नाही. याबाबतीत आपण अजून मागे असलो तरी ही परिस्थिती येऊ घातली आहे व आताच तिचा विचार करायला हवा, असेच इंग्लंडची वाहतूक–समस्या सांगते आहे.

लंडनच्या आसपासच्या भागातही महाराष्ट्रीय खूप आहेत. त्यांच्या 'महाराष्ट्र समाजाच्या' एका कार्यक्रमाला जाण्याची संधी मिळाली. दिल्लीतल्या अशा कार्यक्रमाचा अनुभव नाही म्हटले तरी ताजाच होता. थोड्याफार फरकाने तसाच अनुभव लंडनमध्ये येईल असे वाटत होते. काही अंशी खरे असले तरी तेथे बराच मोकेळपणा आढळला व त्यामुळे बरे वाटले. तसा महाराष्ट्रीय व गुजराथी समाज लंडनला खूप आहे. गोल्डर्स ग्रीन व ब्रेंट या भागात विनोदाने असे म्हटले जाते की, इंग्रज माणसाला रहायला येथे परवाना लागतो.

लंडनमधल्या ट्यूब रेल्वेचा प्रवास हे अत्यंत सोपे काम. कोठेही जा चक्क 'अमक्या ठिकाणी जाण्यासाठी येथे वळा' वगैरे पाट्या असल्याने वयस्थही गोंधळून जाण्याचे कारण नसते. प्रत्येक डब्यात ट्यूबच्या जाळ्यांचा नकाशाही असतो किंवा कोठल्याही कोपऱ्यावरच्या नाक्यावर तो मिळू शकतो. त्यामुळे खूप हिंडून घेतले.

एकोणतीस जूनच्या विमानाचे रिझर्वेशन मिळाले होते. निघताना सामानही खूप झाले होते. एअर इंडियाच्या अधिकाऱ्यांच्या मदत करण्याच्या वृत्तीमुळेच परतताना सर्व सुकर झाले. पुन्हा 'सहावी फ' ही सुरुवातीला येताना मिळालेली बैठकच मिळाली होती. साठेमंडळींचा निरोप घेऊन दुपारी एक वाजता विमानात बसलो. जगातल्या अत्यंत गजबजलेल्या अशा त्या विमानतळावरून इंग्लंडचा निरोप घेतला. प्रवासात शेजारी अहमदनगरचे हळबे नावाचे एक प्राध्यापक होते. त्यामुळे गप्पात प्रवास चांगला पार पडला. वाटेत मॉस्कोचा एक तासाचा मुक्काम होता, पण अंधारही पडला होता व पासपोर्ट घेणे व परत देणे यात चहा प्यायलाच फक्त वेळ मिळाला. रशियन चहाची चव काही तरी वेगळीच होती. त्यात दुधाबरोबर लोणीबिणी पण

घातले होते की काय कुणास ठाऊक ! मॉस्को सोडल्यावर विमानात जेवण झाले व नंतर डुलक्या येऊन लागल्या तरी चांगली झोप लागणे शक्य नव्हते. गेला महिनाभर प्रवास, गडबड, नवनवीन स्थळांना भेटी यांनी कार्यक्रम गडबडीचा झाला होता. आता हवी होती विश्रांती. पण ती पुण्याला पोहोचल्याशिवाय शक्य नव्हते.

पहाटे दिल्लीला गरम वारे आणि धुळीची वादळे यांनी भारतात परतल्याची जाणीव करून दिली. दिल्ली ते मुंबई ढगांमुळे काही दिसू शकले नाही. अन् एकदाचे सांताक्रूझ विमानतळावर येत आहोत, पट्टे बांधा, ही घोषणा कानावर पडली आणि आपला ४ महिन्यांचा प्रवास व हा कालखंड आता आठवणीत जमा होणार.ही जाणीव झाली अन् सामान जमा करू लागलो.

o o o

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५२१९ दि: ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८९३९
संग्रह शाखा

# आमची निवडक प्रकाशने

## कादंबरी

### साने गुरुजी

| | |
|---|---|
| क्रान्ति | ५-०० |
| तीन मुले | ३-५० |

## चरित्र

### साने गुरुजी

| | |
|---|---|
| इतिहासाचार्य राजवाडे | २-०० |
| ईश्वरचंद्र विद्यासागर | ३-०० |

### त्र्यं. ग. बापट

| | |
|---|---|
| स्वामी विवेकानंद | ३-०० |
| श्रीरामकृष्ण परमहंस | २-५० |

### पु. पां. गोखले

| | |
|---|---|
| आगरकरांशी ओळख | १२-०० |

### कृष्णदयार्णव

| | |
|---|---|
| हरिवरदा | ६५-०० |

## ललित निबंध

### रा. चिं. ढेरे

| | |
|---|---|
| अमृतकन्या | २-५० |

### साने गुरुजी

| | |
|---|---|
| समाजधर्म | २-०० |
| राष्ट्रीय हिंदुधर्म | २-५० |

० ० ०

REFBK 0018131

REFBK-0018131